सत्पंथ–रहस्य

लेखक व प्रकाशक:

सोनू तुकाराम पाटील

जळगांव, पूर्व खानदेश.

मुद्रक:

नामदेव माधव नेमाडे

ण प्रिंटिंग प्रेस, जळगांव पू. खा.

मे १९३६

किंमत एक रुपया.

सत्पंथ–रहस्य

लेखक व प्रकाशक:

सोनू तुकाराम पाटील

जळगांव, पूर्व खानदेश.

मुद्रक:

नामदेव माधव नेमाडे

ण प्रिंटिंग प्रेस, जळगांव पू. खा.

Shri Krishna Printing Press, Jalgaon

मे १९३६

किंमत एक रुपया.

Much information about the proceedings of the Leva Patidar Samaj's Bhorgaon Panchayat, at different times, can be found in the book called Satpanth Vijay [ID 147].

Some interesting information in that book, include:
1) Swadharm Palan Karo, pamphlet reproduced
- Page 18 (36 of 258)

2) Kaka Laxman Karamshi's statement in court
- Page 18 (36 of 258) to 20 (38 of 258)
- Page 82 (102 of 258) to 91 (113 of 258)

3) Order / Decision dated 24-Dec-1922 of Leva Patidar samaj, with respect to Satpanthi
- Page 35 (53 of 258) to 39 (57 of 258)

4) Other document of Leva Patidar Samaj
- Page 63 (83 of 258) to 67 (87 of 258)

दोन शब्द.

सत्पंथासंबंधींची माहिती महाराष्ट्र जनतेसमोर मांडत आहे. ती हिंदुसमाजाच्या दृष्टीनें कितपत योग्य आहे हें वाचकांनींच ठरवावें. मी निमित्त मात्र आहे. सत्पंथानें उडविलेला हाहाःकार आणि अनेक ज्ञातींना तद्योगें झालेला त्रास, या कांटीस अत्यल्प प्रमाणांत मीही पण उतरलों आहे. आणि त्यामुळेंच हादरलेल्या अंतःकरणांतून, सदरहू सत्पंथाची माहिती बाहेर आलेली आहे. सत्पंथास आणि त्याच्या अनुयायांस दोष द्यावा अगर त्यांचा कमीपणा व्हावा असा हें पुस्तक लिहिण्याच्या बाबतींत हेतू नाहीं. पण हिंदुसमाजाला नकळत पोखरणाऱ्या या सत्पंथानें हिंदुसमाजावर गुप्तपणें किती आक्रमण केलेलें आहे, हें दाखविण्याचा मात्र सदरहू पुस्तकाचा उद्देश आहे. हें पुस्तक लिहितांना सत्पंथांतील गुरुंचा आणि पुढाऱ्यांचा यांत जो जो संबंध आलेला आहे तो त्यांचा कमीपणा व्हावा या उद्देशानें घातला गेला नाहीं. त्याच प्रमाणें त्यांच्याबद्दल आणि सत्पंथी अनुयायांबद्दल जी भाषा वापरली गेली तीही द्वेषमूलक भावनेनें मुद्दाम वापरलेली नाहीं. इतकेंही करून माझ्या या लिखाणाबद्दल आणि त्यांतील भाषेबद्दल ज्यांस तसली भावना उत्पन्न होईल किंवा ज्यांना वाईट वाटेल तें, अनाठायीं मात्र होईल. सदरहू पुस्तक दक्षतेनें आणि आधार मिळालेल्या माहितीनें लिहिलें आहे असें माझ्या अल्पमतीस वाटतें. मी कांहीं विद्वान लेखक नाहीं अगर धर्मशास्त्रज्ञही पण नाहीं. म्हणून या पुस्तकांत दोषस्थळें असण्याचा संभव आहे तरी सज्जन वाचक त्याबद्दल क्षमा करतील अशी आशा बाळगतों.

सदरहू पुस्तक अथपासून इतिपर्यंत काळजीपूर्वक तपासून, व अत्यंत उपयुक्त व बहुमोलाच्या सुचना करून, आमचे मित्र श्री. मुरारीराम यांनीं मला जी मदत केली तिजबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. तसेंच पुस्तकाची प्रेस कॉपी तयार झाल्यावर ती जळगांव

येथील प्रागतिक पत्राचे संपादक श्री. द. वा. जोशी वकील यांनी ती संपूर्णपणें वाचिली आणि माझ्या विनंतीस मान देऊन मुद्देसूद आणि व्यवस्थित अशी प्रस्तावना लिहून दिली त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें. त्याचप्रमाणें श्रीकृष्ण प्रेसचे मालक आणि म्यानेजर यांनी पुस्तकाचीं प्रुफें काळजीपूर्वक तपासून छपाईचें काम व्यवस्थेशीर करून दिलें याबद्दल त्यांचाही मी आभारी आहें.

शेवटीं, या पुस्तकांत प्रतिपादन केलेली माहिती आणि विचारसरणी याप्रमाणें वागण्यास परमेश्वर सत्पंथांतर्गत समाजांस सद्बुद्धि देवो अशी त्याच्या चरणीं प्रार्थना करून हें पुस्तक जनताजनार्दनासमोर ठेवीत आहें.

जळगांव
ता. १० मे १९३६ }

सोनु तुकाराम पाटील.

10-

Saka:

प्रस्तावना.

जळगांव येथें शके १८५२ च्या पौष महिन्यांत अखिल भारतीय वर्णाश्रम स्वराज्यसंघाची परिषद भरली होती. त्या निमित्तानें भरतखंडांतील बहुतेक सर्व पीठांचे आचार्य परिषदेच्या अधिवेशनाकरितां उपस्थित होऊन हें अधिवेशन सर्व दृष्टीनीं अपूर्व असें झालें. या अधिवेशनामध्यें सकाळीं विद्वत्परिषदा भरत व त्यांमधून अनेक धार्मिक व सामाजिक वादग्रस्त विषयांवर प्रश्नोत्तरें होऊन चर्चा होई. अशा अनेक प्रश्नांपैकीं, खानदेशांतील लेवा पाटीदार जातीमध्यें कांहीं कुटुंबें सत्पंथ म्हणून एक स्वतंत्र आचार विचार असलेला पंथ पाळीत असतात तो वैदिक अथवा वेदबाह्य आहे अशा विषयीं प्रश्न विचारण्यांत आला होता. त्यावेळीं या पंथाचे आचारविचार ऐकून, त्यांचे प्रत्यंत्तर पुरावे पाहून, त्या पंथाच्या उपलब्ध ग्रंथांचें अवलोकन करून, तसेंच अधिवेशनांत उपस्थित असलेल्या कित्येक जबाबदार लेवा पाटीदारांचें म्हणणें ऐकून घेऊन परिषदेंतील पंडितांनीं

'सद्गुरू सत्पंथ व त्याचे आचारविचार वैदिक नाहींत, वेदबाह्य आहेत.'

असा आपला निर्णय दिला होता. या अधिवेशनाचे कार्यवाहकत्व त्यावेळीं मजकडे असल्यामुळें, पंडितांचा उपरोक्त निर्णय जोडून या पंथाच्या स्वरुपाविषयीं निर्णयात्मक एक आज्ञापत्र मिळावें अशा विनंतीचा एक अर्ज श्रीमत् जगद्गुरू श्रीशंकराचार्य गुरुस्वामी श्री शिरोळकर महाराज यांजकडे लेवा पाटीदार जातींतील सुप्रसिद्ध वकील श्री. लक्ष्मण शिवराम चौधरी बी. ए. एल्. एल्. बी., या पुस्तकाचे लेखक व लेवा पाटीदार पंचायतीचे कुटुंबनायक श्री. सोनु तुकाराम पाटील तसेंच, श्री आत्मानंदबुवा ब्रह्मचारी खंडोबाची वाडी फैजपूर, यांच्या सह्यांनिशीं माझे मार्फत पाठविला होता. जळगांवचे महाधिवेशनांत श्री स्वतः उपस्थित राहून येथील कार्य पाहून गेले होते. त्यांनीं या अर्जाचा विचार करून, 'सत्पंथ या नांवानें खानदेश, बऱ्हाणपूर, कच्छ, गुजराथ इत्यादि ठिकाणीं जो पिराणा पंथ प्रचलित आहे तो सर्वथा वेदबाह्य आहे' असा निर्णय देऊन त्याची प्रसिद्धी करण्यास आज्ञापत्र दिलें. हें आज्ञापत्र या पुस्तकाच्या पान १०५।१०६ वर छापिलें आहे. या आज्ञापत्राच्या प्रती अर्थातच सर्वत्र वांटण्यांत आल्या व त्यामुळें सत्पंथ पाळणाऱ्या कांहीं बांध-

यांचा चित्तक्षोभ झाला व पुढें उपस्थित झालेला वाद त्यांचेंच फळ होय.

महाराष्ट्रांत जळगांव येथे वर्णाश्रम स्व० संघ परिषदेचें अधिवेशन भरलें व तें अत्यंत यशस्वितेनें पार पडलें ही गोष्ट कित्येकांना आवडली नव्हती. इकडच्या सनातनी सुधारक वादाची बीजें तेव्हां हलकें हलकें रुजत होतीं. देशभक्तीचा सारा मक्ता आपल्याकडे घेणारीं, धर्मव्यवस्थेविषयीं भावनाशून्य असणारीं, व कांहीं पूर्वग्रहामुळें श्रीमत् शंकराचार्यांवर तोंडसुख घेण्यास अवसर पहात असलेली माणसें व वर्तमानपत्रें महाराष्ट्रांत तेव्हां होतीं. ' कैलास तीर्थाचा लिंबी ' या न्यायानें श्रीमत् शंकराचार्यांचें सत्पन्थाविषयींचें आज्ञापत्र यांचीं डोकीं भडकविण्यास पुरेसें झालें; खुद्द सत्पन्थीबांधव व त्यांचे पुढारी हे तर या आज्ञापत्रामुळें चिडणें सहाजिक होतें. परधर्मांचे संस्कार व आचारविचार आपण पाळतों याची जाणीव असल्यामुळें व ते सोडण्याची तत्परता नसल्यामुळें श्रीमत् जगद्गुरु शंकराचार्यांवर व त्यांचे आज्ञापत्र मानणारांवर येन केन प्रकारेण गहजब उठवून वाहेरील जनतेची दिशाभूल करण्याकरितां धूळफेंक करण्यास उत्तम साधनें म्हणून ' केसरी ' व ' महाराष्ट्राचा ' उपयोग करण्यांत आला. व हीं दोन प्रमुख पत्रें ' सत्पन्थी वादांत ' कचित गैरसमजानें व कांहींशीं पूर्वग्रह दूषित होऊन पडलीं. या वर्तमान पत्रांनीं श्रीमत् जगद्गुरुंच्या उपरोक्त निर्णयाबद्दल [आज्ञापत्राबद्दल] त्यांना शेलक्या विशेषणांचा अहेर केला व हीन मनोवृत्तींचें प्रदर्शन केलें !

त्या वेळच्या ' महाराष्ट्र ' पत्रांतील एका अग्रलेखांत श्रीमत् शंकराचार्यांना ' स्वतःच्या घरावर निखारे ठेवणारे ऐतखाऊ शंकराचार्य ' अशीं विशेषणें लाविलीं होतीं. तसेंच विविध प्रकारांनीं गालिप्रदान केलें होतें. ' केसरी ' पत्रानेंही शंकराचार्यांनीं ' सत्पन्थी हे हिंदु नाहींत ' असा निर्णय दिल्याबद्दल आपला गैरसमज करून घेतला; व हिंदुसमाजास ' जी गळती लागली आहे तींत आणखी भर ' घातल्यावर दुःख करीत करीत कांहीं एक न पहातां किंवा विचार न करितां शंकराचार्यांच्या व सनातनीयांच्या निरुपद्रवी चळवळीवर जनतेचा रोष व्हावा म्हणून हल्ला चढविला. परंतु, त्यांचीं शस्त्रें पुढें झालेल्या वादामुळें बोथट होऊन जीं गळून पडलीं तीं पुन्हां सत्पन्थावर अक्षरें उच्चारण्यास धजलीं नाहींत !

या वादांतील निरनिराळ्या वर्तमान पत्रांनीं आपापल्या स्वभावानुसार जे उद्गार काढले त्यांतील कांहीं उतारे या पुस्तकाचे शेवटीं वाचकांस आढळतीलच. (पान ११९ पासून १४० पर्यंत.)

असा हा वादविषयीभूत सत्पंथ आहे तरी काय, याविषयीं वर्तमान पत्रांतून त्यावेळीं कित्येकांनी उलटसुलट लिहिलें. खुद्द सत्पंथी व त्यांचे पक्षपाती लेखक आलेल्या प्रसंगांतून आपली बाजू कशी सावरली जाईल या विचारानें लिहित असत व वर्तमानपत्री लेखक, तसेंच हिंदुसभांचे पुढारी व अनुयायी ' सत्पंथाच्या स्वरूपाकडे व त्याच्या आचार विचारांकडे दुर्लक्ष करून तो कसाही असला तरी त्याच्याशी फटकून वागूं नका, ' असा उपदेश करूं लागले व त्याकरितां आज्ञापत्र देणाऱ्या शंकराचार्यांवर व सनातनी पंडितांवर निष्कारण क्रुद्ध झाले!

असें होण्याचीं जीं कांहीं प्रमुख कारणें आम्हांस वाटतात, त्यांपैकीं अगोदर सत्पंथाच्या वास्तव स्वरूपाचें व स्थानिक परिस्थितीचें बरेंचसें अज्ञान हें एक होय. चारशें वर्षांपूर्वीपासून सिंध, गुजराथ, कच्छ, काठेवाड वगैरे भागांत आगाखानी व पिराणा पंथ हे गुर्जर, भावसार, कुणबी, बारी, माळी, शिंपी, सोनार, कुंभार वगैरे जातींमधून हळूहळू इस्लामी धर्माची छाया पसरीत होते. सत्पंथ हा असाच एक हिंदूंना मुसलमानीकरण्याचा प्रयत्न होय. हा प्रयत्न जो त्यावेळीं थोडाफार यशस्वी झाला त्याचेंच आज मिश्रीत सत्पंथी बांधव, पंजाब, सिंध, कच्छ, गुजराथ, खानदेश, वऱ्हाड, नेमाड वगैरे प्रांतांत अनुयायी म्हणून राहात आहेत. नामदार आगाखान कलंकीचे अवतार होत. अशा अर्थाचीं हजारों चोपडीं गुजराथेंत वाटून हिंदू लोकांना बाटविण्यांत आलेलें आहे. आगाखानी पंथाचा " वैदिक इस्लाम " नांवाचा एक ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्यांत हल्लीं ज्यांना नामदार आगाखान म्हणतात, ' ते गृहस्थ कलियुगांतील श्रीकृष्णाचे अवतार होत. ' असें प्रसिद्ध केलें असून " यदायदाहि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत " या गीतावचनाप्रमाणें ना. आगाखान हे विष्णूचा दहावा नकलंकी अवतार म्हणून त्यांच्या भक्तांनी त्यांचें स्तोम माजविलें आहे, व गुजराथ अहमदाबाद वगैरे भागांतील हजारों अज्ञानी भोळसर हिंदूंना पाशांत फसविलें आहे! हिंदुधर्म ग्रंथांतील कांहीं तत्त्वें व वचनें

संमाहित करून त्यांची मुसलमानी तत्वांशीं सरमिसळ करून सांगण्याचा व कलियुगापर्यंत ऋग्वेद यजुर्वेद सामवेद चालले, आतां कलियुगांत कुराण हाच चौथा अथर्ववेद होय असें ह्या पंथांतील लोक सांगत असतात. व अज्ञानी लोकांचा त्यावर विश्वास बसतो. आणि नंतर त्यांचेवर मुसलमानी छायेचें जाळें सहज टाकतां येतें. या पंथाचा प्रचार कोणत्या व किती दूरवरच्या विचारांकरतां चालला आहे तें लक्षांत ठेविलें पाहिजे. गेल्या नोव्हेंबर महिन्याच्या मॉडर्न रिव्ह्यू मध्यें मुसलमानांतील कांडीयांनी आगाखानी पंथाचा उल्लेख करून मुसलमानांतील प्रसिद्ध सनातनी पुढारी सर महमद इकबल यांना उद्देशून पं. जवाहरलाल यांनीं दोन लघु लेख लिहिले आहेत. हे लेख लिहिण्यांत पंडित जींचा उद्देश मुसलमानांतलि सनातनी पंथीयांची साधल्यास चेष्टा करावी व त्या निमित्तानें ना० आगाखान यांच्या पंथाचाही हिणकसपणा कडव्या मुसलमान धर्मीयांच्या नजरेस आणावा असा आहे. अलीकडे बरेंच दिवस बहुतेक सर्व मुसलमान पुढाऱ्यांस मुसलमान धर्मीयांची सत्ता एकजीव एकवट करून जगाच्या राजकारणी व इतर चळवळीवर प्रभाव पाडण्याची पान-इस्लामिझमची स्वप्नें पडत आहेत. सर महंमद इकबल हे ही अशा पुढाऱ्यापैकीं एक आहेत. त्यांचा उद्देश मुस्लीम जगताचें ऐक्य व एकरूपता साधण्याचा आहे, व ' सॉलिडॅरिटी ऑफ इस्लाम ' मुस्लीम जगताचें ऐक्य ही या सर्व पुढाऱ्यांची सध्यां घोषणा चालू आहे. तिला उद्देशून पंडितजींनीं प्रश्न विचारले असून उपरोक्त कांडीयांनीं आगाखानी पंथासारखे अनेक पोटपंथ तुमच्यांत आहेत त्यांची वाट कशी लावणार व ऐक्य कसें साधणार असा सर महमद इकबल यांस सवाल विचारला आहे व खुद्द आगाखानी पंथाविषयीं म्हणजे आगाखानाच्या ईश्वरी अवताराविषयीं व त्यांचें नांवावर त्यांच्या भक्तांनीं चालविलेल्या अनेक हास्यास्पद व मूर्खपणाच्या प्रकाराविषयीं मोठी खुमासदार टीका केली आहे. तसेंच आगाखानांचा धेडगुजरी मुस्लीम पंथ मुस्लीम ऐक्याचे चळवळींत कसा सामावून घेणार असा प्रश्न वेळोवेळीं विचारला आहे. परंतु या मुस्लीम जगतांतलि ऐक्याशीं आम्हांस कांहींच कर्तव्य नसून हें एवढ्याच करतां आम्ही नमूद करीत आहों कीं, हिंदुना मुसलमान करण्याच्या ज्या अनेक चळवळी चालल्या आहेत, त्यांत आगाखानी पंथाची चळवळ किती प्रमुख व आहे. या

चळवळीसच ' सत्पन्थ सत्पन्थ—सीधोरस्तो म्हणून जे वैदिक-इस्लामसारख्या ग्रंथांनीं किती नांवाजविले व गौरविले आहे तें वाचकांनीं पहावें. त्या पुस्तकांत ज्यांचें वर्णन केलें आहे ते सतपंथ पाळणारे पिराणी सत्पंथी ' आम्ही चार वेद मानतों ' असें तोंडानें म्हणतात परंतु त्यांचा चौथा अथर्ववेद म्हणजे खुद्द ' कुराण ' होय हें वाचकांनीं लक्षांत ठेवावें. अर्थात अशा पायावर चालविलेला सत्पंथ व त्याचे आचारविचार कसे असतील याची कोणासही सहजच कल्पना होईल. अथवा कल्पनाच कशाला ? सत्पंथाची व त्याच्या प्रसाराची मोठी मनोरंजक हकीकत या पुस्तकांत दिली आहे ती एकवार वाचून पहावी म्हणजे झालें. असो.

हे एक सत्पंथाविषयीं अज्ञानाचें कारण झालें. दुसरें कारण, **हिंदु या शब्दानें उत्पन्न केलेला घोटाळा हें होय.** भाषेंतील कांहीं कांहीं शब्द निश्चितार्थक नसतात. अशा शब्दांपैकीं हिंदु हा शब्द असून त्याच्या व्याख्येविषयीं वाद माजले आहेत. हिंदुधर्म हा सामाजिक शब्द तर अधिकच घोटाळे उत्पन्न करीत आहे. हिंदूमहासभा ही संस्था हिंदु या शब्दांत गोमांस भक्षक बौद्धांचाही समावेश करते. मग जैनादिकांची तर कथा काय ? जगांत हिंदुधर्म वाढवावयाचा ही कांहींतरी एक भरमसाट कल्पना मनांत धरून, राजकीय हेतू करतां लोकसंख्येच्या वाढीचा प्रयत्न करावयाचा व त्याकरितां होईल त्यास हिंदु करून घेणें आपलें कर्तव्य समजावयाचें असा हिंदुसभावाल्या देशभक्तांचा आग्रह आहे. एवढेंच नव्हे तर जन्मजात मुसलमानाला हिंदु करून घेतां घेतां वेळ आल्यास हिंदुस्तानांत जे जे रहातील ते ते सर्व हिंदुच असेंही प्रतिपादावयाचें व व्यापकतेची सीमा गाठावयाची अशाही ह्या देशभक्तांचा मोठा महत्वाकांक्षी विचार आहे ! अशा विचारांनी प्रेरित झालेले लोक व लेखक सत्पंथाच्या वादांत कावीळ झाल्यासारखे होऊन असंबद्ध कोटिक्रम करूं लागले तर त्यांत आश्चर्य काय ? हिंदू या शब्दाची व्याख्या निश्चित नसून अशा व्याख्येंत पडणाऱ्या भिन्न भिन्न जातींचा एक धर्म कोणता हेंही पण निश्चित नाहीं. अशा स्थितींत सत्पंथाचें आक्रमण आपल्याच बांधवांवर कसें झालें व तें कमी करीत जाण्याचा मार्ग कोणता याविषयीं दुमत न झाल्यास तेंच नवल होय.

अर्थात् 'सत्पंथीयांचे आचारविचार कांहीं असले तरी त्यांना विचकवूं न देतां आंजारून गोंजारून आपल्याच घरांत ठेवावे' असें मानणाऱ्या देशभक्तांच्या विचारानें 'तुम्ही पाळतां ते आचार वेदबाह्य आहेत, आपल्या धर्माचे नाहींत ते टाकून द्या व शुद्ध आचार ध्या.' असें सांगणेंही मोठें पाप होऊन बसलें ! सत्पंथ पाळणारे सत्पंथी लोक हिंदूच नाहींत असा निर्णय श्रीमत् शंकराचार्यांनीं दिला नसतां, तसा दिल्याचें खोटें तर्कट सुबुद्ध पत्रकारांनीं रचलें. सत्पंथी हे जन्मत: वैदिक धर्मानुयायी प्रजेपैकींच होत. त्यांना जन्मत:च ज्यास हिंदुत्व म्हणतात तें प्राप्त होत असतें त्यांनीं फक्त सत्पंथाचे अधर्म्य आचार टाकणें इष्ट असल्यामुळें तसे आचार टाका ते वेदबाह्य आहेत असें श्रीमत् जगद्गुरु शंकराचार्य यांचें आज्ञापत्र म्हणत आहे व त्यांचाच तो अधिकार असल्यामुळें त्यांचे आज्ञापत्र मिळवून तें सर्वत्र प्रसिद्ध केलें गेलें.

आचिनोति च शास्त्रार्थं । आचारे स्थापयत्यपि

हेंच तर आचार्य पीठाचें कर्तव्य ! तें श्रीमत् गुरुंनीं आज्ञापत्र देऊन केलें आहे. त्यांचें हें अधिकार क्षेत्र दुसरा कोणीही आक्रमण करूं शकत नाहीं या पुस्तकांत सत्पंथाच्या वादाविषयीं हायकोर्टांत गेलेल्या एका खटल्याची हकीगत दिली आहे. त्या खटल्याचें अपील नामदार हायकोर्टांत चाललें. त्याचे निकालांत हायकोर्टाचे न्यायाधीश नामदार मर्फी व बार्ली या न्यायमूर्तीद्वयांनीं सत्पन्थाचें स्वरूप वेदांतर्गत किंवा वेदबाह्य हें ठरविण्याचा अधिकार आपला नसून आपण त्यांत हात घालूं शकत नाहीं असें स्पष्ट म्हटलें आहे. तसेच, त्या खटल्यांतील वादी व प्रतिवादी या दोघांनांही सत्पन्थाच्या स्वरूपाविषयींचा निर्णय श्रीमत शंकराचार्यांकडून करून घेतला पाहिजे हें मान्य होतें. असो.

या पुस्तकांत सत्पन्थाचा इतिहास साम्र दिला असून त्याच्या अनेक आचार विचारांचें साधार चित्र रेखाटलें आहे.

खानदेशांत बरेंच दिवस गाजलेल्या सत्पन्थी खटल्याचा निकाल जळगांव फर्स्ट क्लास कोर्टाचे माजी सबजज्ज श्री. सी. जी. खारकर यांनीं विस्तृत-पणें दिला असून त्यांत सत्पन्थी लोकांच्या बहुतेक सर्व-वैदिकधर्माच्या दृष्टीनें अधर्म्य आचारांचे उल्लेख करून मुख्यत: या खटल्यांतील वादी श्री. तोताराम महाजन यांच्या जबाबांतील अनेक कबुल्यांवरूनच सत्पन्थी आचार विचारांना

अवैदिकपणा सिद्ध होतो असा त्यांनीं निर्णय दिला आहे. " पिराणा येथें इमामशहाची जी गादी आहे तीच आम्हां विष्णुची गादी समजतों, या गादीवर जो गादीदार—काका (धर्मोपदेशक) असतो त्याची नेमणूक इमामशहाचे मुसलमान वंशज जे सय्यद ते करीत असतात आणि सत्पन्थी लोकांना त्या सय्यदांस धार्मिक कर द्यावा लागतो " असें या खटल्यांतील वादींनीं आपल्या जबानींत स्वच्छ कबूल केले आहे. कुराणांत सांगितल्याप्रमाणें प्रत्येक महिन्याच्या द्वितीयेस सत्पन्थी लोक उपवास करितात. सत्पन्थी इमामशहाची त्याला अवतार समजून पुजा करतात. इत्यादि इत्यादि. असे अनेक आचार विचार आपला निकाल देतांना कोर्टानें विचारांत घेतले आहेत. त्या निकालावर नामदार हाय–कोर्टाचे न्यायमूर्तीद्वयांनीं जो ठराव लिहीला आहे, त्यांत भोरगांव पंचायतीचे अधिकार व कार्यपद्धति पूर्णपणें कायदेशीर असून सत्पन्थाच्या स्वरूपाविषयीं विचार करण्याचे व निर्णय देण्याचे काम वैदिक धर्माचे जगद्गुरु श्रीमत् शंकराचार्यांचेच आहे ही गोष्ट मान्य केली आहे.

वर ज्या कित्येक सत्पंथविषयक गोष्टींचा उल्लेख थोडक्यांत आम्ही केला आहे त्याबद्दल विस्तृत माहिती या पुस्तकांत त्या त्या प्रकरणांमधून वाचकांस पहावयास मिळेल व ज्यांना अधिक विश्वसनीय म्हणण्यासारखी माहिती हवी असेल त्यांनीं गुजराथ प्रांताचे मुंबई ग्याझेटियर भाग चौथा पान १९० वर पहावी. सत्पन्थाविषयक वाद किंवा हिंदू समाजांत निरनिराळ्या जातींमध्यें होत असलेला प्रसार बंद पडावा म्हणून ज्या संस्थांनीं व व्यक्तींनीं प्रयत्न केले त्यांपैकीं, लेवा पाटीदार जातीची जी,

Book - Gazetteer

भोरगांव पंचायत संस्था

आहे, तिनें फार जोराचा व चांगला यशस्वी प्रयत्न केला हे तीस भूषणावह आहे. या संस्थेचें कर्तृत्व आणि त्या पंचायतीचें लेवा समाजावर असलेलें वजन किती उपयुक्त झालें आहे व भविष्य कालांत होण्याचा संभवही आहे. तें वाचकांस त्यांत आढळून येईल. आपल्याकडे इंग्रजी राज्य होण्यापूर्वी जातींच्या पंचायती संस्था असत व त्या आपापल्या जातींतील प्रत्येक व्यक्तीकडून सामाजिक व धार्मिक बंधनें पाळून घेत व या बाबतींत कांहीं वादग्रस्त प्रश्न असल्यास त्यांचा निकाल धर्मपीठांकडून करवून घेत. इंग्रजी राज्यामुळें राज-

कीय पारतंत्र्याबरोबरच धार्मिक व सामाजिक बाबतींत व्यक्तिव्यक्तींना मनःसोक्त स्वातंत्र्य मिळालें ! त्याचा दुष्परिणाम व्यक्ति व जात यांच्यांतील बंधनें तुटण्यांत झाला व त्यामुळें पंचायतीच्या संस्था क्वचितच कांहीं ठिकाणीं अवशिष्ट राहिल्या आहेत. या संस्थांचें पुनरुज्जीवन होऊन प्रत्येक जातीची पंचायत संस्था पुनः संघटित झाल्यास व तिनें लेवा पाटीदारांच्या मोरगांव पंचायतीप्रमाणें आपल्यांतील व्यक्तींचे व, कुटुंबाचे धार्मिक व सामाजिक बाबतींत नियमन करण्याचें आरंभल्यास कोणत्याही समाजांतील किंवा जातींतील व्यक्तींचे धर्मांतर होण्याचें टळेल. प्रत्येक कुटुंबावर जातपंचायतीची नजर राहील व अशी जात पंचायत समाजाचें संघटन यशस्वी रितीनें करूं शकेल. दुःखाची गोष्ट अशी आहे कीं, पंचायत संस्थांची ही शक्ति आपल्या पुढाऱ्यांनी ओळखली नाहीं ! ती ते ओळखतील तर हिंदुसंघटनाच्या व शुद्धिकरणांच्या वर्तमानपत्रीं चळवळीची त्यांना आवश्यकताच भासणार नाहीं. प्रसिद्ध मुसलमान मिशनरी ख्वाजा हसन निजामी (दिल्ली) यानें 'दाई-ए-इस्लाम' या नांवाचे एक पुस्तक लिहीलें असुन त्याचें भाषांतर 'भयसूचक घंटा' म्हणून रा० गणेश दामोदर सावरकर यांनीं प्रसिद्ध केलें आहे. या पुस्तकांत मुसलमानी धर्मप्रसार कोणकोणत्या मार्गांनी करीत जावा याविषयीं महत्वाच्या सुचना दिल्या आहेत. त्यापैकीं, धर्म प्रसाराच्या चळवळींना प्रसिद्धीचें वावडे त्यांनीं मानलें आहे. तसेंच आसेतुहिमाचल जी मुसलमानीकरणाची चळवळ सारखी चालु आहे. तिचे विविध प्रकारहि या पुस्तकांत दिले आहेत. " सिंध, गुजराथ, काठेवाड, हीं स्थळें अशीं आहेत कीं, त्या ठिकाणीं चालेल ती चळवळ फारच त्वरित यशस्वी होऊं लागते. या प्रदेशांत पिराणा व आगाखानी मिशनें काम करतात, त्यांना आपल्या चळवळींत समाविष्ट करुन घेणें आवश्यक आहे " असें हसन निजामी म्हणतात. या प्रयत्नांचा प्रतिकार यशस्वी रितीनें करण्यास जात पंचायत शाखे - जिच्या हातांत बहिष्कारासारखें अमोघ शस्त्र असतेपडी आहे - दुसरें साधन नाहीं. या दृष्टीनें पाडळशाच्या लेवा पाटीदार पंचायतीनें सतपंथाचें बाबतींत सन १९०६ सालापासून आतांपर्यंत जें समाज नियमनाचें सामर्थ्य दाखविलें तें आमच्या मतें केवळ हितकर व इतर जातींना अनुकरणीय असें आहे.

Book - Bhaysu Ghanta

सुशिक्षित लेवा पाटीदारांस,—

एक सुचना द्यावी असें आम्हांस वाटतें. कोणत्याही समाजाची शक्ति त्याच्या सामुदायिक संस्थामध्यें सांठविलेली असते. समाज नियमन करणारी पंचायत ही अशीच एक संस्था होय. व्यक्तिस्वातंत्र्याचे फाजील स्तोम माजवूं लागल्यास कोणत्याही समाजाची सामुदायिक शक्ति लयाउ जाण्यास अवकाश लागणार नाहीं. ज्या ज्या आधुनिक पद्धतीच्या नवीन संस्था आपण काढीत आहोंत त्या संस्था प्रत्यहीं तंटे बखेडे होऊन दिवसेंदिवस अधिक बेदिली उत्पन्न करीत आहेत. अशा परिस्थितींत हातीं असलेल्या एका संस्थेचे सामर्थ्य वाढत कसें जाईल याचाच विचार वास्तविक सुशिक्षितांनीं करावा व इतरांना धडा घालून देण्याकरितां आपण स्वतः समाज बंधनें व धर्माचार पाळीत जावे. मुसलमान समाजांतील मोठमोठे सुशिक्षित लोक आपल्या धर्माचारांविषयीं किती जपणूक करतात व धार्मिक बंधनांना किती लक्षपूर्वक पाळतात हें हिंदु सुशिक्षितांनीं अवलोकन करण्यासारखें आहे.

शेवटची विनंती

ही प्रस्तावना मर्यादेबाहेर वाढत चालल्यामुळें ती आवरती घेऊन हिंदु समाजांतील ज्या ज्या जातीमध्यें सत्पन्थी व बिनसत्पन्थी असे भेद पडले असतील, त्या जातींतील सर्व सुविचारी सज्जनांस आम्ही एक शेवटची विनंती करतों, ती अशी:—

पिराणा सत्पन्थ हा आपल्या वैदिक धर्माचा भाग नव्हे ही गोष्ट सूर्य प्रकाशाइतकी स्पष्ट आहे ती आतां सत्पन्थी व बीनसत्पन्थी या दोन्ही पक्षांस मान्य असली पाहिजे. अर्थात ती मान्य करून उभयतांनीं एकरूप होण्याचा प्रयत्न करावा. 'गेली ती गंगा व राहिलें तें तीर्थ' अशी एक म्हण आहे. तिला अनुसरून मागचा इतिहास विसरणें व पुन्हां एकजीव होण्याचा प्रयत्न करणें हेंच दोघांच्या उन्नतीस शोभण्यासारखें आहे. ठिकठिकाणच्या सत्पन्थी व बीनसत्पन्थी अशा उभय पक्षांत बरीच श्रीमंत, वजनदार, कर्तृत्व-वान व दूरदर्शी माणसें आहेत. त्यांचा नामनिर्देश जरी आम्ही एथें करीत नाहीं तरी त्या सर्वांविषयीं आमचे मनांत फार आदर आहे येवढें नमूद करून ठेवतों व खरोखर आम्हांस असा भरंवसा आहे कीं, सर्वांनीं मनांत आणल्यास एक वेळ खचित अशी आणतां येईल कीं, सत्पन्थाचें वादविषयक बांडगूळच

काढून टाकून सर्व हिंदुसमाज पुनश्च एकवट करून त्याचें सामर्थ्य वाढविलें जाईल.

' सत्पन्थ रहस्य ' या पुस्तकाची उपयुक्तता

असें होण्यास सुलभ जावें म्हणून रा. सोनु तुकाराम पाटील यांनीं बऱ्याच परिश्रमानें व बहुतेक साधार माहिती गोळा करून लिहिलेलें हें पुस्तक हिंदू समाजांतील प्रत्येक वाचकानें वाचून मनन करावें अशी आमची सूचना आहे. सत्पन्थाचा प्रसार हा एक मुसलमानी धर्मीयांचा संचुप्रवेश होय. असेंच अनेक प्रयत्न निरनिराळ्या स्वरूपानें हिंदुसमाजावर परकीयांचे होत आहेत. मुसलमानी-करणाचे जोडीस अलीकडे हिंदूंचें ख्रिस्तीकरण जोरानें येऊन बसलें आहे व या अनेक चळवळींस तोंड देण्याकरितां हिंदू पुढाऱ्यांनीं

हिंदुसंघटनेचें चिंतन

चालविलें आहे. परंतु हिंदुसंघटन हें अद्याप वर्तमानपत्रीं लेखांमधुन लहान मोठ्या परिषदा भरवून व क्वचित किरकोळ व्याख्यानांमधून जनतेच्या कानांवर पडत असतें. हिंदूसंघटनेच्या चळवळीस अद्याप प्रारंभही झाला नाहीं, असें म्हटलें असतां मुळींच चूक होणार नाहीं. हिंदूसभा व त्यांचे पुढारी जे कांहीं ठराव वगैरे करीत आहेत ते कार्यापेक्षां अकार्य किंवा संघटनेपेक्षां विघटना करीत आहेत कीं काय अशी भीति वाटुं लागली आहे. संघटनेच्या व त्याच प्रमाणें शुद्धीकरणाच्या चळवळींत पडणाऱ्यांना हरएक ठिकाणच्या स्थानिक परिस्थितीचें सम्यक् ज्ञान असावयास पाहिजे असतें. तसें नव्हतें म्हणून तर सत्पन्थाच्या वादांत केसरी, महाराष्ट्र वगैरे पत्रांची दिशाभूल झाली असें स्पष्ट दिसून आलें. म्हणून, आपल्यावर परकी आक्रमणें कशी होत आहेत. (विशेषतः मुसलमानी आक्रमणें कशीं चालू आहेत) तें ज्यांना अभ्यासावयाचें असेल अशा सर्व हिंदुसंघटन वाल्यांनी व शुद्धीकरणवाल्यांनीं प्रस्तुत सत्पन्थरहस्य हें पुस्तक अवश्य संग्रहीं ठेवून, ठिकठिकाणच्या स्थानिक परिस्थितीशीं त्यांतील माहिती ताडून पहावी व त्या धोरणानें आपली प्रचार कार्ये करावींत.

ता० २०-३-३६
जळगांव पू. खा.

द. वा. जोशी
संपादक ' प्रागतिक '

अनुक्रमणिका.

१	दोन शब्द	
२	प्रस्तावना	
३	आत्मनिवेदन	
४	विषय प्रवेश	१
५	सत्पंथाची उत्पत्ति व प्रसार	३
६	सत्पंथाचे संस्थापक	१२
७	इमामशहा	२१
८	पिराणा	२९
९	काका	३२
१०	फैजपूर येथील धर्मशाळा	३५
११	व्याख्या आणि शाखा	३९
१२	सत्पंथाचें सत्यस्वरूप	४३
१३	वेदबाह्य चालीरिती	६७
१४	भुलभुलावणीचें चक्र	७७
१५	बऱ्हाणपूर सत्पंथ	८४
१६	भोरगांव पंचायतींत सत्पंथ	९०
१७	कोर्टांतील फिर्याद	९८
१८	श्रीमत् जगद्गुरु श्री शंकराचार्य संस्थान संकेश्वर व करवीर यांचें आज्ञापत्र	१०२

१९ हिंदुमहासभेचा निकाल १०८

२० सत्पंथाचे टीकाकार ११४

२१ सत्पंथाविषयीं लोकमत ११९

२२ सत्पंथ हिंदुधर्मांतर्गत नाहीं १४१

२३ सत्पंथ आणि हिंदु संघटण १४७

२४ सत्पंथांतर्गत समाजांस विनंती १५१

आत्मनिवेदन.

खानदेश व वऱ्हाडांतील लेवा पाटीदार जातीच्या भोरगांव पंचायतीचें कुटूंब नायकाचें काम मुख्य कुटुंब नायकांबरोबर वेळोवेळीं करण्याची संधी मला येत गेली. त्यामुळें पंचाईतींतील अनेक सामाजिक बाबी संबंधीं मला सर्व नवी जुनी माहिती मिळाली. पंचाईतींत येणाऱ्या अनेक सामाजिक बाबीमध्यें लेवा पाटीदारांत असलेल्या सत्पंथीयांसंबंधीचा प्रश्न सन १९०६ सालापासून येऊं लागला. सन १९०६ सालीं माझ्या अल्पवयामुळें त्यावेळच्या सत्पंथासंबंधींच्या भानगडी मला प्रत्यक्ष पाहतां आल्या नाहींत. तरी पण पंचाईतींच्या रेकार्डांतील कागद पत्रांवरून व वडील माणसें व माजी कुटूंबनायक यांचे सांगण्यावरून मला त्यांचें पूर्ण ज्ञान करून घेतां आलें. सन १९१९ सालीं जेव्हां पुनः सत्पंथीयांचा प्रश्न (सत्पंथीयांना जातींत घेण्याबद्दलचा) उद्भवला तेव्हांपासून मी पंचाईतीस प्रत्यक्ष हजर राहून, पंचाईतीचीं सर्व कामें पाहात होतों. त्यानंतर आतांपर्यंत पंचाईतींतील जाती संबंधींचीं सर्व कामें माझ्या हातांतून पूर्णपणें गेलीं असल्यामुळें त्यांत सत्पंथासंबंधींच्या सर्व प्रकारच्या बाबींचा परिचय झाला. ह्मणून सत्पंथ हें काय गौडबंगाल आहे हें जाणण्याची जिज्ञासा झाल्यावरून सत्पंथासंबंधींचीं पुस्तकें मी वाचण्याचा प्रयत्न केला. सत्पंथाचे खरे धर्मग्रंथ हस्तलिखीत आहेत अर्थात ते मला वाचावयास मिळणें शक्य नाहीं. पण या सत्पंथाची उत्पत्ति गुजराथेंतून झाली असल्यामुळें त्यासंबंधींचें कांहीं तरी लिखाण गुजराथी भाषेंत असावें असें वाटल्यावरून मी गुजराथेंत तपास केला. त्याप्रमाणें ' सत्पंथनी पोल ' ' सत्पंथ शास्त्र ' ' वैदिक इस्लाम इत्यादि पुस्तकें (शेवटीं जोडलेल्या यादीप्रमाणें) मला

Book - Records pertaining to Leva Patidar Bhorgaon Panchayat

Book - Mumbai Ilakhyatil Jati

Book - Ghankosh & Maharashtra Sanvasarika

मिळालीं. व तीं मी पूर्णपणें वाचली. शिवाय मुंबई इलाख्यांतील जाती (लेखक- गोविंद मंगेश कालेलकर), ज्ञानकोशांतील व महाराष्ट्र सांवत्सरिकांतील सत्पंथासंबंधीचा मजकूर, आणि त्याचप्रमाणें केसरी, महाराष्ट्र, आचार्य, प्रागतिक इत्यादि वर्तमान पत्रांतून वेळोवेळीं आलेली अनुकूल प्रतिकुल टीका ही सर्व मी वाचली. व या सर्व सत्पंथ वाङ्मयाचें निरीक्षण करून सदरचें पुस्तक मी लिहिलें आहे.

सुमारें २० वर्षांपूर्वी कच्छ कडवा पाटीदार जातींतील तरूण लोकांनीं आपल्या जातींतील सत्पंथ नाहींसा करण्याबद्दलची चळवळ सुरू केली. त्याकरितां त्यांनीं " कच्छ कडवा पाटीदार युवक मंडळ " घाटकोपर येथें प्रथम स्थापन केलें. नंतर त्याच्या शाखा विराणी, व कराची येथें उघडल्या व या तीन्ही ठिकाणीं कडवा पाटीदारांत असलेला सत्पंथ नाहींसा करण्याबद्दल या युवक मंडळानें फार जारीचे प्रयत्न केले. युवक मंडळाचे पुढारी रा. नानजी देवजी, रामजी राजा, लध्धा विश्राम, जिवराज वालजी व नानजी भाणजी यांनी वेदशास्त्र संपन्न स्व. रामेश्वर मोरारजी यांच्या साह्यानें सत्पंथाविरूद्धची ही चळवळ जोरानें चालवून लक्षावधीं सत्पंथी कडवा पाटीदार लोकांना सत्पंथाचें खरें इस्लामी स्वरूप पटवून त्यांना सत्पंथ सोडावयास लाविलें. त्याच प्रमाणें सुरत जिल्ह्यांत पिराणा सत्पंथ नाहिंसा करण्याकरितां श्री. छीमाभाई मुळाभाई, मुखी श्री. हरीभाई देवा आणि श्री. नारायणजी मास्तर यांनींहीं जोराचे प्रयत्न केले. या दोन्ही चळवळींची माहिती मी मिळविली आहे व तिचा हें पुस्तक लिहितांना बराच उपयोग केला आहे. तसेंच खानदेशांतील

Book - Chhimabhai, Haribhai, Narayan

Book - Meetings of these years 1919, 1922, 1928, 1930 and 1931

लेवा पाटीदार भोरगांव पंचाईतींत सन १९१९, १९२२, १९२८, १९३० व १९३१ या सालांमध्यें झालेल्या पंचाई-तीच्या बैठकींत मी स्वतः हजर होतों. सत्पंथीयांनीं पंचांवर केलेल्या दाव्याचे कागदपत्रही माझ्या पूर्ण अवलोकनांत आले. सन १९३० सालीं श्रीमज्जगद्‌गुरू श्रीशंकराचार्य संस्थान संकेश्वर व करवीर यांच्याकडून सत्पंथ वेदबाह्य आहे, अशा बद्दलचें आज्ञापत्र मिळविणारांत मी एक होतों नंतर सन १९३१ सालीं झालेल्या अकोला येथील हिंदु महासभेच्या परिषदेंस मी स्वतः हजर राहून सभेपुढें सत्पंथाविरुद्धची बाजू व्यवस्थितपणें मांडली. तसेंच हायकोर्टांतील सत्पंथा संबंधींच्या अपिलांतही वकिलास माहिती पुरविण्याकरितां मला बोलाविण्यांत आलें होतें. या सर्व माहितीचा उपयोग मी ह्या पुस्तकांत करून घेतला आहे.

Ask

सत्पंथासंबंधीं असलेली ही माहिती एकत्र संग्रहित करून एकदां पुस्तक रुपानें प्रसिद्ध करावी असें मला चार पांच वर्षा-पासून वाटत होतें. कारण ज्ञानकोश व महाराष्ट्र सांवत्सरिक यांत आलेली सत्पंथाची माहिती एकांगीं व अपुरी आहे असें सत्पंथाचे ग्रंथ वाचल्यावरून मला कळून आलें व सत्पंथा संबंधीच्या मराठी भाषेतील असल्या नवीन संग्रहणीय माहितीच्या पुस्तकाचा उप-योग महाराष्ट्रीय वाचकांस करून घेतां येईल आणि महाराष्ट्रांतील ज्या जातींत सत्पंथ रूढ पावला असेल त्यांनाही या माहितीचा उपयोग खचित होईल म्हणून सदरचें पुस्तक लिहिलें आहे.

दुसरें असें कीं सन १९३५ सालच्या अगष्ट व सप्टेंबर महिन्याच्या उमरावती येथील विदर्भ वर्तमानपत्रांत प्रबोधनकार ठाकरे यांनीं फैजपूर येथील तोताराम बधु महाजन यांच्या सांग-

Record

Book - Article - Satpanth Ani Hindu

ण्यावरून 'सत्पंथ आणि हिंदुसमाज' ही ७।८ लेखांकची लेखमाला प्रसिद्ध केली. ती सर्वस्वी अपुऱ्या व एकांगी माहितीची असून श्री. ठाकरे हे सर्वस्वी लेवा जातीलाच शिव्या शाप देत सुटले. ह्मणून त्यांस सत्वर उत्तर देणें जरूर वाटल्यावरून शक्य तों लवकर सत्पंथाची सर्व माहिती संकलित करून प्रसिद्ध करणें योग्य होईल असें वाटूं लागले. म्हणून सत्पंथाची सर्व माहिती संकलीत केली आहे. ह्यांत कांहीं विषयांवरील माहिती अपुरी वाटण्याचा संभव आहे. सत्पंथाबद्दलची माहिती संपूर्णपणें येवढ्या लहानशा पुस्तकांत देतां येणें शक्य नाहीं. सर्वच माहिती देऊं लागलें तर मोठा ग्रंथ होईल ह्मणून संकलित स्वरूपाची व ठळक मुद्यांची माहितीच तेवढी सदरच्या पुस्तकांत दिली आहे.

वाचकांना येवढ्याशा पुस्तकावरून सत्पंथाबद्दलची खरी-खुरी व विश्वसनीय माहिती मिळेल असें मला वाटतें. मराठी भाषेंत अशा माहितीचें हें पुस्तक प्रथमच येत असल्यामुळें व माझा हा प्रथमचाच प्रयत्न असल्यामुळें सदर पुस्तकांतील न्यूनाधिक्यांबद्दल वाचक मला क्षमा करतील अशी आशा आहे.

करविली तैशी केली कटकट ।
वांकडी कीं नीट देव जाणे ॥ १ ॥
कोणाकारणें हें जालेंसें निर्माण ।
देवाचें कारण देव जाणें ॥ २ ॥

— श्री तुकाराम.

विषय-प्रवेश.

राक्षसः कलिमाश्रित्य, साधूरुपेण तिष्ठति ।
हरिभक्तिमिषेणैव हन्ति धर्मः सनातनः ॥

समाज सुधारलेला असो, मागासलेला असो अगर रानटी असो, तो धर्मावाचून असूं शकत नाहीं, अथवा राहूं शकत नाहीं, समाजाची धारणा हेंच धर्माचें मुख्य लक्षण होय. धर्म हा शब्द धृ—धारण करणें या धातूपासून निघाला असून धर्मानेंच सर्व प्रजा बद्ध झालेली आहे. ज्यानें सर्व प्रजेचें धारण होतें तोच धर्म होय.

धारणाद्धर्ममित्याहुः धर्मो धारयते प्रजाः ।
यत्स्याद्धारणसंयुक्तं स धर्म इति निश्चयः ॥

या दृष्टीनें जगांतील अनेक समाज घटनेंप्रमाणें धर्म मार्ग निरनिराळे जरी असले तरी त्यां सर्वांत सदाचार, नीति, भूतदया परोपकार, सत्यप्रियता, सद्भाव इत्यादि तत्त्वें गोवलेलीं असतातच. हिंदूधर्म अनादि आहे. हिंदुधर्मा इतका जुना धर्म पृथ्वीच्या पाठीवर दुसरा कोणताही नाहीं. ह्मणून इतर सर्व धर्मांतून त्याच्या या वरील मूलभूत तत्त्वांचें अनुकरण अप्रत्यक्षपणें अगर रुपांतर स्वरूपांत ठिकठिकाणीं झालेलें आढळून येतें. पण हिंदुधर्माची अलिकडील सुमारें दीड हजार वर्षांतील स्थिती

पाहिल्यास दोहोंबाजूंनीं जळणाऱ्या मेणबत्ती प्रमाणें तीं झाली आहे, असें वाटतें. हिंदु धर्माचें अनादित्त्व आणि त्या वेळेपासूनचीं अबाधित होऊन राहिलेलीं त्याचीं तीं मूलभूत तत्त्वें, यांच्या योगेंच इतर धर्मांनीं त्याची कुतर ओढ केली. एका बाजूस ख्रिस्ती धर्म तर दुसऱ्या बाजूस इस्लामी धर्म त्यास खची करूं लागले. व तसेंच इतर धर्मांनींही हिंदुधर्माच्या खची करणात अल्पांशानें भाग घेतलाच, पण विशेषतः ख्रिस्ती आणि इस्लामी हे दोन धर्म हिंदुधर्मास जळवाप्रमाणें अद्यापही चिकटून हिंदुधर्माचा सारखा ऱ्हास करीत आहेत.

ज्या अनेक मार्गांनीं या जळवांरुपीं ख्रिस्ती व इस्लामी धर्मांनीं सनातन हिंदुधर्माचें शोषण केलें ते विविध मार्ग कोण ताही सुशिक्षित हिंदु सहज जाणूं शकेल. ख्रिस्ती मिशनऱ्यांचे गोडगुलाबींचे प्रकार तर इस्लामी धर्माचे दंडुकेशाहीचे प्रकार, धर्मांतराच्या बाबतींत हिंदुंना भोंवतच आले आहेत पण नवलाची गोष्ट ही कीं हिंदुंना दंडुकेशाईनें अगर राजसत्तेच्या बळावर इस्लामी धर्मांत ओढण्याच्या अनेक मार्गांत सत्पंथासारखा गोडी गुलाबीनें हिंदुधर्माशीं जुळते घेऊन न कळत हिंदुधर्मास भुंग्याप्रमाणें पोखरणारा मार्गही आढळून येत आहे. व त्याच्या धर्म प्रसार कार्याचें दृश्य स्वरूप आज तागायत खोजा मोमन, वगैरे जाती वरून आढळून येत आहे. आणि तोच आपल्या या पुस्तकाचा मुख्य प्रतिपाद्य विषय होय.

मुसलमान लोक हिंदुस्तानांत येऊन त्यांनीं आज तागायत मुसलमानी धर्म किती आणि कसा पसरविला हें सर्वांस महशूरच

आहे. पण त्यांतूनच या सत्पंथाची एखाद्या बांडगुळाप्रमाणें उत्पत्ति होऊन " बीचमे मेरा चांदभाई " या न्यायाप्रमाणें हिंदू व इस्लामी या दोघांच्या मध्येंच एक धोंड निर्माण झाली. तिचा जरी इस्लामी धर्माप्रमाणें सर्व दूर प्रसार झालेला नाहीं तरी हिंदुस्तानांत ठिकठिकाणीं ती प्रचलित असल्याचें आढळून येत आहे. विशेषतः पंजाब, सिंध, गुजराथ, कच्छ, खानदेश, नेमाड व वऱ्हाड वगैरे प्रांतांत हा सत्पंथ पसरला आहे. सत्पंथ हा हिंदुत्वांत तर नाहींच पण इस्लामी धर्मांच्या तत्वांतही बदल करून निराळींच (इस्लामी धर्माच्या तत्वांच्या अनुरोधानें,) आपलीं तत्वें निर्माण करून " न हिंदुर्न यवनः " असा हा नवीन पंथ मुसलमानांनीं प्रचारांत आणला आहे.

इस्लामी धर्म प्रसारक नूरसत्गोर, पीरशम्स, पीर सदरदीन पीरकबरदीन व इमामशहा यांनीं इराणी इमामांच्या पंथाचा प्रसार करतां करतां हिंदूंना मुसलमान बनविण्याच्या दृष्टीनेंच तो सत्पंथ हिंदुस्थानांत दृढ रोविला. त्यायोगें त्यांच्या मूळ हेतूप्रमाणें मुसलमानी धर्म तर सर्व दूर पसरलाच पण जे उघड रितीनें मुसलमान होऊं इच्छित नव्हते, त्यांना सत्पंथ या नांवाखालीं त्यांनीं जवळ जवळ मुसलमानच बनविलें. हल्लीं असे सत्पंथ (गुप्त धर्म) स्वीकारून तो आचरणांत पूर्ण पाळणारे त्याचे उपदेशक व अनुयायी हे सर्व हिंदुधर्माचे हितशत्रूच होत, असें म्हणणें बिलकूल वावगें होणार नाहीं. लोकांना वरवरून आम्ही हिंदु धर्माप्रमाणेंच वागणारे आहोंत असे ते भासवितात, पण आतून कोणासही न कळत गुप्तरितीनें इस्लामी धर्माप्रमाणें कलमे, नमाज, रोजा, दुवा,

उपवास, दशोंद वगैरे सत्पंथाचीं तत्वें, चालीरिती आणि आचरण हीं रात्रीच्या वेळीं अंधारांत पाळून त्याप्रमाणेंच ते सत्पंथी लोक पूर्णपणें आचरण करतात. कुराणाला अथर्ववेद समजून चवथा खलिफा अली यास ते दहावा अवतार मानतात. अशा या सत्पंथानें ४०० वर्षांपूर्वीं गुजराथेंत व कच्छांत भयंकर धुमाकूळ उडवून देऊन या दोन्ही प्रांतांतील लक्षावधी हिंदु लोक सत्पंथांत ओढले. त्यांच्या सामाजिक चालीरिती बदलविल्या व त्यांना हिंदु धर्मास पराङ्मुख केलें. आणि कालांतरानें हेच सत्पंथांप्रमाणें आचरण करींत करींत खोजा, मोमना इत्यादि नांवाखालीं सर्वस्वीं मुसलमान बनले.

पिराणा सत्पंथाचा मूळ संस्थापक इमामशहा हा आहे. आज हिंदुस्तानांत जे हिंदूधर्मांतर्गत धर्मपंथ प्रचलित आहेत त्यांमध्यें इमामशहाचा पिराणा सत्पंथ येत नाहीं. रामानुज, चैतन्य, कबीर नानक, दयानंद सरस्वती वगैरे लोकोत्तर पुरुषांनीं हिंदुस्तानांत आपापले धर्म व धर्मपंथ निर्माण केले. ते ते पुरुष त्या त्या पंथाचे धर्मसंस्थापक आणि धर्मगुरू मानले जातात. त्याचप्रमाणें इमामशहा पिराणा सत्पंथाचा धर्म संस्थापक आणि धर्मगुरू मानला जातो. पण विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, इमामशहाखेरिज करून वर दर्शविलेल्या सत्पुरुषांनीं स्थापन केलेले धर्म अगर पंथ निराळे जरी मानले गेले तरी त्या सर्व धर्मपंथांची मुख्य उभारणी वैदिक सनातनी धर्मावरच आहे. पण इमामशहाचा पिराणा सत्पंथ मात्र इस्लामी धर्मावर पूर्णपणें उभारला गेला असून पैगंबर महंमद साहेब आणि त्यांचें कुराण हेंच त्याचें आदिमूळ

आहे. वारकरी, स्वामीनारायण, मानभाव, नाथसांप्रदायिक, कबीरपंथी इत्यादि पंथ हिंदुधर्माच्याच निरनिराळ्या शाखा होत. कारण हे सर्व सांप्रदायी पंथ वेद, श्रुति, स्मृति, उपनिषदें, शास्त्रें, पुराणें यांना पूर्णपणें प्रमाण मानून त्यांच्यांत वर्णन केल्याप्रमाणें सर्वांशीं आचरण करतात. पण इमामशहाचा पिराणा सत्पंथ मात्र यांपैकीं कोणासच प्रमाण मानीत नाहीं. सत्पंथाच्या या ब्रह्मदेवानें हिंदुधर्मांतील हीं सदरील नांवें कायम ठेवून व त्याचप्रमाणें त्यांतील कृत, त्रेता, आणि द्वापार या तिन्ही युगांपर्यंतचीं धर्मतत्वें कांहीं प्रमाणांत कायम ठेवून कलियुगापासूनचींच धर्मतत्वें मात्र इस्लामी तत्वांवर आणून पूर्णपणें कुराणांतील तत्वांवर उभारलीं आहेत. अशा प्रकारचा हा परोपजीवि सत्पंथ बांडगुळाप्रमाणें आहे हें वाचकांस पुढील प्रकरणांवरून कळून येईल.

सत्पंथाची उत्पत्ति व प्रसार.

नाना धर्म नाना कर्मे । उत्तमें मध्यमें अधमें ।।
सुगमें दुर्गमें नित्यनेमें । सृष्टीमध्यें चालती ।।

श्रीरामदास.

सर्व धर्मांप्रमाणें इस्लामी धर्मामध्यें ईश्वर एकच आहे असें मानिलें असून महंमद पैगंबर साहेब हे त्याचे प्रेषित असून त्यांनाच हजरत रसुल असें म्हणतात. यांच्यानंतर अबुबकर, उमर, उस्मान आणि अली हे खलीफा झाले. त्यांपैकीं अलीला शिया, इसना-असरी व बोहरा मासुम इमाम म्हणतात आणि नुसेरी आगाखानी व पिराणा सत्पंथाचे लोक ईश्वरी अवतार मानतात. अली हाच शियापंथीयांच्या मतें पहिला खलिफा व इमाम होय. अली नंतर जे शिया पंथी इमाम झाले त्यांपैकीं पांचवा इमाम जाफरसादक यास दोन पुत्र होते. १ इस्माईल व २ मुसाकाजम. शत्रूच्या भीतिस्तव इस्माईल यास शाम नांवाच्या गांवाकडे अगोदरच बापानें पाठविलें असल्यामुळें मुसाकाजम इमाम झाला. पण कांहीं लो-कांनीं इस्माईल यासच इमाम मानिलें त्या लोकांचा पंथ हा इस्मा-ईली होय व मुसाकाजम याचा इसनाअसरी पंथ होय.

हजरत अली नंतर कुराणाचें महत्व इमामांच्या अध्ययना-वरच अवलंबून होतें. अर्थात कुराणाचा संपूर्णपणें अभ्यास करून त्यांतील तत्वांचा शक्य तितका दूर प्रसार करणें हें प्रथमचें आ-पलें कर्तव्य असें प्रत्येक इमामाला वाटत होतें व त्याप्रमाणें ज्यानें त्यानें आपापल्यापरीनें प्रयत्न केले. इस्लामी धर्माची ही उत्कृष्ट शिकवण कुराणांत सांठवून राहिल्यानें इमामांच्या उपदेशाप्रमाणें

त्यांचे अनुयायी इस्लाम धर्मीय लोक, शक्य त्या मार्गांनीं इस्लाम धर्म वाढविण्याचा प्रयत्न जारीनें करूं लागले. अशाप्रकारच्या या अनेक लोकांच्या प्रयत्नांपैकींच सत्पंथ हा एक हिंदुस्तानांतील त्यांचा प्रयत्न होय. इ. स. १४३० मध्यें इराणचा शहा आणि ३० वा इमाम इस्लामशाह यानें पीर सैयद सदरद्दीन ह्यास हिंदुस्थानांत मुसलमानी धर्माची शाखा इस्माईलीपंथ तिच्या प्रसाराकरितां पाठविलें. पीर सद्रुद्दीन हिंदुस्थानांत येण्यापूर्वी नुरसत्गोर, पीरशमसुद्दीन पीर नसीरूद्दीन इत्यादि इस्लाम प्रचारक वेळोवेळीं येऊन गेले होतेच पण हिंदुच्याच भाषेंत आणि हिंदू धर्माला अनुसरून अशा तऱ्हेचा प्रयत्न त्यांना करितां आला नाहीं. म्हणून त्यांनीं फक्त इस्लामी धर्माचाच प्रसार केला. त्यामुळें वाममार्ग व मातापंथ हे इस्लामी स्वरूपाचे पंथ हिंदूत निर्माण झाले होते. पण पीर सैयद सद्रुद्दिन हा हिंदुस्तानांत आल्यावर त्यास ह्या इस्लामी धर्म प्रसाराच्या तयार झालेल्या पूर्व भूमिकेचा चांगला फायदा घेतां येऊन त्यानें हिंदु विद्वानांच्या सहाय्यानें सत्पंथ शब्द निर्माण करून त्या नांवाखालीं इस्लाम धर्माची शाखा इस्माईली पंथ तिचा प्रसार कसून आणि जोरानें केला व त्याच्या त्या वेळेच्या प्रयत्नास पुढेंपुढें चांगलें स्वरूप येऊन हा सत्पंथ हिंदूंत आणि हिंदुधर्मांत इस्लाम स्वरुपानें (पूर्ण मुसलमानी धर्माच्या तत्वांनीं) निर्माण झाला. तोच आज तागायत पंजाब, सिंध, कच्छ, गुजराथ, खानदेश, वऱ्हाड, नेमाड वगैरे प्रांतांतून प्रामुख्यानें आढळून येत आहे.

Ask

"वैदिक इस्लाम" या नांवाचा एक सत्पंथी ग्रंथ इब्राहिम जुसब वरतेजी यांनीं प्रसिद्ध केला आहे. त्यांत सत्पंथाचें स्वरूप आढळून येतें. "हिंदुधर्मामध्यें ईश्वरी अवतार मानतात आणि ईश्वराचें वचन वेद समजतात. त्याचप्रमाणें इमामास ईश्वरी अवतार मानावें आणि इमामाच्या वचनास कुराणाप्रमाणेंच पवित्र मानावें." असें वैदिक इस्लामच्या लेखकानें लिहीलें आहे. सारांश, सत्पंथ म्हणजे हिंदुधर्म व इस्लामधर्म यांच्या मिश्रणाचें एक कडबोळें आहे. हें यावरून स्पष्टपणें कळून येतें.

इस्माईली पंथाच्या प्रसाराकरितां इराणांतील इमामांकडून जे धर्म प्रसारक आले त्यापैकीं कबीरूद्दीन हा एक होय. त्यानें आपला मुलगा इमामउद्दीन यांस धर्मप्रसाराकरितां गुजराथेंत पाठविलें. पहिल्यानें गुजराथेंत इमामशहानें आपलें स्थान स्थीर केल्यावर हळुंहळुं सत्पंथ वाढविण्याचा प्रयत्न सुरूं केला गुजराथ देश सुपीक आणि जनताही साधी भोळी, त्यांना इमामशहाचे सत्पंथासंबंधीचे चमत्कार आश्चर्यकारक वाटले. त्या चमत्कारांस बरेचसे लोक बळी पडले आणि जनतेचाही इमामशहावरील विश्वास वाढूं लागला. त्यावेळेच्या बऱ्याचशा वैदिक हिंदूंनीं इमामशहास अडथळे निर्माण केले पण इमामशहानें आपली ही जादूची कांडी अशिक्षित आणि हलक्या जातीतील लोकांत नकळत पसरविण्याचा प्रयत्न केला व तो यशस्वी ठरला. लेवापाटीदार लोक इमामशहाच्या सत्पंथास प्रथम बळी पडले. विशेषत: कडवा पाटीदारांत हा पंथ घरोघरीं पसरला. इमामशहास आपलें प्रस्थान गुजराथेंत त्यावेळेच्या सुशिक्षित हिंदूंत बसवितां आलें नाहीं. पण

त्यानें आपल्या हातांखालीं आणि आपल्या दर्ग्यांत बरेचसे सैयद या पंथाच्या प्रसाराकरितां तयार करून ठेवले. गुजराथ शेजारील डोंगराळ आणि मागासलेल्या अशा कच्छ प्रांतांत या सैय्यदांनीं आपला गुरू इमामशहा याच्या आज्ञेनें संचार केला. या सैय्यदांनीं सत्पंथी बनलेले गुजराथी आपल्याबरोबर कच्छांत जातांना घेतले होते. कच्छचे त्या वेळेचे कच्छनरेश महाराव श्रीभार मल्लजी यांनीं त्यांचें स्वागत करून आपल्या राज्यांत त्यांस वसतीस स्थान दिलें या सत्पंथी गुजराथ्यांची जसजशी वाढ गुजराथेंत होत गेली तसतसा सत्पंथ कच्छ प्रांतांत पसरला. व कांहीं वर्षांनीं कच्छ देशांत हजारों लोक सत्पंथी बनले.

Shree Bharmalji Ruled Kutch between 1586 - 1632 Source: http://www.chiefacoins Database/ Countries/ Kutch.htm

गुजराथ व कच्छ या दोन्ही भागांतील सत्पंथी लोक मुसलमानी सैय्यदांना गुरू मानून पिराण्याची यात्रा करीत, या याशिवाय विशेष चालिरीती हिंदुधर्म बाह्य नव्हत्या. पण इमाम शहानंतर झालेल्या काकांत जे काका लेवा पाटीदार जातीचे होते त्यांनीं हिंदुचालिरीति आणि सामाजिक रूढी व बंधनें हीं बऱ्याचशा प्रमाणांत सत्पंथी लोकांतून नष्ट करून त्या ऐवजीं त्यांच्यामध्यें सत्पंथाच्या चाली रिती घुसडविल्या. चवदावा काका प्रागजी हा पाटीदार जातीचा होता. तो संवत १८३२ मध्यें कच्छ देशांत आला. तो कच्छांत येण्यापूर्वीं लक्षावधी रुपये दशोंद या कराच्या रुपानें पिराण्यास कच्छांतील सत्पंथी लोकांकडून जात होते. प्रागजी काकानें कच्छ प्रांतांतील लोकांच्या धार्मिक व सामाजिक सर्व चालिरीति बदलून त्यांच्यांत सत्पंथाच्या चालिरीतिप्रमाणें आचारविचार पूर्णपणें मिसळविले. अशारितीनें

Pragji Kaka

सत्पंथाचा प्रसार सुमारें तीन चारशें वर्षांपूर्वी गुजराथेंत आणि कच्छांत झाला. तोच वाढतां वाढतां इतका वाढला कीं जिकडे गुजराथी लोक देशांतर करूं लागले तिकडे हा सत्पंथ प्रसार पावूं लागला.

How Satpanth entered Khandesh

गुजराथेंतून लेवा पाटीदारांचीं सुमारें चार पांचशें वर्षांपूर्वी जीं कुटूंबें खानदेशांत आलीं, त्यांच्या बरोबर हा सत्पंथही खानदेशांत आला. व त्यानें आपलें अधिष्ठान खानदेशांत बसविलें. कित्येक वर्षेपर्यंत खानदेशांतील ज्या जातीमध्यें हा सत्पंथ चालत आला होता त्या लोकांनीं हा सत्पंथ गुप्त राखला. व त्यावेळचा खानदेशस्थ लेवा पाटीदार समाज अशिक्षित व धर्मासंबंधीं उदासीन असल्यामुळें तो पंथ इतर लोकांना कित्येक वर्षेपर्यंत कळलाच नाहीं. पण धार्मिक व सामाजिक चालीरितींत जेव्हां जेव्हां विसंगततेचें प्रत्यंतर येऊं लागलें तसतसा सत्पंथ उघडकीस येऊं लागला व जाती जातींतील सनातनी व धार्मिक लोक त्या संबंधीं विचार करूं लागले. प्रथमतः सत्पंथाचें हें **गौडबंगाल** खानदेशांतील लेवा पाटीदार समाजाच्या भोरगांव पंचाईतींत सन १९०६–७ सालीं उघडकीस आलें. (याबद्दलची सविस्तर हकिकत पुढील प्रकरण 'भोरगांव पंचाईतींत सत्पंथ' यांत पूर्णपणें दिलेली आहे त्यावरून कळून येईल.) तेव्हां पासून सत्पंथ व त्याच्या अनुयायांचें आचरण व चालीरितीही खानदेशांतिल जनतेसमोर हळूं हळूं येऊं लागलीं. लेवा पाटीदार जातींच्या पंचाईतींत हा प्रकार उघडकीस येऊं लागल्यामुळें इतर जातींतही असलेल्या सत्पंथीयांसंबंधी त्यां त्या जातींत सत्पंथासंबंधी चळवळी सुरूं झाल्या. गुजर, माव-

सार, कुणबी, बारी, माळी, शिंपी, सोनार, कुंभार वगैरे जातींत सत्पंथ होता आणि हल्लींही थोड्या बहुत प्रमाणांत अस्तित्वांत आहे.

यावरून दिसून येईल कीं, सत्पंथी अनुयायांच्या लोकसंख्येस या निरनिराळ्या जातींत ज्या लोकांनीं सत्पंथ स्विकारला आहे, त्यांचे आचार विचार हिंदुधर्म बाह्य असल्यामुळें सर्व साधारण जनतेस ते आवडले नाहींत, म्हणून समाजाच्या बहुमताविरुद्ध वागणें व राहणें, हें जसजसें धोक्याचें व अडचणींचें होत गेलें तसतसें त्या त्या लोकांनीं सत्पंथाचा त्याग केला पण निरनिराळ्या सामाजिक भानगडींमुळें हा प्रश्न नुसता एवढ्यावरच थांबला नाहीं तर त्या त्या जातींतील त्या त्या वेळेच्या पुढाऱ्यांनीं सत्पंथासंबंधीचें हें गौडबंगाल हिंदुधर्माधिकाऱ्यांसमोर आणलें व त्यावर श्री. शंकराचार्य, वेदशास्त्रवेत्ते, व इतर हिंदुशास्त्रज्ञ यांनीं सत्पंथ हा वेदबाह्य आहे असें सिद्ध केलें. इतकेंच नाहींतर त्या त्या जातींतील (निव्वळ लेवा पाटीदारांचीच नव्हे तर इतर जातींतीलही) सत्पंथाच्या कांहीं भानगडी कोर्टांतही गेल्या व कोर्टानें सत्पंथीयांच्या विरूध्दबाजूनेच निकाल दिलेले आहेत. Record

कांहीं प्रसंगीं हा प्रश्न हिंदुमहासभेपुढेंही आला, व त्यांतही सत्पंथाचे आचार विचार हिंदु धर्मास अनुसरून नाहींत हें सिद्ध झालें. खानदेशांतील निरनिराळ्या जातींत हा प्रश्न इतक्या Ask धसास लागल्यावर त्या त्या जातींतील कट्टर सत्पंथी मात्र सत्पंथालाच चिकटून राहिले व गरीब, विचारी धोरणी व साधारण परिस्थितींतील लोकांनीं त्याचा (सत्पंथाचा) त्याग केला.

सत्पंथाचे संस्थापक.

हे ज्ञाननिधीचे भुजंग । विषय दरीचे वाघ ।।
भजन मार्गीचे मांग । मारक जे ।। १ ।।

ज्ञानेश्वरी.

महंमद पैगंबर साहेबांनीं मुसलमानी धर्म अरबस्तानांत प्रथम स्थापन केला. त्यांनीं व त्यांच्या नंतर दुसरा खलिफा हजरत उमर यानें या धर्माचा प्रसार तरवारीच्या जोरावर अरबस्तानांत व आसपासच्या देशांत केला. त्या नंतरच्या खलिफांनीं (तिसरा खलिफा उस्मान त्याच्या नंतर चवथा खलिफा अली (पहिला इमाम) व त्यानंतरचे पांच इमाम यांनीं) पैगंबर साहेबांचें प्रसाराचें काम अतिशय जोरांत वाढवून हिंदुस्तानपर्यंत सर्व देशांत मुसलमानी धर्म पूर्णपणें रोवला.

अशा रितीनें हिंदुस्तानच्या शेजारींच मुसलमान धर्म येऊन थडकल्यावर खलिफांसारख्या कट्टया मुसलमानी धर्म प्रसारकांनीं हिंदुस्तानसारख्या प्राचीन वैभवसंपन्न देशाकडे अ-नायासेंच दृष्टिक्षेप केला. त्यावरून त्यांना हिंदुस्तानांत मुसलमानी धर्म प्रसाराची कल्पना सुचली. राज्य कमावण्यापेक्षां धर्म स्थाप-ण्याकडेच खलिफांचें अधिक लक्ष असल्यामुळें हिंदुस्तानांत मुसल-मान आल्यावर त्यांनीं राज्यस्थापनेकडे प्रथमतः बिलकूल लक्ष न देतां हिंदुस्तानांतील जनतेत मुसलमानी धर्माचा प्रसार कसा होईल याचा ते नाना तऱ्हेनें विचार करूं लागले. त्याचवेळीं युरोपच्या पश्चिम भागांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार होऊं लागला



पिराणा सत्पंथ संस्थापक इमामशाहा यांची कबर व त्या कबरेसमोर रहेलवर ठेवलेलें कुराण.

Kuran / Quran

(स. र. पान २०)

Photo has been taken from Book called Satpanth Vijay [ID 147]

होता. त्यामुळें मुसलमान लोकांस अनायासेंच पूर्वेकडे आपल्या धर्माचा प्रसार करण्याची संधि मिळाली. शिवाय हिंदुस्तानच्या संपत्तीवरही त्यांचा डोळा होताच. म्हणून सरतेशेवटीं स्वाऱ्या, मारामाऱ्या व लूट हे उद्देश व धर्मस्थापना हा हेतु असा दुहेरी डाव मनांत बाळगून ते हिंदुस्तानांत शिरले. धनधान्यसुख-समृद्धिच्या त्या काळांत मुसलमानी धर्माची गदा हिंदुस्तानावर आल्यामुळें तिच्याशीं टक्कर देणें हिंदुस्तानांतील निरनिराळ्या राजांस अशक्य झालें. व लढायांत ते पराभूत होऊन मुसलमानांस नाना तऱ्हेची लुट नेतां आली व इस्लाम धर्माचें बीजही हिंदु-स्तानांत त्यांना चांगलें रोवतां आलें.

ह० महंमद पैगंबरानंतर झालेला चवथा खलिफा हजरत अली याचे वेळेपासून इस्लामी धर्मांत शिया व सुन्नी असे दोन पंथ उत्पन्न झाले. चवथा खलिफा हजरत अली यास शिया पंथाचे लोक पहिला खलिफा आणि पहिला इमाम समजून त्यानंतर जे इमाम झाले त्यांना धर्म गुरू मानतात. म्हणजे चवथा खलिफा ह० अली आणि त्यानंतर आतांपर्यंतचे हिज हायनेस **नामदार आगाखान ४८** वे इमाम यांना शिया पंथाचे लोक इमाम समजून धर्म गुरू मानीत आले आहेत. शिया पंथाचा पहिला इमाम ह० अली याच्यानंतर झालेल्या पांच इमामांनीं इस्लामी धर्म प्रसाराचें काम आपापल्या देशांतच चालविलें. पण सहावा इमाम हजरत इस्माईल यानें इस्लामी धर्म प्रसार करण्याचें काम इतर बाहेर देशांतही केलें. सत्पंथ हाही या शिया पंथांतीलच एक भाग आहे.

(१) सहावा इमाम हजरत इस्माईल यानें नूरसत्गोर नांवाच्या इस्लाम–धर्म–प्रवर्तकास सन ७६५ मध्यें हिंदुस्तानांत इस्लामी धर्माचा प्रसार करण्याकरितां पाठविलें. प्रथमच तो पाटणा येथें आला. व तेथील राजा सिद्धराज जयसिंग यास त्यानें इस्लामी धर्माचा बोध केला व जनतेसही तो इस्लाम धर्माच्या गोष्टी सांगूं लागला.

त्या वेळचे हिंदुलोक हे जात्याच धर्म श्रद्धावान्, भोळे व अडाणी असल्यामुळें त्याला असें कळून चुकलें कीं " इस्लामी धर्म स्विकारण्यांत तुमचा तरणोपाय आहे असें हिंदूंना उघडपणें सांगणें यशस्वी होणार नाहीं." म्हणून त्यानें त्यांची भोळीं मनें दिपतील असे विचित्र चमत्कार करण्यास व सांगण्यास सुरवात केली.

तो तेथील हिंदुच्या एका मंदिरांत गेला. मंदिरांत देवाचे पुजारी होते. नूरसत्गोर हा यवन (मुसलमान) मंदिरांत शिरून सर्व भ्रष्ट करण्याच्या विचारांत आहे असें पाहतांच पुजाऱ्यांनीं त्याला अडविलें. त्यावर नूरसत्गोरानें हमरी तुमरी न करितां शांत-पणानें पुजाऱ्यांस विचारिलें कीं, " तुमचे देव बोलतात काय ? बोलत असतील व जर त्यांच्यांत कांहीं सत्व असेल तर त्यांना माझे बरोबर भाषण करण्यास सांगा " त्यावर पुजाऱ्यांनीं उत्तर दिलें कीं, " मूर्ती कोठें बोलत असतात काय ? " त्यावर नूर-सत्गोरनें सांगितलें कीं, " तुमच्या मूर्ती (देव) बोलत नसतील तर त्यांच्यांत देवत्वच नाहीं. मी मूर्तीशीं बोलतों व त्यांना जें जें

सांगेन तें तें त्या करितात कीं नाहीं हें बघा " ! असें ह्मणून त्यानें मूर्तींना नाचण्यास व गाणें ह्मणण्यास सांगितलें. त्याक्षणींच मूर्ती गाऊं व नाचूं लागल्या. हा चमत्कार पाहून सर्व पुजारी व इतर लोक आश्चर्यचकित झाले. शहरचा राजा सिद्धराज व त्याचे गुरु कानिफा यांना पुजाऱ्यांनीं हा चमत्कार दाखविण्यास बोलावून आणलें. राजा व राजगुरु यांनीं मूर्ती नाचतात व गातात हें पाहिल्यावर तेही आश्चर्यचकित झाले. तदनंतर पुनः राजाला व राजगुरूला आणखी चमत्कार दाखविण्याकारितां नूर-सत्गोरनें त्या मंदिरांत असलेल्या गणपतीच्या मूर्तीस मंदिरा शेजा-रच्या सरोवरांतून पाणी आणण्यास सांगितलें. त्याप्रमाणें गणप-तीच्या मूर्तीनें पाणी आणिलें. हें पाहून राजाला अतिशय आश्चर्य वाटलें. राजाच्या व राजगुरूच्या समक्ष नुरसत्गोरनें त्या मूर्ती बरोबर पुष्कळ गोष्टी केल्या. मूर्तींनीं नूरसत्गोरला माणसासारखीं उत्तरें दिलीं. त्या उत्तरांपैकींच पुढील एक उत्तर आहे.

" माया जाळांत पडलेल्या मनुष्यांनों, एकाच खुदाची पुजा केली पाहिजे आणि तोच एक खुदा पुजा करण्यास आणि भक्ति करण्यास योग्य आहे. " नूरसद्गोरनें राजाला व सर्व लोकांना असले चमत्कार दाखविले व अशा प्रकारच्या बनावटी गोष्टी रचून मूर्तीवरील विश्वास उडविण्याचा प्रयत्न केला. अशा तऱ्हेनें हिंदूदेवांच्या पवित्रतेस कमीपणा आणणें हेंच कार्य नूरसद्गोरनें केलें व त्या प्रमाणें कांहीं अज्ञ हिंदू फसलेहि.

(२) नूरसतगोर प्रमाणेंच पीरशमसुद्दीन हा त्याच सुमारास इस्लामी धर्माच्या अनेक प्रचारकांपैकीं एक हिंदुस्तानांत आला होता. त्याच्याही कांहीं बनावटी व अविश्वसनीय गोष्टी कांहीं ग्रंथांतून लिहिलेल्या आढळतात. त्यापैकींच एक गोष्ट अशी कीं, एकदां पीरशमसुद्दीन यास भूक लागली म्हणून एका कसायानें त्याला त्याची भूक शमविण्याकरितां सव्वाशेर कच्चें मांस दिलें. कच्चें मांस भाजून खाण्याकरितां त्याला अग्नी मिळेना म्हणून आकाशाकडे पाहून तो सूर्याला हाणाला,

" आव तुमबी शमसहो, और मेबी शमसहूं "

भावार्थः—ये तूंही शमस आहे आणि मीही शमस आहें. असें म्हणतां क्षणींच सूर्य खालीं आला. तेव्हां पीर शमसनें तें मांस भाल्याच्या टोकाला टोंचून सूर्याच्या उष्णतेनें भाजून घेतलें व सूर्याला परत जाण्यास सांगितलें. त्याप्रमाणें सूर्य निघून गेला. ह्या सर्व असंभवनीय व कल्पित गोष्टी आहेत पण आपल्या अनुयायांना ह्या मोठ्या बढाईनें सांगून नूरसतगोर प्रमाणें यानेंही असत्या गोष्टीद्वारें भोळ्या हिंदूंना फसविलें. शमसुद्दीननें हिंदुधर्मावरील व मूर्ती पुजेवरील विश्वास उडविण्याकरितां कांहीं गाणींही रचलीं आहेत त्यांपैकीं एक खालीं देत आहें.

" भुला म भुले मम जोरे हिंदुओ—जुओछो शुंशुं मरम
पथर पुजता शुं पामेरे हिंदुओ — माथेली ओ छो करम
फूल चडावोछो पथरनेरे हिंदुओ—भुली मजा ओगे मार
भुले जे वणशे सारथेरे हिंदुओ — तो कीया नपामे ठाम

त्रणवेद जेथे अवतारे हिंदुओ – वही गयो अक्सर जेह
वही गया नवअवतार आरे हिंदुओ–थी आवो तमे छे जेह
वही गया भामण ब्रह्मी आरे हिंदुओ– थया हुसेनी इमाम
वही गया पुजा गउतणीरे हिंदूओ– पूजा अलीजीने नाम
अडसठ तीरथ चढ गयारे हिंदुओ--ते कला भरमा भरपूर
बोहोत भमीने शुं फीरोरे हिंदूओ-- पीओ तमे नीरमळनीर
माथा पथर माहेशुं हणोरे हिंदुओ -- ओळखो नर कासम
शाइ अवतार

केहक नगरीमाहे जे रहेरे हिंदुओ- ते साहेब वर दातार
तेने आराधतां छुटशोरे हिंदुओ- साचो कहुं तमने आज
वासो वैकूंठ पामशोरे हिंदुओ-- करशो ते अविचल राज
हुरांपचास तमे पामशोरे हिंदुओ- लशो जो सतपंथ धरम
गतमाहे पाप छोडावजोरे हिंदुओ- तो टळशे सगरां करम
पीर शमस अेम भाखे आरे हिंदुओं- कहुंछुं ते छेल्ली वाण
भुले म भुले मुरखारे हिंदुओ- सेवो ते सारंग पीराण

भावार्थः– “ हिंदुलोकांनो, तुम्ही भुलूं नका. काय काय सत्य आहे तें पहा. दगड (मूर्ति) पूजल्यानें (फुले, गंध, अक्षता वगैरे त्यावर टाकल्यानें) तुम्हांला काय मिळणार आहे ? हा निव्वळ तुमचा भोळेपणा आहे. निर्माण झालेले तीन वेद लयास जाऊन नऊ अवतारही नाहिसे झालेले आहेत. आणि जो तुम्ही ब्रह्मा म्हणतात तोच हल्लीं अलीरूपानें असून पूजा करण्यास योग्य आहे. ६८ तिर्थांचें महत्व नाहीसें झालें आहे.

दगडांच्या मूर्तीच्या पाया कां पडतां? नरकाशम शाहा अवतार हाच वंदनीय समजून हिंदू लोकांनों, इतरांस तुम्ही बळी पडूं नका." असा वरील पद्यांचा सारांश आहे.

(३) पीरशमस नंतर जे इस्लामी धर्माचे प्रचारक झाले त्यामध्यें सय्यद सदरूद्दीन हा एक होऊन गेला. त्याची विशेष माहिती मिळत नाहीं परंतु हा नूरसतगोरच्या वंशजांतील होता. ही हकिकत पुष्कळशा पुस्तकांतून लिहिलेली आढळते. इं. स. १४३० मध्यें त्याला इराणचा शाह इस्लामशहा यानें इस्लामी धर्माचा प्रसार करण्याकरितां हिंदुस्तानांत पाठविलें. त्या वेळेला हिंदूलोकांची धार्मिक परिस्थिती पाहून त्याला असें आढळून आलें कीं, हिंदूलोक उघड उघड मुसलमान होऊं शकणार नाहींत म्हणून हिंदु धर्माचाच अभ्यास करून त्यांतील तत्वें इस्लामी धर्मांतील तत्वांस जोडण्याचा प्रयत्न करून हिंदूलोकांना फसविल्याशिवाय आपला कार्यभाग होणार नाहीं. या हेतूप्रमाणें दिसावयास हिंदू व अंतस्थ इस्लामी असा त्यानें प्रयत्न सुरू केला.

पीरसदरूद्दीन याचा हा प्रयत्न सहदेव नांवाच्या एका वेदशास्त्र संपन्न हिंदू पंडिताच्या साहाय्यानें सिद्धीस गेला. सहदेव हा मूळचा पंजाबांतील अत्यंत विद्वान् व हिंदूशास्त्रांचा पूर्ण अभ्यास केलेला असा एक जहागीरदार होता. लुटालुटीच्या काळांत मुसलमानांनीं त्याची सर्व इस्टेट लुटली व त्याला पकडून अरबस्तानांतील तुरूंगांत कोंबून दिलें. सहा महिने तो कैदेंत होता. तूं

मुसलमानी धर्म स्वीकारशील तर तुला सोडून देतों असें मुसलमानांनीं त्यास सांगितलें. पण तो तयार होईना. ह्मणून त्याची अत्यंत क्रूरपणें मारहाण केली. तेव्हां निरुपायास्तव तो कबूल झाला. व त्याप्रमाणें तो मुसलमान बनल्यावर त्याला मुक्त करण्यांत आलें. पूर्ण मुसलमान बनल्यावर तो हिंदुस्तानांत आला. पण त्यास पुन: हिंदू होणें शक्य न झाल्यामुळें त्यानें इस्लाम धर्माचा अभ्यास केला व त्यांतही तो विद्वान झाला. पीरसदरूद्दीननें ही संधी साधली व त्याच्याशीं दोन्हीं धर्मांबाबत चांगला वादविवाद करून दोघांच्या सल्लयानें हिंदू व मुसलमानी या दोन्हीं धर्मांचीं तत्वें एकत्र जमतील असा अर्धदग्ध "नहिंदूर्नयवन:" सत्पंथ स्थापन केला. पण त्यांत उत्पत्तीच्या किंवा स्थापनेच्या मुळाशीं हिंदूधर्म दृष्ट्या विशेष विचार न करितां इस्लामी धर्माचाच सर्वस्वी समावेश केला गेला.

See how Hindu religious books were corrupted and who did it.


पीरसदरूद्दीन यानें सहदेवासारख्या हिंदु व मुसलमान धर्म शास्त्रज्ञाच्या सल्लेनें या हिंदुंना फसविणाऱ्या कुटिल पंथाचें हिंदु लोकांत बीजारोपण करून तो आज तागायत टिकून राहील अशीच त्याची उभारणी केली व पुष्कळशा हिंदुंना (अजाण व अडाणी) हा सत्पंथ मोक्षाला जाण्यास अगदीं सरळ व साधा मार्ग आहे अशी भुलथाप देऊन या पंथांत ओढलें.

(४) पीर कबीरुद्दीन हा पीरसदरूद्दीनचा मुलगा होता. याचा जन्म हि. स. ७३१ (इ. स. १३३०) मध्यें झाला. पीरकबीरूद्दीननें आपला बाप पीरसदरूद्दीन कडून आपलें सत्पंथी धर्माचें

पूर्ण ज्ञान करून घेतलें होतें म्हणून त्यानें सत्पंथाचा प्रसार करण्याकरितां आपलीं सर्व मुलें पंजाबाबाहेरील निरनिराळ्या प्रांतांत पाठविलीं. कबीरूद्दीनचें कुटुंब फार मोठें होतें. त्यास सात बायका असून सतरा मुलें व एक मुलगी होती. व तिचें नांव बुढाई होतें. एवढें मोठें कुटुंब त्याला एकत्र ठेवून पोसण्यास जड जात होतें. म्हणून आपल्या प्रत्येक मुलास त्यानें निरनिराळ्या प्रांतांत सत्पंथाचा धर्म प्रसार व त्याद्वारें त्यांचें उदरंभरण या दृष्टीनें पाठविलें.

त्यानें सत्पंथाचे कांहीं ग्रंथ लिहिले आहेत. सत्पंथी लोक ते ग्रंथ मान्य करून त्याप्रमाणें आचरण करितात. त्यानें स्वतः सत्पंथाचा विशेष प्रसार जरी केला नाहीं तरी त्याचा मुलगा इमामशहा ह्यानें गुजराथेंत येऊन पिराणा सत्पंथ स्थापन केला. तोच पिराणा सत्पंथ कायमच्या व मोठ्या स्वरूपांत दिवसेंदिवस वाढला व तोच आज तागायत टिकून असून गुजराथेंतील व महाराष्ट्रांतील सत्पंथी लोक त्याचे अनुयायी आहेत.

—×—



पिराणा येथील इमामशहाचा मोठा दर्गा.

(स. र. पान २९)

realpatidar.com

इमामशाहा

सत्पंथाचा मुख्य प्रवर्तक **सैय्यद इमामशहा** हा एकटाच नसून त्याचे अगोदर नूरसतगोर, पीरशम्स, पीरसदरूद्दीन व **कबीरूद्दीन** (इमामशहाचा बाप) यांच्या प्रमाणेंच **शिया इमामी इस्मायली पंथाचा** (हिंदूंना ज्या धर्मांत बाटवून खोजे, **शमसी,** मतिया, मोमना व आगाखानी बनविलें तो शिया इमामी इस्मायली ह्मणजेच सत्पंथ) हा एक प्रवर्तक होता.

Birth of Imamshah

इमामशहाचा जन्म हि. स. ८५६ इ० स० १४३८ त पंजाबांत उंच ह्या गांवीं झाला उंच हा गांव भागलपूर राज्याच्या अहेमदपुर परगण्याच्या ताब्यांतील आहे. तो पंजाबांतून गुजराथेंत आला. याबद्दल त्यानें केलेल्या आपल्या आत्मवृत्तपर "जिन्नतनामा" ग्रंथांत खालील प्रमाणें माहिती आहे.

Uch Sharif, Near Bahawalpur, Pakistan. https://goo.gl/maps/6r6M3

" आज उंच मुलकजे कहीये । त्या अमारो छे ठार
तेनाथी पीर हसन कबीरद्दीन गुरू हुवा । तेने कीधो विस्तार
उंच मुलकथी प्रबोधीया । तेणें राख्यो शाहासु वेवार
हिंद फेरी तेणे मुसलमान कीधा । अने कीधा ते बहू अपार
तेने मुसलमान करी गुरूअे बोधीआ । तेणे राख्यो शाहासुं वेवार ॥
ते वारो हतो श्री इसलाम शाहानुं । ब्रम्हा'ते पीर हसन कबरद्दीन जाण,
अढार फरजंद तेना कहीये । अने सात हुरम तेना प्रमाण.
अेक तेनी बेटी कहीअे । बाई बुढाई तेनु नाम.

जाफरी तेनो मजहब कहीये । जाफर सादक कहे इमाम.
अलीशाहा हमारो दादा कहीअे । अने दादी ते बीबी
फातमत सार.
हसन हुसेन शाहा अलीना कहीये । आल इमाम तेनु परिवार.
रसुल हमारो नानुं कहीये । ते अबदलानुं परिवार.
बीबी अमानी तेनी माता कहीये । ते कहीअे अबदलानी नार
बीबी खतीजत कुबरा नानी कहीअे । तमे जुओ ते अेलम
विचार.
समजु हशे ते समजशे । अने भुल्या मुरखे गमार.
आल इमाम तेना गुरू जाणजो । तेनु तात पीरहसन
कबीरदीन जाण.
त्यारे नुरशाहानी वार छे— अेम बोलीया पीर इमामशाहा
प्रमाण ”

सारांशः—उंच गांव हें आमचें ठिकाण होय. तेथें पीर कबरदीन नांवाचा गुरू होऊन गेला. त्या वेळेस इस्लामशाहा हा इमाम (ईश्वर अवतार) असून पीर कबरदीन हा (धर्मप्रवर्तक) ब्रह्मा होय यानें अनेक हिंदु मुसलमान केले. त्यास १८ मुलें व ७ स्त्रिया होत्या. एक बुढाई नांवाची मुलगी होती. त्याची मजहब (जात) जाफरी होय, हजरत अली हा आमचा दादा व बीबी फातमा ही दादी असून हसन हुसेन हीं त्यांचीं मुलें होत. व सर्व इमाम त्यांचाच परिवार होय. रसुल (हजरत महंमद पैगंबर) हे आमचे नाना असून बीबी अमीना (अबदूल्लाची स्त्री)

Bibi Fatima / Shakti -Also See Page 46, 60 & 81 of 186

त्यांची माता होय. बीबी खतीजा (ह. पैगंबर यांची स्त्री) ही आमची नानी होय. आणि आमचा बाप पीरकबरद्दीन होय.

इमामशहा हा कबरूद्दीनच्या ३ ऱ्या बायकोचा २ रा मुलगा असून त्याचें जन्म नांव सय्यद अबदुल रहीम होतें. तारुण्यांत त्यास इमाम ह्मणत. नंतर इमामुद्दीन असें नांव प्रचारांत येऊन त्याच्या शिष्यांनीं त्यास इमामशहा हें नांव दिलें. कबरूद्दीननें इमामशहाला गुजराथेंत पाठविलें. तो गुजराथेंत येतांना सिंधप्रांतांत जीनबदीना येथें आला. तेथें पूर्वी बनलेल्या सत्पंथीं खोजांनीं त्याची कांहीं व्यवस्था न करितां त्यास काढून दिलें ह्मणून तो इराणी इमामांची मर्जी संपादण्याकरितां इराणमध्यें गेला. तेथें केक नांवाच्या गांवीं इस्लामशहाची गादी होती. त्यांच्या तैनातींस राहिला. तेथून शहाची परवानगी घेऊन गड अलमोतकडे गेला. तेथें **हसनबीनसब्बाहचा बनावटी जिन्नत म्हणजे स्वर्ग** पाहिला. ही हकिकत फारच अतिशयोक्तिनें इमामशहानें जिन्नत नाम्यांत सांगितली आहे. खरोखरीचा स्वर्ग पाहून आल्याची व आपले मेलेले सर्व पूर्वज तेथें पाहिल्याची बतावणी करून सत्पंथ धर्माप्रमाणें ज्यांनीं आचरण केलें ते सौख्यांत व आनंदांत आहेत ज्यांनीं सत्पंथाप्रमाणें आचरण केलें नाहीं अगर सत्पंथ धर्मांत दशोंद न देतां मेले ते यातना भोगीत असून अत्यंत दुःखांत आहेत असें या जिन्नतनाम्यांत त्यानें वर्णन केलें आहे. **गडअलमोतचा** बनावटी स्वर्ग पाहिल्यावर त्याच्या काकाचा ताजदीनचा खून झाल्याचें ऐकून तो बरोबर हाजरबेग हा शिष्य घेऊन संवत

Date

Patan

१५०८ च्या भाद्रपद महिन्याच्या शु० ११ स तो गुजराथेंत अट्टणा गांवीं आला व तेथील एका मशिदींत मुक्काम केला. मशिदींत आल्यावर इमामशहानें नमाज न पढल्यामुळें मुसलमानांनीं त्यास विचारलें असतां त्यानें मशिदीच्या मिनारालाच नमाज पढावेण्यास लाविलें. ही अफवा गावांत पसरून ती बादशहा **महंमदबेगडा** यास कळली म्हणुन त्यानें सैय्यद इमामशहास बोलाविलें व त्यास खुष केलें. तेथून इमामशहा बादशहाची मर्जी संपादून त्यांच्या राज्यांत अमदाबादेजवळ गिरमथा येथें आला. तेथेंही त्यानें दुष्काळ नाहिंसा करून एका पाटलाच्या मृत पुत्रास सजीव केलें. पाटीलबुवा खुष होऊन इमामशहास ते त्याबद्दल मोठें बक्षिस देऊं लागले पण इमामशहानें त्या पारितोषिकाचा अव्हेर करून पाटलास मागितलें कीं, मी ज्या पडीत जमिनीवर तीर फेकेन तें ठिकाण माझ्या सत्पंथाला वसति करण्यास दे. त्याप्रमाणें पाटील कबूल होऊन इमामशहानें ज्या अरण्याच्या जमिनींत तिर फेकला त्या ठिकाणीं इमामशहानें आपलें स्थान स्थिर केलें आणि संवत १५२४ मध्यें त्याच ठिकाणावर पिराणा येथील भव्य दर्ग्याचा पाया रचला. हें ठिकाण गिरमथा गांवाजवळच आहे. आपल्या **सत्पंथाच्या प्रसाराच्या कार्याकरितां हेंच ठिकाण त्यानें ठरविलें.** त्या ठिकाणाहून त्याचा प्रसार सुरूं झाल्यावर त्या ठिकाणासच पुढें **पिराणा** नांव प्राप्त झालें. पिराण्यासच सत्पंथी लोक **इमामपूर, हेमपूर, इमामशहाचा** रोजा, **पिराणासंस्थान** वगैरे नांवें देतात. इमामशहाचें लग्न महंमद बुखारी भडीयादवाला याची मुलगी

खजीबाबीबी हिच्याशीं संवत १५१२ मध्यें झालें. त्याला आलमशहा (खालकशाहा) बाकरशाहा, बालाशाहा व नूरमहमदशाहा असे चार पुत्र होते व शम्स खातून नांवाची एक मुलगी होती. या पांच मुलांपैकीं चार मुलें त्यांच्या हयातींतच वारलीं.

मोठा पुत्र आलमशाहा (खालकशाहा) याचा दर्गा गुजराथेंत कडी प्रांतांत पाटणा येथें आहे. तेथें रजब महिन्यांत १५ व्या तारखेस उरूस भरतो त्याचे भक्त कंदोई, भावसार मोदघांची वगैरे आहेत.

(२) बाकरशाहाचा दर्गा अमदाबादेस जुना चार तोंडाचा कबरस्तानांजवळ आहे. त्याचे भक्त मुमना आहेत.

Khambhat

(३) बालकशाहाचा दर्गा खंबायत येथें नारंगसर तलावाच्या कांठीं आहे व जवळच शम्स खातूनची कबर आहे. याचे भक्त सेदखानी म्हटले जातात मुसलमान, कुंभार काछीया, कडीया वगैरे त्यांचे मुरीद (शिष्य) आहेत. ते पिराण्याच्या सैयदांना दशोंद देतात.

(४) इमामशहानें आपला चौथा पुत्र नूरमहंमदशहा याला विष्णु भगवान व स्वतःला सत्गोरब्रम्हा असें सत्पंथी शास्त्रांत लिहीलें आहे.

नूरमहंमदशहानंतर आतांपर्यंत इमामशहाचे जे वंशज होत आले आहेत त्यांना आणि इमामशहाच्या वेळीं त्याच्या असलेल्या भाऊबंदांच्या आजपर्यंतच्या वंशजांना सैय्यद असें म्हणतात. हे सैय्यद इमामशहानें स्थापन केलेल्या पीराणा

सत्पंथाप्रमाणें आचरण करीत नाहींत आणि तो कोणत्याही प्रकारें मानींत नाहींत व ते सैय्यद निव्वळ इस्लामी धर्माप्रमाणें आचरण करून राहतात. सत्पंथाच्या कोणत्याही ग्रंथाला प्रमाण न मानतां फक्त कुराणालाच ते प्रमाण समजतात. याच सय्यदांना सत्पंथी लोक गुरू करतात.

इमामशहा आपलें स्थान गिरमथा गांवाजवळील तीर मारलेल्या ठिकाणावर धर्म प्रवर्तकाचें कार्य व स्थान कायमचें निश्चित करण्याकरितां गेला. त्याच्या मुळथापणीस बळी पडलेल्या अनेक लोकांपैकीं पांच इसम प्रामुख्यानें होते. १ नाया कोळी (मुळचा लुटारू व जातीचा कोळी प्रथम सत्पंथ धर्म स्वीकारून इमामशहाला सत्पंथ प्रसाराच्या बाबतींत प्रामुख्यानें मदत करणारा) २ भाभाराम [हा पेटलाद या गांवचा रहिवाशी असून इमाम-शहाचा गाडी हांकणारा होता. जातीनें कालिकोचि पाटीदार] ३ कीकीबाई [भाभारामची बहीण व इमामशहाची स्वयंपाकीण] ४ शाणाकाका [लेवा पाटीदार] ५ हाजरबेग [इमामशहाच्या खास तैनातीतला असून त्याचा संरक्षक होता.] असे पांच मुख्य सहाय्यक इमामशहाचे होते. यांच्याच पूर्ण सहाय्यानें इमामशाहानें आपलें गुजराथेंतील उद्दिष्ट कार्य व हेतू पूर्णत्वास आणिले

आपलें उद्दिष्ट कार्य यशस्वी झाल्यावर या पांच शिष्यांना इमामशहानें जवळ बोलावून ह्मटलें, तुम्ही माझी सेवा केल्यामुळें प्रसन्न होऊन मी तुम्हाला पूर्व जन्माची हकिकत सांगतों. मी इमामशहा पूर्वजन्मीं शुक मुनी होतों,

Kanam

[१] नायाकाका-श्रृंग ऋषींचा शिष्य होता. भाभाराम परिक्षित राजा होता. तो शिकारीस गेला असतां ऋषींच्या गळ्यांत मेलेला सर्प टाकल्यामुळें त्या चेल्यानें म्हणजे हल्लींच्या नायाकाकानें शाप दिला. म्हणून तुह्माला जन्म घ्यावा लागला. आतां तुम्हां सर्वांना मी परितन (पिराचा अधिकार) देतों असें ह्मणून नायाकाकाला नसीरुद्दीन नांव ठेवून त्यास काका हा किताब देऊन कानन जिल्ह्यांत कुकसगांवीं गादी स्थापण्याची आज्ञा केली. तो तेथें गादी स्थापून राहिला व मेला. त्याचे कबरेवर रोजा बांधला आहे. तेथें भाद्रपद शु॥ २ ला मेळा भरतो. त्यांची जात मुमना पाटीदार ह्मटली जाते. ही नायाकाकाची गादी पिराणा सत्पंथाची एक शाखा आहे.

Kukas

Charotar

[२] भाभाराम— यास इमामशहानें चरतर जिल्ह्यांत जाण्यास सांगितलें. त्यानें पेटलाद प्रगण्यांत नडीयाद तालुक्यांत देवा येथें गादी स्थापिली.

(३) तेथून एक मैलावर ' कीकीबाईनीरोण ' नांवाचें गांव बसवून तेथें किकीबाईनें आपली गादी स्थापिली. दोघांच्या कबरींवर रोजे आहेत. त्यांचे वंशज काका नांवानें ओळखले जातात.

(४) हाजरबेग— हा फार जुना इमामशहाचा एकनिष्ट सेवक होता. त्याला सांगितलें माझ्या मृत्यूनंतर लवकरच तूं मरशील. उन्हाळ्यांत वाटेल तितका उष्मा असला तरी तुझी (हाजरबेगची) कबर शीतल राहील व भक्त पहिल्यानें तुझ्या

कबरीला फूल चढवून नंतर ते माझ्या (इमामशहाच्या) कबरीला फुलें चढवतील. व त्याप्रमाणेंच रिवाज सुरू झाला.


(५) शाणाकाका-हा लेवा पाटीदार होता. इमामशहानें त्याच्या नंतर पिराण्यास सत्पंथाच्या गादीवर यास बसविलें. याच गादीचे शिष्य फैजपुरास व इतरत्र आहेत.

इमामशहानें आपल्या सत्पंथ धर्माचा प्रसार करून तो कायम राहण्याकरितां श्रष्टीनुमंडाण, बौध्यावतार, नकलंकीअवतार षट्दर्शनें, मूळबंध वगैरे सुमारें ३५ लहान मोठे ग्रंथ गुजराथी व हिंदी भाषेंत लिहीले. या सर्व ग्रंथांतून त्यानें आपल्या पिराणा सत्पंथाचीं सर्व प्रकारचीं तत्त्वें गोवलेलीं असून आपल्या भावी अनुयायांना पूर्णपणें समजावें असें सत्पंथाचें सत्स्वरूप दिलें आहे. पिराणा सत्पंथाचा मूळ आधार हेच ग्रंथ होत. गुजराथेंतील व महाराष्ट्रांतील हल्लींचे सत्पंथी अनुयायी ह्याच ग्रंथाप्रमाणें वागून धर्माचरण करतात.

सय्यद इमामशहा हिजरी सन ९१९ मध्यें रमजानच्या २५ तारखेस (इ. स. १५१३) मरण पावला व त्याचें प्रेत पिराणा येथें पुरून त्यावर एक सुंदर पक्की कबर बांधिली आहे. तेथें या दिवशीं दरसाल मोठी यात्रा भरत असते. शिवाय वर्षांतील दरमहिन्याच्या द्वितीया तिथी, गोकुळअष्टमी, घरोअष्टमी आणि भाद्रपद शु० ११ या दिवशीं मोठे उरूस भरत असतात.

—— —— × —— ——

Book - Various Religiou Books



पिराणा येथील इमामशहाचा मोठा दर्गा.

(स. र. पान २९)

Photo is also present in Book called Satpanth Vijay [ID 147]


सत्पंथ-रहस्य —



पिराणा येथील इमामशहाच्या रोझ्यावरील इमारतीचा
मुख्य घुमट, त्यावरील पंजा व जानवे.

(स. र. पान २९)

Photo is also present in Book called
Satpanth Vijay [ID 147]



पिराणा येथील सय्यदखानी रोझे.
(काका व इतर सय्यद मुसलमान यांच्या कबरा.)

(प्र. २. पान २९)

पिराणा.

'इमामशाहा' या प्रकरणांत पिराण्याची उत्पत्ति आलीच आहे. पिराणा सत्पंथाचे हें मुख्य धर्मक्षेत्र असून ते अमदाबादेजवळ १४ मैल अंतरावर आहे. या पिराणा गांवासभोंवतीं भिंतीचा एक मोठा तट आहे. त्या ठिकाणीं इमामशहाचा मोठा दर्गा आहे. दर्ग्यासमोर सैय्यदखानी रोजा आहे. त्यांतच मुख्य रोजा इमामशहाचा असून त्यांत इमामशहा, त्याची बायको आणि त्याचा मुलगा यांचीं तीन थडगीं आहेत. या मुख्य रोजावर इमारतीचा मुख्य घुमट असून त्या घुमटावर सुमारें ७५ फूट उंचीवर पंजाची निशाणी आहे. त्या पंजाच्या प्रतिमेवरही लहानशी घुमटी बांधलेली असून तीवर जानवें आहे. या तीन्हीं थडग्यांच्या रोजास सत्पंथी लोक प्रदक्षिणा घालतात आणि घुमटावरील पंजाचें मोठ्या श्रद्धेनें दर्शन घेतात. हा पंजा सत्पंथी शास्त्रांत पंजेतनपाक (ह.महंमद, ह. अली, फातमा, हसन व हूसेन यांचें दर्शक चिन्ह) समजला जातो. या आवारांत एक मशीद आहे तीवर पांढरा व भगवा झेंडा आहे. या शिवाय त्या आवारांत आतां पर्यंत होऊन गेलेल्या काकांच्या कबरी असून त्यावर त्यांचीं नांवें लिहिलेलीं आहेत. तसेंच तेथें आणखी कांहीं सत्पंथी मुसलमान लोकांच्याही कबरी आहेत. पिराण्यांतील दर्ग्यांत एक स्वयंपाक घर आहे. त्या स्वयंपाक घरांतील सर्व भांडीं मुसलमानी पद्धतीचीं असून मोठमोठ्या डेगा (हांडे) हीं आहेत. इमामशहाच्या यात्रेच्या प्रसंगीं व इतर उत्सवाचे प्रसंगीं या भांड्यांतून व

लापसी / Lapsi

डेगांतून अनुयायी लोकांकरितां तांदूळ व गहूं यांची लापसी प्रसाद म्हणून शिजविली जाते.

पिराण्यांतील वर वर्णन केलेल्या दर्ग्याच्या आवारांत पूजा करण्याचें एक ठिकाण आहे. त्या ठिकाणास खानु असें म्हणतात. हें ठिकाण मुखीच्या ताब्यांत असतें. या जागेवर एक इमामशहाचा लाकडाचा पाट आहे. त्याला "बाबाचा पाट" असे म्हणतात. पाटाजवळ एक कलश असतो. कलशाजवळ घृत-ज्योत असते. या सर्वांची पूजा मुखी करतो. पूजा संध्याकाळीं ७ वाजतां आणि रात्रीं १० वाजतां अशी दोन वेळेला होते. संध्याकाळच्या वेळेला धूपदीप होऊन रात्रींच्या वेळीं इमामशहाचा पाट व कलश यांची पूजा होते. या कळशामध्यें ब्रह्मा (इमामशहा) विष्णु (नूरमहंमदशहा) व शक्ति (नूरमहंमदशहाची बायको बुजरख बेगम) असतात असा सत्पंथी शास्त्राचा समज आहे.

Khanu खानु

Shakti / बीबी फातिमा / Bibi Fatima - Also see Page 46, 60 & 81 of 186

संदल म्हणजे इमामशहाचे मरणाचे दिवशीं समारंभ करितात तो दिवस. या संदलच्या दिवशीं इमामशहाच्या कबरीवरील कापड काढून नवीन कापड चढवितात. नवीन कापड चढविण्यापूर्वी इमामशहाच्या कबरीस धुवून पुसून चंदन लावतात व मग त्यावर कापड पसरवितात. कबरीवरील हेंच चंदन दरसाल संदलच्या दिवशीं काढून त्याच्या गोळ्या बनवितात. त्यास अमी किंवा नूर असें म्हणतात. ह्या गोळ्या प्रत्येक शिष्याला प्रसाद म्हणून ग्रहण कराव्या लागतात. मेळ्यांचे दिवशीं जे सत्पंथी अनुयायी पिराण्यास येतात त्यांना उतरण्याकरितां दर्ग्यांत स्वतंत्र सोय केलेली आहे तेथेंच त्यांची जेवणाचीही सोय असते. संदल करतां दर्ग्यांत

Paval

तांदुळ व गहूं यांचा शिजवलेला प्रसाद तसेंच इमामशहाचे वंशज यांनीं शिजवून आणलेला प्रसाद एकत्र करून त्या दोन्ही प्रसादांचें मिश्रण इमामशहाच्या कबरेपुढें ठेवून वाटतात. इमामशहास अशारितीनें हा प्रसाद ब्रह्मार्पण करतेवेळीं फातिया नांवाची प्रार्थना करितात. प्रार्थना झाल्यावर हा प्रसाद काका इमामशहाचे वंशज आणि इतर सर्व सत्पंथी शिष्यवर्ग यांना सारखा वाटून ते सर्वजण त्या ठिकाणीं तो प्रसाद ग्रहण करतात. संदलचा दिवस झाल्यावर या सर्व लोकांची यात्रा पिराणा येथें १०-१२ दिवस असते. तेथपर्यंत तेथें हे सर्व सत्पंथी लोक राहतात. व यात्रा संपल्यावर आपापल्या घरीं परत जातात.

पिराणा सत्पंथाचे जे लोक अनुयायी आहेत त्यांचे साधारणतः तीन भाग पडतात. (१) हजरत पीर, इमामशहाचे शिया धर्म पाळणारे वंशज (२) अर्धवट हिंदु व अर्धवट मुसलमान धर्म पाळणारे मोमन, शेख वगैरे लोक. (३) मोमना लोकांप्रमाणें शिया धर्म पाळून नकळत तशाच चालीरिती पाळणारे पण जनतेस आम्ही हिंदु आहोंत असें दर्शविणारे लोक. पहिल्या दोन प्रकारचें लोक जनतेस उघडपणें मुसलमान आहेत असें दिसतात पण **तिसऱ्या प्रकारचे लोक हिंदुधर्मांत व हिंदुसमाजांत राजरोसपणें राहून रात्रीं अंधारांत नकळत पिराणा सत्पंथाचें पूर्णपणें आचरण व पालन करतात.** या लोकांच्याच या त्यांच्या आचरणाबद्दल ते ज्या निरनिराळ्या जातींत आहेत, त्यांच्यांत धार्मिक व सामजिक वाद उत्पन्न झाले आहेत.

काका

इमामशहानें गुजराथेंत आपला पिराणा सत्पंथ स्थापन केला हें मागील प्रकरणांत आलेंच आहे. इमामशहाच्यानंतर या पिराणा सत्पंथाच्या गादीवर मुख्य प्रवर्तक ह्मणून त्याच्या जवळ सतत राहून पूर्ण सत्पंथी बनलेला हिंदूतील लेवापाटीदार जातीचा शाणाकाका नांवाचा इसम त्यानें त्या गादीचा व संस्थानचा मुख्य मुजावर काका नेमला. इमामशहाचा मुलगा नुरमहंमद हा विष्णूचा अवतार ह्मणून सत्पंथी शास्त्रांत गणला गेला आहे, पण इमामशहानें आपल्या या विष्णू अवतारी नुरमहंमद मुलास पिराणा संस्थानच्या गादीचा आपल्या पश्चात् मुख्य प्रवर्तक व मालक केलें नाहीं तर शाणा काका सारख्या हिंदूसच मुख्य प्रवर्तक व मालक केलें. यावरून इमामशहाचा मुख्य हेतु सत्पंथधर्म हिंदूमध्यें कायमचा रुतून त्याचा पुष्कळसा प्रसार व्हावा हाच होता, सत्पंथ पसरवून हिंदूंना बाटविण्याकरितां आपल्या स्वतःचा मुलगा नुरमहंमद यास गादी न देण्यांत, इमामशहाचा हिंदुधर्म बाटविण्याबद्दल केवढा कटाक्ष होता याची वाचकांना सहज कल्पना होईल.

मुजावर काका (पट्टशिष्य) चें मुख्य कर्तव्यकर्म म्हणजे इमामशहानें आंखून दिलेल्या मार्गाप्रमाणें हिंदूंना बाटवून मुमना सत्पंथी बनविणें, दशोंद, चडतर यासारखे इमामशहानें घालून दिलेले कर वसूल करून ते इमामशहाच्या कुटुंबाला व वंशजांना वाटून देणें; इमामशहाच्या रोझांमध्यें धूप, दीप लावून सर्व

प्रकारचा बंदोबस्त ठेवणें इत्यादि सर्व कामें व[redacted]ाकाकडे सोपविलेलीं आहेत. हीं कामें करण्याकरितां त्यानें विरक्त— (संसार सोडून) होऊन ब्रम्हचारी राहावें व पंचकेस (दाढी बाढाविणें) धारण करावे असें सत्पंथ शास्त्रांत प्रतिपादिलें आहे.

पिराणा येथें चार प्रकारचे काका अस[redacted]तात. (१) मुजावर काका (याचा अर्थ वरील व्याख्यांत दिलेला [redacted]असून त्याचीं कर्तव्येंही दिलेलीं आहेत.)

(२) मुखी काका (यांचें काम खानु—मध्यें प्रत्यक्ष पूजा करणें.)

(३) कारभारी काका (पिराणा येथी[redacted]ल सर्व प्रकारचा जमा खर्च ठेवण्याचीं कामें करणारा.)

(४) किरकोळ अगर हरकामी काका [शेती, गुरें ढोरें, वगैरे सांभाळून इतर सर्व प्रकारचीं कामें करण[redacted]ारा.]

हे सर्व काका पिराण्यासच असतात. मुजावर काका व कारभारी काका यांची नेमणूक इमामशहाचे वंशज व सत्पंथी अनुयायी हे करीत आले असून सध्यांही तेच करितात. तसेंच मुजावर काका हे मुखीकाका व हरकामी काक—ा यांच्या नेमणूक करतात.

इमामशहा नंतर पिराणा येथें स्थापन केलेल्या ठिकाणावर पहिल्यांदा शाणाकाका याला इमामशाह—ानें नेमिलें. शाणा काका नंतर आतां पर्यंत २६ काका झाले. [redacted]यांचीं नांवें येणें प्रमाणें:—

List of Kakas of Pirana

(१) काका शाणा (२) काका शेर महंमद
(३) काका अबदुल्लाह (४) काका इमराहीम
(५) काका रहीम (६) काका करीम महंमद
(७) काका सामद (८) काका हसन
(९) काका रहीम (१०) काका राजेमहंमद
(११) काका नुरमहंमद (१२) काका मुला
(१३) काका पोचा (१४) काका प्रागजी
(१५) काका नथ्थू (१६) काका दीपा (अबदुल रहीम)
(१७) काका मनजी (१८) काका नथु
(१९) काका नागजी (२०) काका सामजी
(२१) काका नथू (२२) काका पेथा
(२३) काका नथू (२४) काका करमसी
(२५) काका लक्ष्मण (२६) काका रामजी(हयात)

या २६ काकांनीं देशांतर करून विशेषतः धर्माचा प्रसार केला नाहीं पण इमामशहानें स्थापन केलेला सत्पंथ व त्याचें ठिकाण यांचें चांगलें संरक्षण केलें व आतांपर्यंत तें सांभाळून धरलें.


याप्रमाणें पीरनूरसत्गोर यांचे वेळेपासून हिंदुस्थानांत न-कळत वांडगूंळाप्रमाणें उद्भवलेल्या सत्पंथाच्या या अंकूरास २६ काका पर्यंत मूर्तस्वरूप प्राप्त होत गेलें.

——×——

फैजपूर येथील धर्मशाळा.

सत्पंथाच्या ज्या निरनिराळ्या शाखा आहेत त्यांपैकीं पिराणा सत्पंथ ही एक शाखा प्रामुख्यानें असून गुजराथ व खानदेश या दोन प्रांतांतील सत्पंथी लोक या शाखेचे अनुयायी आहेत. पिराणा येथील दर्ग्यांतील खानुप्रमाणें सत्पंथाचे सर्व प्रकारचे आचारविचार पाळण्याकरतां खानदेशांत फैजपूर येथें एक धर्मशाळा फार दिवसांपासून बांधलेली आहे. तेथें इकडील भागांतील सत्पंथी आचार विचार पूजा वगैरे पाळण्याकरितां जातात. पिराण्यांतील खानु प्रमाणें येथें घट पाट कलश आणि घृतज्योत आहे. या पाटाची पूजा पिराणा येथील पूजेच्या धर्तीवरच नेहमीं तेथील बोवा करीत असतात. तेथें सत्पंथाचे धर्मग्रंथ असून आपल्या हिंदुधर्म ग्रंथा प्रमाणें ते त्यांच्या ठराविक वेळीं तेथील बोवाकडून वाचवून श्रवण करतात. त्याचप्रमाणें सत्पंथाचे इतर सर्व विधी आणि आचार विचार इकडील सत्पंथी लोक या धर्म शाळेंत विशेषतः रात्रींच्या प्रसंगीं करीत असतात. या धर्म शाळेंत सत्पंथीयाशिवाय इतरांस येऊं देत नाहींत. कोणी येण्याचीच इच्छा प्रगट केली व तो त्यांचा प्रेमाचाच मनुष्य असला तर या धर्मशाळेंत जीं तीन दालनें [भाग] आहेत त्यांपैकीं पहिल्या दालनांत त्यास आणतात व पुढील दालनांत ज्या ठिकाणच्या कोपऱ्यांत त्यांचें पूजेचे ठिकाण पाट, घृतज्योत वगैरे आहेत तेथपर्यंत तो न जाईल किंवा त्यास जातां येणार नाहीं अशीच ते व्यवस्था करितात. त्याचप्रमाणें पहिल्या दालनांत बसलेल्या इसमास तिसऱ्या दालनांतील त्यांचे हें पूजेचें ठिकाण दिसणार नाहीं अगर मागमूसही कळणार नाहीं अशाच तऱ्हेची बांधणी त्या इमारतीची आहे.

फैजपूर येथील धर्मशाळेचा नकाशा.



* पुजारी (बारसुबोवा) बसण्याची जागा. × कळस. ÷ लाकडाचा पाट.

याप्रमाणें फैजपुरच्या धर्मशाळेचा साधारणतः जागेचा आराखडा आहे. यावरून वाचकांना दिसून येईल कीं धर्मशाळेंत शिरणारा मनुष्य प्रथम उत्तरेकडील दालनाच्या दरवाज्यांतून येईल व तो जरी तेथें कितीही वेळ बसला तरी त्यास तिसऱ्या दालनाच्या नैर्ऋत्य कोपऱ्यांतील घट, पाट वगैरेची पूजेची जागा आणि ती पूजा करणारा बोवा यांची बसण्याची जागा दिसणें शक्यच नाहीं. ही धर्मशाळा लेवा जातींतील सत्पंथी अनुयायांनीच आपल्या पैशांनीं बांधली आहे म्हणून इतर जातींतील सत्पंथी अनुयायास धार्मिक दृष्टीनें तेथें येण्यास वाव आहे. पण त्याचा मालकी हक्क मात्र नाहीं असें वाटतें.

सत्पंथांत मूर्तीपूजा नाहीं हें आतांपर्यंत वाचकांना स्पष्टपणें कळून आलें असेलच. त्याचप्रमाणें या धर्मशाळेंत कोणत्याही देवाची मूर्ती नाहीं, फक्त घट पाट घृतज्योत हा जो पूजेचा सामान, तोच आहे. पिराण्यांतील खानूंतल्या इमामशहाच्या पाटाप्रमाणेंच या धर्मशाळेंतील हा पाट असून तोच त्यांचा देव समजला जातो. व सत्पंथी आचारविचाराप्रमाणें त्याची पूजा करण्यांत येतें.

बारसुबोवा

बारसुबोवा हे खानदेशांतील लेवा पाटीदार जातीचे असून उटखेडे ता० रावेर येथील एका शेतकरी इसमानें फैजपूरच्या धर्मशाळेस बालपणींच आपल्या स्वतःचा प्रथमचा मुलगा म्हणून अर्पण केलेले आहेत. बारसुबोवा हे बाळपणींच धर्मशाळेस

अर्पण केल्यादिवसापासून आतां पर्यंतचें त्यांचें सर्व आयुष्य सत्पंथी तत्वांप्रमाणें अविवाहित आणि साधुवृत्तींत गेलें व त्या पंथांतील सर्व शास्त्रांचा त्यांनीं अभ्यास करून पिराणा येथील काका प्रमाणें ते या सत्पंथी धर्मशाळेचे मुख्य गुरू बनले. या धर्मशाळेतील सत्पंथी पूजेचीं आचारविचाराचीं आणि शास्त्र श्रवणाचीं सर्व कामें हेच बोवा करतात. सत्पंथीशास्त्राप्रमाणें बारसु बोवांनीं सत्पंथाची दिक्षा घेतल्यादिवसांपासून दाढी वाढविलेली आहे. बारसुबोवा हे पिराण्याच्या संदलास (यात्रेस) नेहमीं जात असतात.

श्री. तोताराम बधु महाजन

हे या धर्मशाळेचे मुखी असून सत्पंथासंबंधींचे सर्व प्रकारचे कर वसूल करण्याचें त्यांचें काम आहे. हे मूळचे श्रीमान् व घराणदार असून व्यापारी आहेत. लेवा पाटीदार जातींत उद्भवलेल्या सत्पंथ वादांत यांनीं सत्पंथाच्या बाजूनें प्रत्येक ठिकाणीं प्रमुखपणें भाग घेतलेला आहे. यांनीं सत्पंथ धर्म शास्त्रांचा चांगला अभ्यास केला आहे.

—— ——x—— ——

व्याख्या आणि शाखा

व्याख्या.

सत्पंथ हा शब्द सत्+पंथ मिळून झालेला आहे. सत्– खरा, सज्जन अगर साधा असा अर्थ आहे. पंथ– मार्ग किंवा रस्ता. मोक्षाला जाण्याला हिंदु धर्मातील निरनिराळ्या कांहीं मार्गांप्रमाणें त्रास किंवा दगदग न पुरतां सुलभ रितीनें मोक्षाप्रत जातां येईल असाच उद्देश किंवा हेतु सत्पंथ उत्पादकांचा असल्यामुळें हिंदुधर्मांतील पुष्कळशा गोष्टींना निराळेंच स्वरूप देऊन त्यांनीं लोकांची दिशाभूल केली व हिंदूंना आपल्या या सत्पंथांत ओढलें. वरील अर्थास अनुसरून 'वैदिक इस्लाम' या ग्रंथांत सत्पंथ शब्दाचा अर्थ पुढीलप्रमाणें केला आहे. त्यावरून या अर्थाची सत्यता पटेल.

"अहदेनस सेरातल मुस्तकीम, सेरातल लजीना अनअमता अलयहीम गयराल मगजुबे अलयहीम वलज झालेमीन"

अर्थः– ज्या रस्त्यानें जाणारांना पूर्वी मोक्ष मिळाला व तूं त्यांचेवर दया केलीस, असा आह्मांस साधा (सरळ) रस्ता (सत्पंथ) दाखव; आम्ही सत्पंथासारखा साधा रस्ता सोडून आडमार्गानें जाऊं असा दुसरा मार्ग दाखवूं नकोस.

सुरजा नांवाची एक राणी होती. तिला इमामशाहा नकलंकी अवतारांत खालीलप्रमाणें बोध करतात.

॥ तमे सुणो सुरजाराणी परिशमस कहे विचार, जो बाई आजुगमां सतपंथ धायोसार ॥ ५० ॥

॥ जो आगळ आ सतपंथ विना सीधा नहि कोअे, तो आ

सतगोर विना मुक्ति न होअे ॥ ५२ ॥

॥ आज कल जुगमां जो आ सतपंथ धायोसार, तो तमे सुरजाराणी उतरोपार ॥ ५२ ॥

—नकलंकी अवतार.

भावार्थ— सुरजाराणी ऐक. या कलियुगामध्यें सत्पंथ हें एकच सार आहे. मुक्ति मिळण्यास सत्पंथासारखा सरळ मार्गच नाहीं. म्हणून सुरजाराणी तुम्ही या सत्पंथाच्याच योगानें हा भव-सागर तरून जाल.

कुराणांतील '**सेरातल मुस्तकीम,**' '**हनफी धर्म**' व '**हकराह**' या शब्दांस अनुसरूनच पीर सदरूद्दीन यानें सत्पंथ शब्दाची उभारणी केली. दिसायाला हिंदु व आंतून मुसलमानी तत्वांनीं युक्त असा सत्पंथ शब्द त्यानें योजला. व त्याचें मूळ तत्व तयार केलें तें असें:—

" खट दरशन तो सुन पुजावे
सत्पंथ धरमको मरम न पावे "

—'आरती कीजे नकलंकतणी'

अर्थ— सत्पंथ धर्माचें मर्म सत्पंथ धर्म स्विकारल्याशिवाय कोणालाच कळत नाहीं. वरील म्हणणें हें अगदीं बरोबर आहे कारण सत्पंथ धर्मास गुप्तीपंथ असेंही म्हणतात. सत्पंथाचें वैशिष्टय म्हणजेच गुप्तपणा. सत्पंथी लोकांना त्यांच्या गुरूंची अशी सक्त ताकीद असते कीं आपल्या पंथाचा पडदा कोणीही खोलूं नये. व खोल-ल्यास त्याची खालील प्रमाणें गति होईल.

" अेजी सत्पंथ जो पडदो जेजार (जोईअेजन)
खोले तेनो जीवडो दोजखे जासे होजी "

अर्थ– सत्पंथाचा जो पडदा उघडेल त्यास रौरव नर्कवास प्राप्त होईल.

याचप्रमाणें ब्रम्हाइंद्र अवतार इमामशहाकृत बुद्धअवतारांत त्यांनीं स्पष्ट म्हटलें आहे कीं,

" तेणें गुप्तपंथ आराधिया जाण ते तो सही
अमरापुरी पोता निरवाण "

भावार्थ– ज्यानें गुप्तपंथ (सत्पंथ) स्विकारला, त्याला मोक्ष मिळेल. त्याच प्रमाणें सत्पंथधर्माशिवाय जे इतर धर्म आहेत ते खोटे आहेत असेंही इमामशहानें प्रतिपादिलें आहे.

शाखा.

सत्पंथाच्या बऱ्याच शाखा आहेत. त्यांत आगाखानी, तैयबी, निझारी, पिराणी, इसनाअशरी व इस्मायली वगैरे प्रमुख आहेत. हिंदूधर्मांत निरनिराळे पंथोपपंथ आहेत परंतु त्या सर्वांचे उद्देश व शेवट एकच आहेत. त्याचप्रमाणें सत्पंथांतील या शाखांमध्येंही जरी कांहीं परस्पर भिन्नत्व असलें तरी त्या सर्वांचें मूळतत्व, उद्देश व शेवट हीं एकच " खुदा " संबंधींची आणि हिंदुधर्म आंतून पोखरून इस्लामी धर्माची वाढ करण्यासंबंधींचीं आहेत. हिंदुधर्माचे खरे हितशत्रू हेच होत. प्राचीन काळापासून हिंदुधर्मावर या सत्पंथाशिवाय निरनिराळे धर्मांचे जे आघात झाले, ते स्पष्ट आणि उघडपणें तरी झाले पण या धर्माचा आघात मात्र

नकळत असा झाला. त्यानें लाखों हिंदुलोकांस धर्मभ्रष्ट केलें. धर्मभ्रष्ट झालेल्या लोकांत उच्च जातीशिवाय इतर लोक आढळतात या वरून सत्पंथाच्या या निरनिराळ्या शाखांनीं हिंदूधर्माला नकळत अंतस्थ रितीनें भिंगोटी प्रमाणें कसें पोखरलें हें कळून येईल!

पिराणा सत्पंथाच्या ५ शाखा आहेतः—

(१) पाचिया (२) सातिया (३) आठिया (४) इमामशाही (५) नूरशाही.

पाचिया आणि सातिया हे इमामशहाला मानीत नाहींत.

पाचिया—**सुराभाईच्या** गादीला मानतात.

सातिया—**बालामहमदशहाच्या** गादीला मानतात.

आठिया—**बारकअलीला** मानतात.

इमामशाही—**इमामशहाच्या** गादीला मानतात.

नूरशाही— **नूरशहाच्या** गादीला मानतात. याचे शिष्य मुमना मुसलमान आहेत. या गादीवर मुमना जातींचाच काका बसवितात. मोमन हे लोक हिंदूचे बाटून मुसलमान झालेले आहेत. ते मुसलमानांबरोबर खाण्यापिण्याचा व्यवहार ठेवितात. लग्न वगैरे सर्व क्रिया जवळ जवळ मुसलमानांसारखींच करितात.

—*—

सत्पंथाचें सत्यस्वरूप

नानामतें आणि पाखंडें । कर्मठता अतिबंडें ॥
त्यांचीं ठेंचावीं तोंडें । हरिभजनें करूनियां ॥

—एकनाथी भागवत.

हिंदुधर्म सर्व धर्मांत जुना व श्रेष्ठ आहे, ही निर्विवाद गोष्ट होय. तत्वतः विचार केल्यास हिंदु संस्कृति ही अत्यंत श्रेष्ठ अशी प्राचीन काळापासून आज तागायत गणली जात आहे. अति भव्य आणि विस्तृत वाढलेल्या वृक्षास वाऱ्यानें कोलमंडून पडण्याची भीति असते तद्वतच हिंदुधर्म या जुनाट वृक्षास आधुनिक दीड हजार वर्षांतील काळांत परधर्मीयांच्या आघाती वाऱ्यापासून उपटून पडण्याची वेळ आली आहे असें आधुनिक पंडित ह्मणतात. पण बारकाईनें विचार केला तर असें आढळून येईल कीं, हिंदुधर्माच्या या जुनाट वृक्षाच्या मुळ्या फार खोल गेल्या आहेत. आणि त्या मानानें त्याचा विस्तार कितीही मोठा असला व त्यावर बाहेरून परकीयांचे केवढेही आघात झाले तरी तो किंचितही डळमळूं शकत नाहीं. ह्मणून निव्वळ तत्वांच्याच दृष्टीनें विचार केला तर हिंदूधर्माचीं तत्त्वें इतकीं प्राचीन आणि अबाधित आहेत कीं, परकीय लोकही ते स्विकारूं शकतात. हें स्वामी विवेकानंदासारख्यांच्या परदेशांतील हिंदूधर्म प्रचारावरून आढळून येतें. असें जरी असलें तरी सुमारें एक हजार वर्षांपूर्वीं हिंदूधर्मावर मुसलमानी धर्माचा जो पहिला आघात आला, त्यानें हिंदूधर्माला कळत आणि नकळत अशा बिचित्र

पद्धतींनी पोखरण्यास सुरवात केली. त्यावेळेपासून मुसलमानी धर्म हिंदुस्थानांत आणि हिंदूधर्मांत कसा रुढावला याची साक्ष इतिहास देतच आहे.

महंमद पैगंबरसाहेबांच्या वेळेपासून मुसलमानी सत्ता अतिशय बळावली. तिनें हिंदुस्तानांतच काय, पण मध्य आशिया व आफ्रिका या खंडांतही धुमाकूळ घालून मुसलमानी सत्ता आणि इस्लाम धर्म वाढविला. हिंदू धर्माच्या दृष्टीनें विचार केल्यास आणि हिंदूतत्त्वांनुसार परिक्षण केल्यास, त्या काळांत मुसलमानांनीं हिंदुस्थानांत राक्षसी थैमान घातला. अशा पांचशें वर्षांच्या त्यांच्या सत्तेच्या काळांतही हिंदुधर्म व हिंदुसमाज शिल्लकच कसा राहिला, याचें नवल वाटतें ! पंजाब प्रांत त्यावेळच्या मुसलमानी हद्दीला आतां प्रमाणेंच लागून होता. हिंदुस्थानांत शिरतांना मुसलमानांचे प्रवेशद्वार म्हणजे पंजाब प्रांतच होता. त्यांनीं तर गहजबच उडवून दिला. पण पंजाबच्या त्या पवित्र भूमींत हिंदु धर्म अद्यापही चांगला टिकूनच आहे. त्याचवेळीं खिस्ती धर्माच्या झंझावातापुढें सर्वंच यूरोप वांकला पण खिस्ती धर्माचे बाण हिंदु धर्मावर मात्र बोथटच झाले. सारांश, वाटेल तितके आणि वाटेल त्या बाजूनें वाटेल त्यांचे आघात हिंदूसमाजावर झाले तरी त्यानें आपलें मूळपद यत्किंचितही सोडलें नाहीं असें म्हणणें बिलकूल अतिशयोक्तिचें होणार नाहीं.

हिंदुधर्म आणि हिंदुसमाज यांच्या या अढळत्वावर सत्पंथासारख्या किरकोळ आवर्तांचा तो काय परिणाम होणार ? पण

इस्लाम धर्मांतील सत्पंथ हें एक गौडबंगाल आहे. मुसलमानी आणि खिस्ती यांच्याप्रमाणें सत्पंथाचे आघात दृग्गोचर जरी झाले नाहींत तरी ते त्यावेळेपासून (विशेषतः इमामशहाचे वेळेपासून) नकळत आजतागायत इस्लाम तत्त्वांनुसार चालूच आहेत.

इस्लामी अवलियांच्या पोतडींतील सत्पंथ ही एक अजब जादु आहे ! या जादूनें हिंदुसमाजास गारूड्याप्रमाणें भुलविलें ! फसविलें ! आणि कित्येक हिंदू कुटुंबांचा सत्यानाश करून धार्मिक दृष्ट्या त्यांच्या पूर्वजांना आणि वंशजांना कोणत्याही जन्मांत कल्पना होणार नाहीं अशा रितीनें इस्लामरुपी डोहांत लोटलें ! सत्पंथाचें मूळ उत्पादक, प्रसारक आणि अध्वर्यु पिराण्याचे इमामशहा. त्यांनीं हिंदुसमाजाची फसगत केली आणि अंतीं हिंदुसमाजांतील कित्येक कुटुंबांना वर्षानुवर्षें इस्लाम धर्मांत ओढून घेण्याकरितां आपल्या प्रयत्नांची शिकस्त केली.

भिंगुरटी कीटकीतें धरी । कोंडी भिंतीं माजिलें घरीं ॥
ते मरणभयें ध्यान करी । निरंतरीं भ्रमरीचें ॥ १ ॥
तेणें तीव्रध्यानें तीं कीटी । होऊनी ठाके भिंगुरटी ॥
गगना चढे उठाउठीं । प्रत्यक्ष दृष्टी देखिजे ॥ २ ॥

—एकनाथी भागवत अ. ९.

तुका ह्मणे आळी । झाली भिंगोटी सगळी ॥

— श्री तुकाराम.

ह्याद्वारें सत्पंथ स्विकारणाऱ्या हिंदूंच्या भावना आणि कल्पना पक्या व रूढ केल्या आणि वरील दृष्टांताप्रमाणेंच

सत्पंथी हिंदूंना अखेर पूर्ण इस्लामी बनविलें.

सत्पंथ स्विकारणारे आणि त्यांचे वंशज हळूं हळूं कसे मुसलमान बनले हें पुढें दिलेल्या त्यांच्या सत्पंथी शास्त्रांतील विपरीत तत्त्वांवरून कळून येईल. हींच विपरीत तत्त्वें सत्पंथाचें सत्य स्वरूप पूर्णपणें दर्शवितात. याच विपरीत तत्त्वांना सत्पंथी हिंदू बळी पडले आणि आपण आणि आपले भावी वंशज यांच्या-वर इस्लामी धर्माची कुऱ्हाड ओढून घेतली. या विपरीत तत्त्वांचा सत्पंथ ज्या ज्या कुटुंबांत शिरला, त्या त्या कुटूंबाचे भावी वंशज आज आपणास मोमना, खोजा इत्यादि मुसलमानी जातींचे आढळतात. पण ज्या कुटूंबांत हा सत्पंथ थोड्याच वर्षां-पूर्वी शिरला असेल ते सत्पंथी आज आपणांस प्रत्यक्ष मुसलमान जरी दिसलें नाहींत तरी त्यांची कृती मात्र या पुढील तत्त्वानु-सारच तंतोतंत हिंदूसमाजास नकळत चालू असते.

वेद.

सत्पंथी धर्मांत चार वेद मानतात. याबद्दल ब्रम्हाइंद्र अव-तार इमामशहा हे षड्दर्शनमां हकिकत यांतील म्लेच्छ दर्शन या भागांत सांगतात:—

॥ परमथ तोरेत किताब ते मुसानबीने उतरेलो छे ॥ तेने सती ऋग्वेद कहे छे ॥ अने मुसलमानी माहे तोरेत किताब कहेछे ॥ बिजो जंबुर किताब दाऊत नबीने उतरलो छे ॥ तेने सती लोक जजुरवेद कहे छे ॥ अने मुसलमान तो जांबुर किताब कहेछे ॥ अने अंजील किताब ईसारुह

अल्लाने उतरेलो छे ॥ तेने सती लोक श्यामवेद कहे छे॥ अने मुसलमान अंजील किताब कहे छे ॥ अने ईसारुह अल्लाने सती लोक तो वीदरवियास [वेदव्यास] कहे छे ॥ अने फुरकान किताब तो नबीमहमदमुस्तफा रसुल सल्ला अले हे व सल्लमने उतरेलो छे ॥ तेने सती लोक तो सोहोदेव पीरसदरदीन कहे छे॥ अने मुसलमान तो नबीमहमद रसुलिल्लाह कहे छे ॥

अर्थः– (१) तोरेत किताब मुसानबीकृत ह्यासच सती [सत्पंथी] ऋग्वेद म्हणतात. (२) जंबुर किताब दाऊद नबीकृत यासच सत्पंथी यजुर्वेद म्हणतात. (३) अंजील किताब इसारुह-अल्ला कृत यासच सामवेद म्हणतात. (४) फुरकान किताब महमद पैगंबर कृत यास अथर्ववेद म्हणतात.

Kuran / Quran

सत्पंथी धर्मात वरील चार वेद मानतात. परंतु त्या चार वेदांत अथर्ववेदाप्रमाणें (कुराणाप्रमाणें) वर्तन केल्याशिवाय संसारांत तरणोपाय नाहीं असें लिहीलें आहे.

Kuran / Kuran

॥ तेणें आ सत्पंथ पेदा कीधो खोजी काढ्यो कुराण माहे ॥७॥

॥ अथरवेदो आ पंथ कहीये ते तो खोंजी काढ्या कुरान मींजार ॥ १६२ ॥

भावार्थः–सत्पंथांतील अथर्ववेद हा कुराणापासून उत्पन्न झालेला आहे. [मुमनचेतामणी]

॥ अथर्ववेदकी खबर न जाणेरे ! अथर्ववेद ते भणीरे कुराणरे ॥२०॥

भावार्थः– अथर्ववेदाबद्दल तुला माहीत नाहीं अरे अथर्ववेद म्हणजेच कुराण ! [सोगिनान ग्रंथांतील ६८ गनानमधील]

॥ अथर्ववेद माहे एम भारतिया सब हिंदू होसे मुसलमान ॥

भावार्थः– अथर्ववेदांत सांगितलेलें आहे सर्व हिंदु हे मुसलमान होतील. (**गोरखणी** सहावे गिनान)

" **श्रीबुद्धअवतार** " पुस्तकांतील.

(१) आज म्लेंच्छरुपे विष्णु मानिये, भेद तेनो **अथर्ववेद** भणें जाणीये ॥ ६५३ ॥

भावार्थः– म्लेंच्छ रुपानें विष्णु भगवान माना आणि त्यातील मर्म अथर्ववेद वाचून समजा.

(२) अथर्ववेदनी कांडी विना जे कोई पूजा करे, ते तो भेरवा भूतने सर्वे तो चढे ॥९७१॥

भावार्थः– अथर्ववेदाशिवाय जो पूजा करील ती सर्व पूजा भैरव भूताला मिळेल.

" **नकलंकी अवतार** " पुस्तकांतील

(३) तमेसुणो सुरजाराणी अथर्ववेदी बम्हज्ञान, तमे जे थकी आगळ पामों अमरापूर ठाम.

भावार्थः-- हे सुरजाराणी तूं अथर्ववेदाचें ज्ञान ऐक. त्यामुळें तुला स्वर्ग प्राप्ति होईल.

(४) आ चवथा कलीयुगमां जे हरीनो दसमो अवतार, बाई तेना अथर्ववेदमां छे प्रकार.

भावार्थः– या चवथ्या युगांत (कलियुगांत) हरीचा दहावा अवतार तो बाई अथर्ववेदांत सांगितला आहे. ॥४४॥

सत्पंथी केसमध्यें श्री. तोताराम बधु महाजन यांनीं आपली बाजू सावरण्याकरितां जे सत्पंथी धर्म ग्रंथ दाखल केलें होते त्यां-

तून अथर्ववेदासंबंधींचें उतारे पुढें देत आहे. त्यावरून सत्पंथीलोक कुराण म्हणजेच अथर्ववेद मानतात, असें स्पष्ट कळून येईल.

" दशावतार " पुस्तकांतील

(१) जे आज अथर्ववेदाला जाणीत नाहीं ते भीमा चांडाळ समज. (१३०–८१)

(२) जे फार वेद वाचतात व अडुसट तीर्थांला जातात. पण आज दगडाची पूजा करतात ते चांडाळ कोठून पवित्र होणार? (१३०–८२)

(३) चवथ्या वेदाची (अथर्ववेदाची) जे खूण जाणत नाहीं भीमा, ते चांडाळ आहेत. पान (१३१– कडवे ९१)

(४) कलीयुग लागला व अथर्ववेद झाला तेव्हां षट्‌दर्शनाचा निषेध झाला. (१५१–३७७)

" नकलंकी अवतार " पुस्तकांतील

(१) आज अथर्ववेदांत जीवरूपीं ब्रम्हनारायण तो भरतखंडांत जंबुद्विपांत प्रगट होऊन बसला होता. (१९८-३०६)

" हेतनामा–गोरवाणी " पुस्तकांतील

(१) आज अथर्ववेदांत अशी रीत सांगितली आहे कीं, ६८ तिर्थांचें घर रिकामें झालें आहे व त्यांचें ठिकाणीं भैरवभूत राहतात,असें गुरू इमामशहा सांगतात, तें तुम्ही ऐका.(११८-२२७)

(२) आज कलियुगांत अथर्ववेद अमोलिक हिरा आहे. शु० २ बीज हें व्रत आहे. एकादशी, चतरदशी व अमावास्या जर कराल तर वेड्यांनो तुमच्या हातांत फळ कोठून लाभणार[१२९]

" हेतनामा आगमवाणी " पुस्तकांतील

(१) कलियुगांत अथर्ववेदी जप जपावा ॥२४॥

" हेतनामा जोगवाणी " पुस्तकांतील

(१) दहावा अवतार ठिकाण झेलमदेश, कालिंगा दैत्याला मारणार. अथर्ववेदाचा उच्चार करीतो.

ॐ

हिंदुधर्माचें रहस्य ह्मणजे ॐ आणि हें ॐ म्हणजेच सत्पंथ धर्मांतील " अली " असें " वैदिक इस्लाम " या सत्पंथी ग्रंथांत ह्मटलें आहे.

" वइन्नहुं फी " ओम " मीलकेताबे लदयना, ले "अली" युन हकीम "

भावार्थः— आणि खरोखर आमचे जवळ ॐ आहे आणि अली हा हिकमतवाला आहे.

पीर सदरुद्दीननें " अली " म्हणजेच ॐ असें स्पष्ट म्हटलें आहे तेः—

" ओम " " अली " ते आपे विष्णुं
" ओम " लीला अनंतरे

यावरून सत्पंथी धर्मांतील " अली " हाच ॐ आहे. असें वाचकांच्या लक्षांत येईल.

दहावा अवतार.

सत्पंथी धर्मांतील दहावा अवतार ह्मणजेच नकलंकी नारायण " इस्लामी धर्माचा चौथा खलिफा (पहिला इमाम)

अली " या रुपानें हा होऊन गेला असून, तो काशी विश्वनाथ म्हणविणाऱ्या कालींगा दैत्यास ठार मारण्याकरितां येणार आहे व त्याचे पुत्र हसन व हुसेन व त्याचे वंशज हे इमाम म्हणजेच ईश्वराचे अवतार आहेत, असें या धर्मांत प्रतिपादिलें आहे. या दहाव्या अवताराबद्दल ब्रम्हइंद्रअवतार इमामशहा " नकलंकी अवतार " या ग्रंथांत सांगतातः—

॥ आज दसमे रुपे नकलंकी अली अवतार ॥
॥ ते हरिए धर्यो छे जंबुदीप मोजार ॥ ३१ ॥
॥ त्यारे दसमुंरुप स्वा नकलंकी नारायण सार ॥
॥ त्या देवें धर्यो श्री मौला मुर्तझाअलीनो
अवतार ॥ ७९६ ॥
॥ शहा मौलामुर्तझा अलीनी माता तो बीबी जलेखा
कहीए ॥
॥ पीता तो हासयी अबुतालेब ॥
॥ त्यारें गुरु तो नबी महंमद मुसतफा सल्ला अलेहे व
सल्लम ज्याण ॥
॥ अने शक्तीमाता बीबी फातमाप्रमाण ॥ ८०१ ॥

Shakti Mata = Bibi Fatima Also see Page 46, 60 & 81 of 186

भावार्थः— दहावा अवतार नकलंकी यानें जंबुद्विपांत श्री मौलामुर्तीझा अलीच्या रुपानें अवतार घेतला आहे. मौला-मुर्तीझा अलीची आई बीबी जलेखा आहे. हासपी अबुतालबे हा बाप आहे. नबी महंमद मुस्तफा सल्ला अले हे व सल्लम हा गुरू आहे आणि शक्तिमाता ही बीबी फातमा आहे.

" जिन्नतनाम्रु" या ग्रंथांत सत्गोर इमामशहा आपलें निकलंकी नारायणाशीं नातें सांगतात.

॥ अलीशहा हमारो दादा कहींये अने दादी बीबी फातमा सार ॥ हसन हुसेन शहा अलीना कहींये आल इमाम तेनु परिवार ॥ ९७ ॥

भावार्थः-- अली हा आमचा दादा व बीबी फातमा ही दादी आहे. हसन हुसेन हे अलींचे मुलगे आहेत. सर्व इमाम हे त्यांचेच वंशज होत.

याप्रमाणें इमामशहानें केलेल्या त्याच्या प्रत्येक ग्रंथांत दहाव्या अवताराबद्दल उल्लेख केलेला आहे. पूर्वी झालेले नऊ अवतार फक्त मानण्यापलीकडे त्यांना कोणत्याही रितीचें महत्व द्यावयाचें नसून फक्त दहाव्या अवतारालाच मानावयाचे व भजावयाचे व या दहव्या नकलंकी अवताराला (अलीला) भजल्याशिवाय संसारांत तरणोपाय होणार नाहीं, असें सत्पंथ शास्त्र सांगतें.

वेद, तीर्थ व मूर्तिपूजा.

श्री सत्गुरु ब्रम्हाइंद्र इमामशहा आपल्या बुद्धावतारांत वेद तीर्थ आणि मूर्तिपूजेबद्दल सांगतात.

॥ जे लोक आज पत्थर मूर्तीनी पुजा करे, ते बहुत पुजा पाखंड देवळ देशमां धरे ॥

॥ हुंडी पत्रीनें पथरनी पुजा करे, ते मुवा पछी सवापोर लगी छाती उपर लईनें फरे ॥

॥ जे कोई आज आ दुनियामा, तीरथ पाणीनी यात्रा करे ॥

॥ ते दीन सवापोर लगी मुवा पछी नतनत पाणीमां डुबी मरे ॥

॥ जे वाचे ढाला वेदने खाली तिर्थे जाय, पाणी पथ्थर पुजे ते पावन नाहि था ॥ ८१ ॥

॥ त्रण वेदने अडसठ तिर्थनो महिमां गयो, ढाला वेद वांचे ते सुन पुजाये भयो ॥ १५५ ॥

॥ जे पथ्थर मूर्ते तिर्थे चारित्र रे पाये, सर्व खेल ए भेरव भूतनां केहवाये ॥ १८४ ॥

भावार्थः– जे आज पोकळ वेद वाचतात तिर्थाला जातात व तेथें जाऊन पाणी व दगडाची पूजा करतात ते पावन होणार नाहींत. कारण ३ वेदांचे व ६८ तिर्थांचें महत्व या कलियुगांत नाहींसें झालें आहे. त्यामुळें पूजा करण्यास ते योग्य राहिलें नाहींत. आणखी तेथें सर्व भेरव भूतांचे खेळ राहिलें आहेत.

कलमा.

सत्पंथी लोक एकंदर पांच कलमा पढतात. याबद्दल अवतार पात्र ब्रम्हाईंद्र इमामशहा यांनीं " कलमानुं ज्ञान " या ग्रंथांत खालील प्रमाणें वर्णन केलेलें आहे तें असें:-

Book

॥ जेणें कलमो ना कह्यो, अने नबीए कह्य पोकार ॥
॥ तेने उंधे मस्तके टांगशे, तेने दोजखने दरबार ॥

भावार्थ :– जो मनुष्य कलमा पढणार नाहीं तो मनुष्य मेल्यावर उलटा टांगला जाईल व त्याला नरकवास प्राप्त होईल.

त्या कलमा खालील प्रमाणें:–

(१) अवल कलमे तैयब, लाअेलाहा इल्लाहो, महंमदुर रसुलिल्लाहे

(२) दोयम कलमे सहादत, असहदोअन, लाअेलाहा इल्लाहो वहदहु लासरीक लहु, वयसहदो अन्ना, मोहमदनि अबदहु, व रसुलो.

(३) सयम कलमे . तमजीद, सुबहानल्लाहे, वलहंमदो लील्लाहे, वलाअेलाहा, इलल्लाहो वल्लाहो अकबर, वलाहलवा, वलाकुवता-इल्ला, बील्लाह' हील अलीयुल असदहो अन अर्जीम

(४) चहारंभ कलमे तौहीदू लाअेलाहा इलल्लाहो वेहदहु लासरी-कल, हुलहुल मुलको वलहुलहंमदो, योहइवओ मीतो बेयदे-कलबरे, वहोवा अल्ला कुल्ला स्थइन कदीर

(५) पंजम कलमे रद कुफर, अल्लाहुम्मे, इनी अउजो, बेका मीन अनउसरेका, बेकास्यअंव व असतग फेरोका लेमाला आल-मोबेही, वअना, आलमो बेही, तुबतो, वरजातो, व असलमतो, वंअकुलो, असहदो अन लाअेलाहा इलल्लाहो, वेहअहुला, शरीकलहु वअसहदो अन्ना मोहंमदीन, अबदहु वरसुलो.

दुवा.

दुवा म्हणजे प्रार्थना. सतपंथी लोक ह्या दुवा प्रसंगोपात्त म्हणतात. दुवांचा आरंभ " फरमानजी बीसमल्ला हररेहमान नररहिम सतगोरपाल ब्रम्हाइंद्र इमामसाहा आदात्रिसनव नरंजन नरअली महंमदसाहा तमारी दोवा " आणि शेवट " सतगोर इमामसाहा नरअली महमदशाहा हक लाअेला हई लील्लाहो महम-दुर रसुलल्लाहे. " यानें होत असतो. आपल्या हिंदुधर्मांत ज्या

प्रमाणें प्रत्येक वेळीं किंवा प्रसंगीं वैदिक मंत्र, शास्त्रोक्त वचनें किंवा सुभाषितें हीं त्या त्यावेळेला अथवा प्रसंगाला म्हणून ती ती क्रिया करण्याची वहिवाट आहे त्याचप्रमाणें सत्पथांत ह्या दुवा तसल्या प्रसंगीं म्हणण्याचा रिवाज सत्पंथी लोकांत आहे. ह्या दुवा इमामशाहा आणि त्याच्या कांहीं विद्वान सैयद अनुयायांनीं तयार केल्या असून हिंदूमध्यें सत्पंथाचा प्रसार होण्याकरितां, समाजांत वागतांना व प्रत्येक क्रिया करतांना, ह्या दुवा पढण्याची एक मुख्य बाब त्यांच्यामध्यें घालून दिली आहे. जन्म, मरण, लग्न वगैरे सारख्या नेहमींच्या व्यवहारांतील क्रिया करतांना सुद्धां ह्याच दुवा ते पढतात.

इमाम.

सत्पंथी लोक ४८ इमाम मानतात. इमाम म्हणजे ईश्वराचा अवतार. महंमद पैगंबर साहेबानंतर अबुबकर, उमर, उस्मान, आणि अली असे चार खलिफा झाले. यांना सुनी लोक मानतात. शिया लोक हजरत अलीला खरा हक्कदार समजून त्यालाच पहिला खलिफा अथवा पहिल्या इमामासारखे समजतात. सत्पंथ शिया पंथाचीच शाखा आहे. कारण सत्पंथी ह० अलीला दहावा अवतार मानतात. शिया इसनाअसरी पंथाचे लोक व बोहरी लोक ह्याच अलीला माअसूम इमाम मानतात. नुसेरी, आगाखानी व पिराणा सत्पंथी लोक त्यास खुदा मानतात.

शिया लोकांचे इमाम १२:- १ अली, २ हसन, ३ हुसेन, ४ झयनुल आबेदीन, ५ महंमद बाकर, ६ जाफर सादक, ७ मुसा-

काजम, ८ अलीरजा, ९ मोहंमद तकी, १० अकियुन नकी, ११ हसन असकरी, १२ मोहंमद महेदी.

बोहरी लोकांचे हेच इमाम थोड्या फरकानें आहेत, परंतु ते २२ आहेत.

इस्माइली, निझारी व आगाखानी सत्पंथाचे इमाम ४८ आहेत. ते येणें प्रमाणें:-

१ अली २ हुसेन ३ झयेनुल आबेदीन ४ महंमद बाकर ५ जाफर सादक ६ इसमाईल ७ महंमद ८ वफी अहंमद ९ तकी महंमद १० रझीअबदुल्ला ११ मेहदी महंमद १२ कायम १३ मनसुर १४ मोयेझ १५ अझीझ १६ हाकम १७ जाहेर अली १८ मुस्तनसर १९ नीजार २० हादी २१ मोहतदी २२ काहेर २३ अली झकितर सलाम २४ महंमद २५ जलालुद्दीन २६अलाउद्दीन २७ रुकनुद्दीन २८ शमशुद्दीन २९ कासमशाह ३० इस्लामशाह ३१ महंमद ३२ मुस्तनसर ३३ अब्दु-सलाम ३४ गरीबमीरजा ३५ मुदरअली ३६ मुरादमीरजा ३७ जुलफेकार अली ३८ नुरदीनअली ३९ खलीलाअली ४० नीजार ४१ सैयदअली ४२ हसनअली ४३ कासमअली ४४ अबुल हसन ४५ खलीलाअली ४६ हसनअलीशाह ४७ अलीशाह ४८ ना० हिज हायनेस सर महंमद सुलतान.

वरील इमामांपैकीं पहिले ५ मक्का मदीना येथें राहात होते. त्यानंतरचे ५ सलमीया येथें (तुर्कस्तानांत) राहात. नंतर कांहीं अफ्रिकेंत मगरीब येथें राहात. पुढचे कांहीं इराणांत

अलमोतगड येथें राहात. पुढचे कांहीं इराण देशांत केहेक, बाबक, विरचा, देहलम वगैरे स्थळीं राहात होते.

[वर जाड टाईपांत दिलेल्या ठिकाणांचा उल्लेख सत्पंथी ग्रंथांत आहेत.]

इमाम हसनअलीपासूनचे सर्व हिंदुस्तानांत येऊन (हिज हायनेस सर सुलतान मोहंमदशाहा आगाखान पर्यंतचे) ते सर्व इमाम हिंदुस्तानांतच राहात आले आहेत.

जप.

ॐ नमो भगवते वासुदेवाय । ॐ नमः शिवाय ।
ॐ श्रीरामचंद्राय नमः ।

इत्यादि जप करण्याचे मंत्र हिंदुधर्मांत रूढ आहेत. त्याच प्रमाणें:—

॥ जे आज कलीजुगमां भगत जपसे पीर शाहानु नाम ॥
॥ तो मुनीवर आगळ अमरापर पामसें ठाम ॥ १२८ ॥
॥ जे आज कलिमां अवल आखर जपे छे पीरशहा जप ॥
॥ ते सही अमरापर ले छे आप ॥ १२९ ॥
॥ जे पीरशहा विना कलीमा बीजा जप जपावे छे कोअे ॥
॥ ते दैत्य कालिंगाना चेला अवतरसे अे ॥ १३० ॥

भावार्थः— जे आज कलियुगांत पीरशहाचा जप जपतात त्यांना अमर लोक प्राप्त होतो. व पीरशहाशिवाय जो इतर जप जपतो तो कालिंगा दैत्याचा शिष्य होऊन जन्म घेईल.

— श्री नकलंकी-अवतार.

असें अवतार पात्र ब्रह्माइंद्र इमामशहानें आपल्या कलियुगांतील सत्पंथी अनुयायांकरितां जप सांगितला आहे. हा जप प्रत्येक दिवशीं सकाळीं, दुपारीं, संध्याकाळीं व मध्यरात्रीं याप्रमाणें चार वेळां केला पाहिजे. या जपांतील पीरशहा या शब्दाचा अर्थ भगवान असा असून त्यास पीरशहा--जप असें सत्पंथी लोक ह्मणतात.

षट्दर्शनें

हिंदुधर्मांत सांख्य, योग, वेदांत, मिमांसा, न्याय आणि वैश्याशिक अशीं षट्दर्शनें आहेत. पण सत्पंथी शास्त्रांत यांचा निषेध केला असून त्यांत इमामशाहांनीं पुढील प्रमाणें षट्दर्शनें लिहीलीं आहेत. (१) ब्रम्हदर्शन (२) संन्यासी दर्शन (३) जैन दर्शन (४) बुद्ध दर्शन (५) म्लेन्छ दर्शन.

॥ लाग्यो छे कलयुग ने हुवो अथर्ववेद, थाशे अेथी सर्व षट्दर्शन तणो निषेध ॥ ५३५ ॥

—श्री बुद्ध अवतार.

भावार्थः-- कलियुग लागला आणि अथर्ववेद सुरू झाला म्हणून षट्दर्शनें (हिंदुशास्त्रांतील) निषिद्ध झालीं.

सत्पंथ शास्त्रांतील षडाक्षरी मंत्र

अवतार पात्र ब्रम्हाइंद्र इमामशाहा आपल्या श्री बुद्धाअवतारांत षडाक्षरी मंत्र सांगतातः--

॥ इमाम इह्लिल्लाह साथे षट् अक्षरनी मंत्र विधिसार ॥

भावार्थः-- " इमाम इह्लिह्ला " हा षडाक्षरी मंत्र आहे. हिंदु धर्मात ' ॐ नमः शिवाय ' हा षडाक्षरी मंत्र रूढ आहे तद्वतच सत्पंथी शास्त्रांत " इमाम इह्लिह्ला " हा मंत्र आहे.

शिक्षापत्री

प्रत्येक हिंदी मनुष्य गीता ग्रंथ अत्यंत पवित्र मानतो. त्यांतल्या त्यांत बहुतेक हिंदु लोक गीता ग्रंथाचें सतत पठण आणि अध्ययन करितात. त्याचप्रमाणें सत्पंथी शास्त्रांत " शिक्षापत्री " हा त्यांचा ग्रंथ अत्यंत पवित्र मानला जातो. या शिक्षापत्रीचें पठण आणि अध्ययन नियमानें सत्पंथी अनुयायी करितात. हा ग्रंथ फक्त १०० ओव्यांचा असून त्यांत १०० सत्क्रियांची माहिती पिराणा सत्पंथाचे उत्पादक गुरू इमामशाहा यांनीं आपल्या शिष्य वृंदाकरितां दिलेली आहे. त्यांत त्याज्य कोणते आणि ग्राह्य कोणते या संबंधी स्पष्टपणें विवेचन केलें आहे. या १०० सत्क्रियांपैकीं सत्पंथाच्याच हस्तलिखीत शास्त्र-ग्रंथांतून शिक्षापत्रीचे नमुन्यादाखल पुढील सात निवडक ओव्यांचा अर्थ देत आहें.

१ गत गंगेंत जाऊन मिळावें. (ओवी नं. १७)

२ सुतक लाही भरल्याशिवाय राहील त्यास दुःख होईल (ओवी नं. २१)

३ व्याज वेऊं नये. (ओ. नं. ३२)

४ चाळीस क्रिया निर्धारानें पाळाव्या. (ओ. नं. ४०)

५ पाणी, पाषाणाची पूजा करूं नये. (ओ. नं. ४९)

६ षट्दर्शनाची पूजा कराल तर पश्चाताप पावाल
(ओ. नं. ७७)

७ वेदशास्त्र सांगतें त्या प्रमाणें करूं नयें. (ओ. नं. ७८)

पंजेतन पाक.

मिशनरी पिरांच्या मतांप्रमाणें खुदानें सृष्टीची उत्पत्ति करतांना प्रथमतः फेस तयार करून त्यांमध्यें अंड्याएवढा आकार बनविला. नंतर खुदानें त्या अंडयांमध्यें सात पाताळ आणि सात आकाश बनविल्यानंतर स्वतःच्या नूरमधून [तेजांतून] चार मूर्ती बनविल्या व त्या चार मूर्तींबरोबर आपण स्वतः अवतार घेतला. अशा त्या सर्व मिळून पांच मूर्ती तयार झाल्या. त्या मूर्ती म्हणजेच पंजेतन पाक या नांवानें सत्पंथांत ओळखलें जातात. त्या पांच मूर्ती खालील प्रमाणें होतः—

अवतार पात्र बम्हाइंद्र इमामशहा यांनीं आपल्या सत्पंथी अनुयायांकरितां पंजेतन पाक " छद्‌र्शननकी " यांतील " म्लेंछ भागांत " वर्णन केलेला आहे तो असाः—

" ते पंजेतन पाकना नाम सुनो हो मुनीवरो ॥
अव्वल हजरत नवी महंमद मुस्तफा रसूल सल्ला अलेहे व सल्लम ॥
बीजो नाम तो हजरत मौला मुरतझाअली ॥
त्रीजो नाम तो माता बीबी फातसत जहेरारजी अल्लहुतआला ॥
चौथे नाम तो हजरत इमाम हसन ॥
पांचक नाम तो हजरत इमाम हुसेन ॥ "

(१) हजरत महंमद (२) हजरत अली (३) बीबी फातमा (४) हसन (५) हुसेन, जसें हिंदूमध्यें रामपंचायतन. शिवपंचायतन आहेत, त्याचप्रमाणें सत्पंथीधर्मामध्यें हें वरील **पंचायतन** समजलें जातें व सृष्टीची उत्पत्तिही वरील प्रमाणेंच मानिली जाते. पंजेतन-पाकच्या स्मरणानें ६८ तीर्थाचें पुण्य घडतें कारण कलियुगांत सर्व तीर्थें यांत समाविष्ट झाली आहेत. असें सत्पंथशास्त्र सांगतें. यावरून सत्पंथ हिंदूधर्माशीं किती विसंगत आहे याचा वाचकांनींच विचार करावा.

गो-पूजा.

पृष्ठे ब्रह्मा गळे विष्णु मुखे रुद्रः प्रतिष्ठिताः ।
मध्ये देवगणाः सर्वे रोमकूपे महर्षयः ॥

हिंदूंना गाय किती पवित्र आणि वंदनीय आहे हें वरील श्लोकावरून कळून येते. ज्या गाईच्या शारिरांत आणि शरीरांतील प्रत्येक रोमरंध्रांत देवाचा अंश सांठविलेला आहे. अशी पूज्य गो देवता तिची पूजा करूं नये असें सत्पंथ शास्त्र सांगतें. तसेंच गाईची पूजा केल्यास ती आलिकडील कलियुगाच्या काळांत निरर्थक होय असें अवतार पात्र ब्रह्माइंद्र इमामशाहा श्री बुद्धावतारांत पुढील प्रमाणें प्रतिपादन करितात.

॥ त्या दोड्या शुद्र वैश्य क्षत्री सब कोए, ते आज फोगट
गौ पुजा करे छे सोए ॥ ८८२ ॥
॥ जे आज पूजे ते भूल्यो सकल संसार ॥
॥ जे कोई आज दुनियामां गाय पीपळानें पुजशे ॥

॥ ते मुवापछी सवा पोर लगी गाय पीपळाने छाती उपर
लईने फरसे ॥

ब्राह्मण

हिंदु शास्त्रांत आणि समाजांत " वर्णानां ब्राह्मणो गुरुः । वर्णानां ब्राह्मणः श्रेष्ठः " । असें असून ब्राह्मण हे भूदेव मानण्यांत आले आहेत परंतु सत्पंथीशास्त्र हें ब्राह्मणांस व ब्राह्मण वर्णास हीन दर्जाचें मानतें त्याबद्दल ब्रह्माइंद्र अवतार इमामशहा बुद्धावतारांत म्हणतातः—

॥ जे कोई आज दुनियामां ब्राम्हण साधुसंत जोगी सेवडा
संन्यासीनी पुजा करे ॥

॥ ते मुवा पछी दीन सवापोर लगी खांदे लईने रवडता फरे ॥

॥ अे ब्राम्हण वांचे अमारावेद, रुप तमारो करे नीखेद ॥

॥ त्यारे श्री बुद्ध बोल्या सुणो भीमराय, चंडाल तणी वात
कहुं तोय ॥

॥ बाम्हणमांहेथी बम्हजगया, तेणे रुप नबी महमदका लीया॥

॥ ढाला वेदनी जाणे वाण, ते चांडाल भीम लेजो जाण ॥

॥ ढाला वेद बाम्हण कहे, हरि अवतार की खबर नव लहे॥

॥ आज नवमु रुप आव्यो छु जोय, तांकु बाम्हण न कळे
कोय ॥

॥ चंडाल बाम्हण महा अज्ञान, बुद्ध अवतारको खंडे नाम ॥

॥ कलियुगमां ब्राह्मण जेटला, अे तो कर्महीणा थाशे तेटला ॥

भावार्थः— जे बाम्हण वेद वाचतात ते चांडाळ आहेत.

कारण (कलियुगांत) बाम्हणांमधून ब्रम्हत्व निघून गेले असून ते नबी महंमद मध्ये आलें. जे वेद वाचतात ते भमा चांडाळ समज. बाम्हण वेद वाचून अवताराची हकिकत ते समजत नाहींत म्हणून बाम्हण हे चांडाळ असून महा अज्ञानी व कर्महीन आहेत.

गोमेधयज्ञ.

सैय्यद इमामशहानें " बुद्ध अवतार " पुस्तकांत बुद्धानें पांडवाकडून गुरु हत्या व गोत्रज हत्या यांचें पाप नाहींसें करण्या कारितां गोमेध यज्ञ करून घेतला, तसेंच यज्ञांत गाय बळी दिल्यानें श्रीकृष्ण भगवान संतुष्ट होतो असें वर्णन केलें आहे. तें येणें प्रमाणें:—

नवमे रुपें हरि बुद्धा अवतार, मुसलमानी रुपे लीधुं मुरार ॥ ४ ॥

भाई तमे हवे वेधो गाये ने राखो इमान्, तो अम्मर ठाम तमे पामो निर्वाण ॥ ७३६ ॥

अमो आवी यज्ञनो जाण्यो भेद, हत्या तमारी उतरे करो गौमेध ॥ ७३७ ॥

तमे यज्ञ करो गौमेध आज, तो सरे पांडवो तमारा काज॥७३८॥

श्रीबुद्धा कहे अे पापने जाण्यो होय सही, तो शुरभी यज्ञ निश्चय करोने अहीं ॥ ७४३ ॥

श्री कृष्णने व्हाली हती शुरभी तोसही, ते शुरभी विना यज्ञ विधि थाअे नहीं ॥ ७४६ ॥

कहे श्री बुद्धा तमे सांभळो धर्म राये, हवे गौमेध यज्ञ करवानो

Buddha Avatar is Muslim. Asks Pandava to Kill Cow

Pandavas to kill cow

करो उपाये ॥ ७८२ ॥
ते कर्या विना तो पाप नहि जाये, ऐसो भेद हरीये कह्यो
समजाये ॥ ७८३ ॥
त्यां पांडवोए हरिवचन शिर चडाओ, त्यारे गौमेध यज्ञ मांड्यो
छे ते ठाये ॥ ८०६ ॥
ज्यारे पांडवे तो मांड्यो छे यज्ञ गौमेध, त्यां आपे आप श्री
हरि भणीया वेद ॥८०७॥
स्वर्ग भोवनथी आणि हरिये गाये, त्यां तेने तो प्रेमे पूजी
युधिष्ठिर राये ॥८०८

Cow from heaven is called and it is killed

राजाये मस्तक कापीने अळगोरेधरीयों, तेना कापी चार
पगने जुजवो कर्यो ॥८०९॥
ज्यारे खालडी उतारीने अलगी धरे, त्यारे श्री बुद्धारुपे वाणी
ओचरे ॥ ८१० ॥

वरील तऱ्हेचा गोमेध यज्ञ केल्यामुळें पांडवांचें पाप नाहींसें होऊन ते पूनीत झाले. हें ब्राह्मणांनीं पाहून ते सुद्धां तेथें गेले. परंतु त्यांच्या हातीं गायीच्या आंतडयाशिवाय कांहींएक न मिळाल्यामुळें त्यांनीं गायीचीं आतडींच गळ्यांत घातलीं. तेव्हां पासून ब्राह्मणांमध्यें जानवी घालण्याचा प्रघात सुरू झाला. अशी उत्कृष्ट कथा सैय्यद इमामशहा बुद्धावतारांत सांगतात.

Sacred thread called Janoi is made from Cow's intestine

" पांडव तो जातां गौ मस्तक लईने गया, वळता सो व्रण मुगट कई पेरे थया ॥ ८७० ॥ दरसन पांडवोने श्री बुद्धाना थाये, गाय पूजी त्यां ब्राह्मण पहिला जाये ॥ ८७१ ॥ पड्या छे

त्या गौना आंतरडा जेह, ब्राम्हणे लेई गले घाल्या तेह ॥ ८७२ ॥ कळीमा गी आंतनी जनोई रही " या प्रमाणेंच पुढील कथा आहेत.

जोग्यांचे शींग.

॥ ज्या पुरनां लोक दोहोल्या धरी भाव, कोईने शिंगडी हाथ लागी तेने ठाव ॥ ८७४ ॥ जे कलियुगमां जोगी दर्शननी वेला गई, आज फोकट शींगडी लगे बांधी रही ॥ ८७५ ॥

(इमामशाहा कृत श्री बुद्ध अवतार)

भावार्थः—कलियुगांत शैलि, शिंगे धारण करणारे जोगी जे आहेत ते त्याचे करणें व्यर्थ असून त्यांचें दर्शन घेणें फुकट आहे.

Yadavs ate Meat in the marriage of Goddess Laxmi

लक्ष्मीच्या लग्नांत यादवांना मांस भोजन.

श्रीकृष्ण परमात्माच्या लग्नांच्या वेळीं श्रीकृष्णानें यादवा-बरोबर लक्ष्मीला घालण्याकरितां दागिने पाठविले. यादव तेथें गेल्यावर बसले तेव्हां त्यांना वाड्यांत हरणें, बकरे वगैरे जनावरें बांधलेलीं दिसलीं. तेव्हां त्यांनीं विचारले कीं, या जनावरांचे काय कराल. तेव्हां त्याही बोवा म्हणाले कीं, लक्ष्मीच्या लग्नाच्या वेळीं यादवांना ही जनावरें खाऊं घालूं. (मांस भोजन देऊं.) असें छे दरसणी हर हकीकतमध्यें ब्रम्हाइंद्र इमामशाहा यांनीं सांगितले आहे.—

" तीयां हरणा तथा रोज तथा बकरा बांधेयाछे, तारे जाधव केवाने लागा जे आ जनावरोने शुं करशो, तारे वेवाई

केवा लागा जे लखमीजीने परणावसुं तारे जादवुंने खबरावसुं जारे, " करसन नाथने परणावसुं तारे सऊने जमाडसु. (दरसण छनी हरहकीकत)

Yadava's also killed cow and ate it.

यादवांनीं गाय मारून खाल्ली

" तारे ते वाछडी चरती चरती रखीसरूने पासे आवी छे, तारे ते रखीसरे वाछडीने मारीने खाधी छे, ते वाछडीनी खरीऊं तथा पुछडी तथा खालडी तथा माथुं ए चारइ वसतु मंढी मांहे छुपावी छे,

(दरसण छनी हरहकीत)

रखीयाने बुधीया उपनी, तेणे मारी खादी शाहानी गायसामी ॥ १० ॥

[गनिान पीर सरदीननु]

याप्रमाणें सत्पंथाचें सत्य स्वरूप आहे. सत्पंथीं तत्वें किंबहुना संबंध सत्पंथ निव्वळ इस्लामी धर्मावर व इस्लामी संस्कृतीवर उभारला गेला असून त्याची सर्व संस्कृती, ग्रंथ व आचार विचार हीं सर्वस्वीं हिंदुधर्म व हिंदूसंस्कृती बाह्यच आहेत. तीं हिंदुसंस्कृतीच्या कोणत्याच विभागांत येत नाहींत. यास आणखी हा वाटेल तितके पुरावे देतां येतील.

——×——

वेदबाह्य चालिरीति.

येरीं ही शास्त्र बटिकरी ॥
जें निंदेचे विटाळ करी ॥
बोळविलेंसे डोंगरीं ॥
म्लेंच्छ धर्माच्या ॥ ५५० ॥

—ज्ञानेश्वरी

हिंदुधर्म आणि हिंदुसमाज हे वेद आणि तदुक्त श्रुति, स्मृति, पुराणें ह्यांच्यावर अधिष्ठित असून यांनीं आंखून दिलेल्या मर्यादा, बंधनें आणि चालिरीति यांच्या वरच अनादिकाळापासून आज तागायत वर्षानुवर्षे चालत आले आहेत आणि त्यांवरच टिकुन राहिले आहेत. हिंदुसमाजांतील कोणताही धर्मग्रंथ अगर ज्ञातिसमाज यांच्या प्रत्येक आचार विचारांशी वेद, श्रुति, स्मृति, शास्त्रें, पुराणें ह्यांचाच आधार आहे. ह्यांच्याविरहित ज्या चालिरीति, मर्यादा, आणि बंधनें असतील तीं सर्व वेदबाह्य होत. अर्थात जो धर्म, समाज अगर पंथ, वेद, श्रुति स्मृति, शास्त्रें पुराणें अगर तदुक्त वचनें मानीत नाहींत, ते धर्म, समाज अगर पंथ वेदबाह्यच समजले जातात. सारांश, हिंदूधर्माच्या दृष्टीनें विचार केल्यास वेद हाच हिंदूधर्माचा मूळ आद्य पाया असल्यामुळें हिंदुधर्म आणि हिंदूसमाज फक्त वैदिक व अवैदिक (ह्मणजे वेदबाह्य) हे दोनच मार्ग ओळखतात. म्हणून हिंदुधर्म आणि हिंदुसमाज हेच वैदिक आणि वेदांतर्गत असून बाकी इतर सर्व धर्म व समाज हे वेदबाह्यच होत.

वेदबाह्यांतही (इतर धर्मपंथ व समाज यांच्यांत) चांगले धर्म, समाज, पंथ आहेत व असतील. त्यांना चांगले अगर वाईट

म्हणण्याचा आमचा हेतु नाहीं. पण वेदाधिष्ठित हिंदुधर्माच्याच दृष्टीनें विचार केल्यास हे सर्व धर्म, पंथ आणि समाज वेदबाह्यच ठरतात.

उदाहरणार्थः— ख्रिस्ती, इस्लामी व यहुदी हे धर्म आणि त्यांचे पंथ आणि समाज हे या दृष्टीनें वेदबाह्यच होत. अर्थात् वेदादि आणि तदुक्त श्रुति, स्मृति, शास्त्रें आणि पुराणें ह्यांच्या चालिरीति, रीतरिवाज, बंधनें आणि मर्यादा जे पाळत नाहींत ते वेदबाह्यच होत. तद्वतच सत्पंथ हा वेदबाह्य आहे असें आम्ही निश्चितपणें म्हणूं शकतो. सत्पंथाचा पाया, उत्पत्ति आणि आदि-तत्त्व हीं सर्व इस्लामी धर्मावर उभारलीं आहेत आणि त्या तत्त्वा–नुसारच सत्पंथ चालत आलेला आहे. अर्थात् त्याचीं तीं इस्लामी तत्त्वें आणि तदुक्त त्या चालिरीती, बंधनें आणि मर्यादा ह्या सर्व त्याच स्वरुपाच्या असल्यामुळें तीं सर्व वेदबाह्य होत.

सत्पंथाच्या पुढें दिलेल्या कांहीं चालिरीतिवरून वाचकांना हें सहज कळुन येईल.

१ प्रमुख सत्पंथी बंधनें

मुसलमानी धर्माप्रमाणें सत्पंथाचीं पांच धार्मिक बंधनें आहेत. तीं प्रत्येक सत्पंथी अनुयायानें शक्यतोंवर आचरणांत आणलीं पाहिजेत, असें सत्पंथी शास्त्र सांगतें. तीं पुढील प्रमाणें—
(१) कल्मा पढणें (२) नमाज पढणें (३) जकात (कर) देणें (४) पिराण्याच्या संदलास (यात्रेस) दरवर्षी नियमीतपणें जाणें (५) रोजे पाळणें.

Paval / Ami

अमी गोळी.

पिराण्यांतील काका इमामशहाच्या कबरेला संदलच्या दिवशीं धुवून काढतात. त्या धुतलेल्या पाण्यांत कबरेस लावलेलें चंदन, अत्तर आणि वर उडालेली माती असते. या पाण्यांत जो गाळ सांचून राहतो. त्या गाळाच्या काका गोळ्या तयार करतात व त्या ते आपल्या शिष्य वर्गास गांवोगांवीं पाठवितात. या गोळीस अमीगोळी म्हणतात. अमी या शब्दाचा अर्थ थुंकी असा आहे असें वाटतें. प्रत्येक सत्पंथी अनुयायी ही गोळी कळशाचें पाण्यांत मिसळून तें तीर्थ म्हणून पितात. या तीर्थास " पावळ " असें म्हणतात. अवतारपात्रब्रह्माईंद्र इमामशहा ह्यांनीं आपल्या ग्रंथांत या संबंधीं पुढील प्रमाणें वर्णन केलें आहे.

॥ नपीये अमीने न शिखे आवा ब्रम्हज्ञाननी वाण,
भीमा तु तेने चंडाळ सही लेजो जाण ॥
॥ जे नीत नीत अमी पीये ने आचार पाळे एकसो चाळीस क्रीया
तणा, ते मुनीवर तहां सुख भोगवे घणां ॥

भावार्थः- भीमा, जे अमी गोळीचें प्राशन करीत नाहीं ते चांडाळ आहेत असें समज.
जे वारंवार अमीचे प्राशन करितात ते फार सुख भोगतात.

दशोंद

सत्पंथीशास्त्रांत ज्या दानधर्म करण्याच्या चालिरीती आहेत. त्यांत मुख्यतः दशोंदची चाल प्रमुख आहे. दशोंद

ह्मणजे एकंदर उत्पन्नाचा दहावा हिस्सा. त्याबद्दल इमामशहांनी खुलासा केला आहे. तो असा:–

॥ अेजी दशोंद ते दशमी पांती कहीअे ते देजो नरअलीजीने
अहार ॥

दशोंद प्रत्येक सत्पंथी अनुयायांनीं दिलाच पाहिजे. न दिल्यास संसार सागरांतून त्याला पैलतिरीं जातां येणार नाहीं ह्मणजे मोक्ष मिळणार नाहीं. अशारितीची भयसूचक घंटा आपल्या सत्पंथी अनुयायांकरितां त्यांनीं करून ठेविली आहे. त्या दशोंदबद्दल अवतारपात्र ब्रम्हाइंद्र इमामशाहा आपल्या मुमना चेतामणी ग्रंथांत सांगतात:–

॥ अेजी अे घर दशोंदज दीजीये, ते माहे आळस न करी
अे लगार ॥

॥ अेजी दशोंद विना नहीं छुटसो सांभळो मुनीवरो कहुं छुं
वारंवार ॥

॥ अेजी दशोंद देतां जे जीव डोलावशे तेनुं हाल माल नहीं
रहे परिवार ॥

॥ दशोंद देजो आ सतगुरू मुखे (कहेतां इमामशहानें)
तेथी उतरो पेले पार ॥

॥ अेजि दशोंद नहीं देशे सतगुरू मुखे ते तो कायर थासें
ने खासे रे मार ॥

॥ तेना हैडामांथी अग्नी उठसें तारे जीवडो ते करशे रे
पुकार ! चेतन ॥

॥ भाई रे दशोंद आपणने दीधा विना नहीं चालसे,
अे गुरूनर लोभी नही रे लगार ॥
॥ अेजी खरां दशोंदी सुक्रीतवंता ते तो आवसे अमारे दुवार
(पिराणामां)
॥ आखरनी वेळा ज्यारे आवशे, त्यारे ते उतरशे पेले पार ॥
॥ जे अहां दशोंद सुकरीत देता आळस करे अपार ॥
॥ ते तहां कांठी घासना भारा माथे लई मरसे भार ॥
॥ इआ पुरी दशोंद सुकरीत आ गोर मुखे देसे आज ॥
॥ ते तहां अविचळ अमरापरीमां करसे राज ॥

भावार्थः— दशोंद देण्यास आळस करूं नका. कारण तो दिल्याशिवाय या संसारांत तरणोपाय नाहीं. तो दिल्यानेंच हा भवसागर तुम्ही तरून जाल व यमलोकींची जाचणीही तुम्हांला होणार नाहीं म्हणून दशोंद देऊन जन्माचें सार्थक करून घ्या व अक्षयीं स्वर्ग सुखाचा उपभोग घ्या. अशा रितीचा वरील पद्यांचा सारांश आहे.

मोहोर नबुवत.

मोहोर नबुवत हे नबीमहंमद साहेबांचें नूर (तेज) आहे. नबी महंमद साहेबांचे पाठीवरील चिन्हाप्रमाणें मोहोरनबुवतच्या चित्राचा आकार सत्पंथी शास्त्रांत ठरविलेला आहे. या आकाराचें चित्र सत्पंथाच्या प्रत्येक धर्मशाळेंत असतें. तसेंच तें प्रत्येकाच्या घरींही पण असूं शकतें. या चित्रांचें रोज ६ वेळां दर्शन घ्यावें. अशी मर्यादा सत्पंथी शास्त्रानें घातलेली आहे. या

चित्राचें दर्शन घेतांना " हक लाअेलाहा इललाहे महंमदर रसुलल्लाहे " (देव एक आहे महंमद त्याचा प्रेषित आहे. तो रसूल आहे.) असा मंत्र म्हणतात. अंत्यकाळीं मोहोरनबुवतचें दर्शन झाल्यास मृत मनुष्य स्वर्गांत जाऊन त्यास मोक्ष प्राप्त होतो, अशी सत्पंथी शास्त्राची कल्पना आहे.

सत्पंथनीपोल या पुस्तकांत मोहोर नबुवतचें चित्र दिलेलें आहे. त्यावर " बीसमिल्ला हर हरिमान निररहिम " असें फारसी भाषेंत लिहिलेलें असून त्याचा अर्थ ' मी परमेश्वराचें नांव घेऊन दर्शन घेतों. तो मोठा रहिमेरहिम आहे. '

बीज शुक्रवार व्रत

हिंदुशास्त्रांतील एकादशीच्या उपवासाप्रमाणें सत्पंथी शास्त्रांत बीज शुक्रवार व्रत करावयास सांगितलें आहे. कलियुगमध्यें शुक्रवारीं द्वितीयेचें व्रत करावें आणि पश्चिम दिशेकडे बसून जप करावा. महिन्यांतील शुद्ध बीज शुक्रवारच्या दिवशीं आली तर ती या दृष्टीनें विशेष महत्वाची गणली जाते. पण प्रत्येक महिन्यांतील शुद्ध बीज शुक्रवारींच येईल याचा नेम नसतो. तरी पण कट्टर सत्पंथी अनुयायी प्रत्येक महिन्याच्या शुद्ध बीजेला एकादशीप्रमाणें उपवास करतात.

|| बीज शुकरवांरी कलियुगमांहे वृत करो, अने पश्चिम दिशा बेशी जप ओचरो ||

– श्री बुद्धाअवतार

मूळ गायत्री या पुस्तकांत कलियुगाची स्थापना वैशाख

शु॥ २ शुक्रवारीं सकाळीं मूळ नक्षत्रावर झाली आहे. असें लिहिलें आहे म्हणून शुक्रवारीं येणाऱ्या शु॥ २ च्या उपवासाचें महत्त्व सत्पंथी शास्त्रांत वर्णिलें आहे. सत्पंथी शास्त्रांत कृत, त्रेता द्वापार या तीन युगांना महत्त्व नाहीं, इतकेंच नाहींतर हीं तीन युगें झालीं असें ते मानीतच नाहींत. फक्त **कलियुग** मानतात आणि तेंही या वरील तिथीस सुरूं झालें म्हणून त्या तिथीस उपवास करण्याचें महत्व सत्पंथी शास्त्राच्या दृष्टीनें आहे.

कलंकी अवतार

कलंकी अवतार (दहावा) होणार आहे अशी हिंदु-शास्त्राचीही कल्पना आहे. त्याचप्रमाणें सत्पंथी शास्त्रांतही कलंकी अवताराची कल्पना दिलेली आहे. पश्चिम दिशेकडून **शाह** म्हणजे **ह० अली** यांचेंच रूप धारण करून कलंकी अवतार **दुलदुल घोड्यावर** येणार आहे. ह० अली ज्या घोडयावर बसून स्वाऱ्या करीत होते त्याच घोडयाचें नांव दुलदुल असें होतें. अशीच कल्पना इस्लामी धर्मांतही आहे.

गतगंगा.

भजन, पूजन, पोथी किंवा पुराण संपल्यावर हिंदूमध्यें तीर्थ व प्रसाद देण्याची पद्धत आहे. त्याचप्रमाणें सत्पंथी लोकांत त्यांची पोथी वाचल्यावर अगर पूजन केल्यावर ते तेथें असलेल्या सर्व लोकांना तीर्थ देतात. त्या तीर्थास **गतगंगा** असें म्हणतात. गतगंगा म्हणजे " एका भांड्यांत पाणी घेऊन त्यावर **मुसलमाना-सारखी खतम** पढतात व त्यानंतर त्या भांडयांतील पाण्याचा

तीर्थासारखा उपयोग करतात."

—सत्पंथविजय.

कयामत.

मनुष्य मेल्यावर स्वर्ग लोकांत त्यानें केलेल्या कृतकर्माची झडती होते व त्या झडतींत त्यानें केलेल्या पापपुण्याप्रमाणें स्वर्ग सुख किंवा नरकवास प्राप्त होतो अशी एक कल्पना हिंदुधर्मशास्त्रांत आहे. त्याचप्रमाणें इस्लामीधर्माच्या तत्त्वानुसार कियामत म्हणजे महादनची कल्पना सत्पंथी शास्त्रांत दिलेली आहे. ती अशी कीं, मनुष्य मेल्यावर त्याच्या कृतकर्मांचा लागलीच झाडा न होतां सृष्टी लयास गेल्यावर सर्व मानवप्राण्यांच्या कृतकृत्यांचा झाडा घेण्याचा एकच दिवस असतो व त्या झाडयांतील त्याच्या पापपुण्याप्रमाणें त्यास भोग भोगावे लागतात.

॥ अेक दन महादन आवेछे तमे सत सबुरीसुं राखो धीर ॥
॥ तहां खुदाताला हाजी थासे ने महंमद होसे वजीर ॥७९५॥

श्री नकळंकी अवतार.

याचप्रमाणें हिंदूशास्त्रांतील पुनर्जन्माची व आत्म्याचें अमरत्वाचि कल्पना सत्पंथी शास्त्रांत नाहीं. ती इस्लामी धर्माप्रमाणें आहे.

उटासन.

उटासन ह्मणजे सुतक. मेलेल्या माणसाचें सुतक १३ दिवस पाळतात व तेराव्यादिवशीं मृताची उत्तराक्रिया करतात. त्याच प्रमाणें सत्पंथी लोक मृत माणसाचें सुतक ४० दिवस पर्यंत पाळतात ४० व्या दिवशीं सत्पंथी धर्म शाळेंत जाऊन

इमामशहाच्या ग्रंथाचें वाचन करितात नंतर तेथेंच जेवण करितात. मुसलमानी धर्मामध्यें सुद्धां या प्रमाणेंच सुतक पाळ-ण्याची वहिवाट आहे.

याच प्रमाणें पुढील चालिरितीही सत्पंथ अनुयायांत प्रचलित आहेत.

चार प्रमुख पुरुषः— सत्ययुगांत **प्रल्हाद,** त्रेता युगांत राजा **हरिचंद्र,** द्वापारांत राजा **युधिष्ठीर** व कलियुगांत **पीर सदरुद्दीन.**

चार जपः— कृत युगांत **नरसिंह** भगवान, त्रेता युगांत **रामचंद्र,** द्वापारांत **श्रीकृष्ण** भगवान व कलियुगांत **पीरशहा.**

प्रेतें जाळूं नयेतः— जमिनींत पुरावींत. कारण प्रेतांना युगपरत्वें **चार दाग** आहेत. (१) वनदाग (२) जळदाग (३) अग्नीदाग (४) कलियुगांत "**भूमिदाग**" (**प्रेतें पुरणें**)

नमाजप्रमाणें पश्चिमेस नमस्कार करावा. कृतयुगांत उत्तरेस, त्रेतायुगांत पूर्वेस, द्वापारांत दक्षिणेस, आणि कलियुगांत **पश्चिमेस.**

चार गुरुः— ब्रह्मा, विजेसठण, विदरवियास आणि कली युगांत गुरु **नवी महंमद मुस्तफा सलल्ला अलेहे व सल्लम.**

चारदानें:— हत्ती, घोडा, गाय आणि कली युगांत **बकरी.**

चार महादेवः— संभोजी, ईश्वर, महादेव आणि कली युगांत **बाबा आदम** (मक्केतील)

व्रतें व उपवासः—रविवारीं एकादशी, मंगळवारीं चतुर्दशी

सोमवारीं अमावस्या आणि कलीयुगांत शुक्रवारीं बीज.

चारघट :–सोन्याचा, रुप्याचा, तांब्याचा आणि कली युगांत मातीचा

चारतीर्थः– गततीर्थ, सुकलतीर्थ, भस्मतीर्थ आणि कली युगांत्त मुगततीर्थ [पीराणा]

चारवेदः– ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, आणि कलियुगांत अथर्ववेद.

चारपुरीः– हंसपुरी, वगपुरी, सामपुरी, आणि कळियुगांत हेमपुरी (पिराणा)

या प्रकरणांत दिल्याप्रमाणें सत्पंथ समाजांत चालिरित रूढ आहेत. ह्या चालिरिती हिंदुधर्माच्या अगर हिंदुसमाजाच्या कोणत्याही विभागांत येऊं शकत नाहींत हें सहज कळण्यासारखें आहे. त्यावरून सत्पंथ वेदबाह्य आहे किंवा नाहीं हें सहज कळण्यासारखें आहे.

—x—

भूल भूलवणीचें चक्र.

सृष्टि नियमें सत्य जें, तेंच सत्य ह्मणती;
बाकी सर्व त्या कल्पना, नक्की फोलच होती.

आतां पर्यंत सत्पंथाची उत्पत्ति, त्याचा प्रसार, त्याचे संस्थापक त्याचें सत्यस्वरूप, आणि चालीरीति संबंधीची माहिती आलेलीच आहे. या सर्व माहितीवरून वाचकांना कळून येईल कीं, इस्लाम धर्म वाढविण्याकरितां त्याच्या प्रचारकांनीं हिंदू लोकांना भूलथापा देऊन भोळेपणानें आपल्या जाळ्यांत पकडण्याचा प्रयत्न केला व कांहीं अंशीं तो त्यांच्यादृष्टीनें सिध्दीसही गेला. कारण हिंदू-लोक हे स्वभावतः भावनाप्रधान असल्यामुळें धर्मासंबंधींच्या त्यांच्या नाजूक भावना प्रथमारंभींच सत्पंथ प्रचारकांनीं आकर्षित करून घेतल्या ह्मणून अगदीं आरंभापासून सत्पंथ ज्या घरा-ण्यांत भावना प्राधान्येंकरून शिरला तो कित्येक वर्षांत त्यांच्या घराण्यांत वंशपरंपरागत टिकून राहिला आणि ते लोकही केवळ अंधश्रध्देनें या चक्रांत अडकून राहिले. पण सत्पंथाचें सत्यस्वरूप उघडकीस येऊं लागल्यावर जे कित्येक सत्पंथी जागृत झाले, त्यांनीं या चक्रांतून सुटण्याचा प्रयत्न केला. अशा प्रयत्नांची थोडक्यांत रुपरेखा मागील कांहीं प्रकरणांतून आलेलीच आहे. पण सत्पंथ हा " भूलभूलावणीचें चक्र " म्हणजे थापाभूपांना बळी पडून चक्रांत ओढणारा आहे. अशा तऱ्हेचें एक जुनें हस्त-पत्रक बडोदा येथील भारत विजय प्रेस मध्यें छापलेलें आम्हास आढळलें सदरचें हस्तपत्रक लिहिणाराचें नांव त्यांत उघडपणें

Book - Bhulbhulavaniche Chakra

जरी दिलेलें नसलें तरी सदरहू लेखक ' इमामशाही पिराणा पंथापासून मुक्त झालेला मुमना ' आहे हें त्यावरून स्पष्ट दिसतें. म्हणून तें जसेंच्या तसेंच पुढें देत आहें

" वर्षानुवर्षे आमचे पिराणा बंधू सत्पंथाच्या भ्रम जाळ्यांत तडफडत आहेत. पावसाळ्यांत जसे बेडूक पुष्कळ होतात तसे कुणबी, पाटील, माळी, साळी, तेली, तांबोळी, शिंपी, कोष्टी, कुंभार आदि जातींचे हिंदू अज्ञान, अशिक्षित आणि अक्कलहीन होतां, या देशांत अनेक मत-पंथांचीं पेवें फुटलीं, त्यांत सत्पंथाची आणखी एक भर पडली. जमाना ओळखणाऱ्या धूर्त मूर्ती हजरत इमामशहानीं अथर्ववेदाच्या नांवाखालीं लोकांना आवडत्या गोष्टी सांगून व जादूगारासारखे खेळ, तमाशे, चेटके आणि चमत्कार दाखवून, अज्ञ हिंदूंच्या गळ्यांत मुसलमानी घंटा अशा चलाखीनें बांधून टाकिली कीं, या सत्पंथाच्या फासांत शेंकडों भोळे हिंदु पक्षी गुंतून-अडकून-फसून पडले ! (ईश्वराचा अवतार होणें हें वेद तसेंच कुराणाच्या विरुद्ध मत असतांही) इमामशाह ईश्वराचा सर्वांत श्रेष्ठ अवतार आहे असें सत्पंथाचें पकडलेलें शेपूट यांच्यानें सोडवत नाहीं. मोमिन किंवा मुमना बनून मढ्याला पुरण्याची कुप्रथा, जी सायन्स, आरोग्यशास्त्र आणि अथर्ववेदाच्या अगदीं विरुद्ध आहे तिला यांनीं सनातन धर्म मानिला आहे. सोडलेल्या पोळांसारखे काका आणि कबरपरस्त-मढें पूजक सैयदांना धर्मगुरु सारखा परंपरेनें-वंशपरंपरेचा इजारा दिला आहे. अघोरी बाबा सारखी मसणवट्यांत जेवणावळीचीं पारणें चालविलीं आहेत. लग्न

विवाहादि मंगळ कार्यांत पवित्र वेद मंत्र आणि सुगंधी हवना ऐवजी निकाहचे नाडे बांधण्याचे पसंत केलें आहे. सुतेचें-सुन्नतचें कफडे घुसवून ईश्वरापेक्षां शहाणे होण्याचे शाहाणपणाचा डौल व थोतांड माजविलें आहे. स्रीयांच्या मासीक विटाळाचें अशौच पाळण्याचे बंद केले आहे आणि वाममार्गीयांचेबर ताण केली आहे. मृतिकाचे-मेलेल्यांचें-स्नान सूतक काढून काश्मिरी कोकशास्त्रांना महात केलें आहे. या सर्वांचा परिणाम हा झाला आहे कीं, बोलण्यांत चालण्यांत, वापरण्या सवरण्यांत, खाण्यापिण्यांत आणि पेहेर वेशांत यांचा हिंदुसारखा देखावा असूनही, या पिराण्याचा समावेश किंवा गणती साधारण हिंदूत होत नाहीं. रखडते भिकारी आणि भिक्ष वडाऱ्यासारखे पिराणा किंवा मुमन्यांच्या पाण्याचा शितोडा चुकुनही घेण्यास धजत नाहींत. सत्यानाशी सैयदानीं बनविलेल्या अमीनी गोळ्या खात असतां, कोणाची देह शुद्धि झाली नाहीं ! पीरांच्या रोझांना सोन्या रुप्याचीं दारें करून देत असतां कोणाची मूर्खता टळली नाहीं. सत्पंथाच्या गुरु घंटाळयांनीं पांडवाकडून गोहत्या करवून त्यांना वैकुंठांत पाठविलें असतां, पीराणे अद्याप काळमीढ दगडासारखे दुनीयेंत हडधूत होत आहेत. अर्धदग्ध पीराणा पंथाची कंठी बांधणाऱ्यांना नरसिंह अवताराःसारखे माणसांत गणावें किंवा पशूंत गणावे याची उमज कोणाःहि पडत नाहीं. गायीच्या ऐवजीं म्हशीचें दान करण्याचा हव्यास धरणाऱ्या टोणग्या सारख्याच्या स्थूल बुद्धिची किती महती गावी ! स्वार्थी सैयद आणि सद्धर्थी लक्ष्मण काका

Sunnat

सत्पंथाची जुगजुगाची जोडून काढलेली कहाणी सांगतांना आणि ती खरी मानणाऱ्यांना काय म्हणावें ? शाहपीराला शरण गेल्यानें स्वर्गांत हिरेमाणिकांनीं मढविलेले महाल आणि ७० पऱ्याहुऱ्या मिळण्याच्या लालसेनें तोंडांतील लाळ गळूं लागते. निरामय प्रभूच्या पवित्र स्वर्गाची ही विटंबना पुण्यकारक-पीराणी भासते. भयंकर पापें माफ होण्याच्या वृथा आशा मठ्ठ डोक्यांतून कधींहि करून सुटत नाहींत. कयामत् म्हणजे न्यायाचा दिवस येईपर्यंत कबरींतील कुचंबपणा जात नाहीं. स्वर्गाच्या न्यायाच्या अदालतीची ही विटंबना रास्त भासते. हिंदु देवता आणि पीरांच्या नांवाच्या खिचड्या यांच्या आशिर्वादानें दूधपित्या बालकांना कंकण बांधण्याचें पुण्य मानून घेतलें आहे. अज्ञानतेच्या घनघोर वादळापुढें ज्ञानाचा प्रकाश कोठून पडणार ? पीराणे हे शुद्ध हिंदू कोणत्या प्रकारें असूं शकणार ! बांधवांनो, तुम्ही अगदींच भ्रमलेत, भोळसलेत व ठकविले गेलांत. आतां थोडे डोळे उघडा आणि पहा कीं, या ज्ञान युगांत तुमच्या बाजूला काय होत आहे. इस्लामचा सत्पंथी पिराणा अजगर तुम्हांला सर्वांग गिळून अणू मात्रहि दम घेणें बंद करील. त्यापूर्वींच वेळेवर जागे होऊन शोध करा. तपास करा. सत्पंथांत सांगितलेल्या गोष्टी सृष्टीनियम आणि शास्त्रांप्रमाणें खऱ्या आहेत कीं, केवळ कपोल कल्पित मात्र गप्पाष्टकें आहेत. दिल्लीच्या ख्वाजा हसन निजामीचे " दाईये इस्लाम, म्हणजे इस्लामची कार्यवाही " तसेंच मांग-रोळचे पीरजादा मोटामियाचे " तरकीबे तालिम तओ हिंद "

Book - Dai-e-Islam

Book - Tarkibe Talime Tao Hind

म्हणजे डावपेचानें कावेबाज सचाईने अथवा ढोंग सोंगानें अधर्मीनें बाटाविणें असें डावपेच-बाटविण्याच्या खुऱ्या-बाबती तीनशेंहून अधिक असल्याचे त्या पुस्तकांत २२० पानावर स्पष्ट नमूद केलें आहे. आणि अशा प्रकारे मरशायरव म्हणजे पीर, फकीर, इमाम वैगेरे असत्य प्रयत्न करतात म्हणून आलिम म्हणजे विद्वान ज्ञाते मुसलमान लोक या सत्पंथीयांस " कुफर " नास्तिक म्हणतात. म्हणून ह्या पीराणा सत्पंथीयांनीं यांच पुस्तकाच्या २१८ पानावर नक्राश्रू ढाळले आहेत—कांगावा केला आहे. **जो पंथ खऱ्या मुसलमानास आवडत नाहीं. तो तुम्हांस आवडावा ?** हा अधःपात होय. या स्वतंत्रतेच्या युगांत काका म्हणजे गूलामाची धार्मिक गुलामी कोठपर्यंत करणार ? सैयदापायीं तनमन आणि धनानें कोठ पर्यंत खराब होणार ? जर्दा, पलाव, कदोरी, गुडाकु कोठ पर्यंत पुरे पाडणार. " स्तुतीस कीं ईश्वर पात्र होतो, तसा तिला मानव काय होतो ? " या साध्या सुभाषिताकडे माणूसकीनें लक्ष द्या. जर तुह्मांला तुमच्या सनातन पवित्र मायधर्माकडे वळणें असेल जर तुम्हांला लागलेलें कांछन धुवून टाकणें असेल, जर तुम्हांला अहिंसक बनणें असेल, जर तुमचे सत्याप्रत प्रेम असेल, जर तुह्मी कलम्याच्या कारीच्या किकाळयांनीं कंटाळले असाल, जर तुह्मीं सेजदा करून कंटाळला असला, जर तुह्मी धंतर मंतर करून आणि धागा दोरा करून थाला असाल, जर तुह्मांला निजाम आणि रोजांच्या भूताटकी पासून सुटणें असेल, जर तुह्मांला तुमच्या संतानांना स्वावलंबी, मजबूत, स्वतंत्र

आणि शिक्षित करावयाचें असेल, इतकेंच नव्हे पण जर तुह्मी हरएक प्रकारें सुखी होऊन शांति मिळविण्यास इच्छित असाल, जर तुम्हांला लाखो मळकाना रजपूतांसारखा (मुसळमान झाल्याचा) पश्चात्ताप होत असेल, जर तुह्मी संसाराला स्वर्गधाम करायला मागत असाल तर आजच काका आणि सैयदांना शेवटचा सलाम करून त्यांच्या गुलामगिरीचें सत्पंथाचें हें जोखड एकदम फेकून द्या. "

वरील मजकूर वाचून कोणासही वाटेल कीं, सत्पंथ हें खरोखरीचेंच भूलभूलावणीचें चक्र आहे. सत्पंथाच्या भूलभूलावणीनें त्याच्या संस्थापकांनीं व प्रचारकांनीं सत्पंथ शास्त्रांस कसें विकृत स्वरूप आणून ठेविलें आहे हें तीं शास्त्रें किंवा सत्पंथासबंधींचे इतर ग्रंथ वाचल्यानें कळून चुकतें. हिंदुस्तानांत निरनिराळे धर्म संस्थापक आणि पंथ संस्थापक होऊन गेले. ते धर्म आणि ते पंथ हल्लीं हिंदुस्तानांत आहेतच. पण त्या सर्वांमध्यें हा सत्पंथ कोणत्या मूळ तत्त्वावर उभारला गेला आहे हेंच समजत नाहीं. इतर धर्मांचीं किंवा पंथांचीं आदितत्त्वें मूलभूत तरी आहेत. पण सत्पंथाला मूलभूत तत्त्वच नाहीं. तसें मूलभूत तत्त्व सत्पंथास असतें तर सत्पंथाचे आणि त्यांच्या अनुयायांचे वाभाडे बाहेर आलेच नसते आणि त्याच्या कित्येक अनुयायांनीं तो त्यजिला नसता. आम्ही स्पष्टपणें प्रतिपादूं शकतों कीं, निदान हिंदुस्तानांत तरी सत्पंथासारखा तत्त्वहीन आणि संस्कृतिहीन दुसरा कोणताही पंथ अगर धर्म नसेल, तसें असतें तर सत्पंथाचे मूळ-

Based on Taqiyya / Takia / तकिया

भूत शास्त्रग्रंथ निदान अलीकडील काळांत सत्पंथीयांनीं छापून प्रसिद्ध केले असते. सारांश, आपल्या शास्त्रांच्या मोठ्या आणि चांगल्या नांवाखालीं नुसत्या भूलथापीनें लोकांचीं मनें बळी पाडावयाचीं आणि शास्त्रग्रंथ मात्र अमुद्रित आणि अप्रकाशित ठेवावयाचे, हा सत्पंथ संस्थापकांचा मूळ उद्देश स्पष्टपणें दर्शवितो कीं, भूलभूलावणीच्या चक्रांत ओढूनच हिंदूंना अस्तेअस्ते आणि न कळत इस्लामी बनवावयाचें असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं.

---X---

बऱ्हाणपूर सत्पंथ

आतांपर्यंत पिराणा सत्पंथाची शक्यतों माहिती त्याच्या ग्रंथांच्या आधारें परिशीलन करून दिली. पिराणा सत्पंथाची शाखा फैजपूर येथें आहे व त्या संबंधींही माहिती मागील एका प्रकरणांत दिली आहे. त्याचप्रमाणें बऱ्हाणपूर येथेंही सत्पंथाची एक शाखा असून तिचें महत्व पिराण्यासारखेंच त्या भागांतील सत्पंथी लोक समजतात व ते त्यांचें पवित्र क्षेत्र म्हणून मानण्यांत येतें. म्हणून तेथें पिराणा शाखेचे अनुयायी आणि बऱ्हाणपूर भागांतील या शाखेचे अनुयायी हे सर्व सत्पंथवाले या ठिकाणीं यात्रेस जातात. बऱ्हाणपूर येथील या शाखेची सर्व व्यवस्था व कामें पिराण्यासारखींच करितात. या शाखेसंबंधीचें आणि तिच्या सत्पंथी अनुयायासंबंधींचें संक्षिप्त माहिती पत्रक **सिरसगांव कसबा** येथील कांहीं बारी ज्ञातींतील लोकांच्या सहीनें प्रसिद्ध झालेलें आहे. त्यांतील सर्व मजकूर शब्दशः देत आहें. त्यावरून बऱ्हाणपूर शाखेचा सत्पंथ कशा स्वरुपाचा आहे हें वाचकांना कळून येईल.

Book - Sirasgaon Kasba

"पंथवाले म्हणजे प्रत्यक्ष दाढी वाढविणारे मुसलमान नसून मुसलमानी धर्माप्रमाणें वागणारे आहेत. हिंदूंचें पवित्र क्षेत्र काशी, मुसलमानाचा मक्का, शिखांचें अमृतसर, मानभावांचे रिद्धपूर, व पंथवाल्यांचें बऱ्हाणपूर हीं पवित्र क्षेत्रें होत.

पंथवाल्यांचा मुसलमान गुरु आहे व तो मुसलमान गुरु पंथवाल्यांना मुसलमानी धर्मच शिकवतो. तो बऱ्हाणपूरास राहतो. हे पंथवाले तेथें मक्केच्या ऐवजीं 'हज' करितां यात्रेस जमतात.

मुसलमान गुरुचे पंथवालेभक्तांचे घरीं आगमन.

गुरु फिरस्तीवर असतांना पंथवाल्याचे घरीं आल्यावर जे मुसलमान गुरुचे पायाचे आंगठे धुवून तें तीर्थ म्हणून पितात. व पायाच्या आंगठ्याची पूजा करतात. ती अशी:—

आंगठ्याला गंधाक्षता लावून फुलेंही वाहतात व सर्वजण नमस्कार करून प्रत्येकीं एक रुपया दक्षणा देतात. सर्व हिंदु समाजाला अत्यंत प्रिय व पूज्य जी गोमाता तिचें मांस हे पंथवाल्यांचे मुसलमान गुरु आवडीनें सेवन करतात अशांच्या आंगठ्याचें तीर्थ घेणें, हिंदूंना किती अपवित्र व पापमूलक आहे, याचा सूज्ञ वाचकांनींच विचार करावा.

मलीद्याचा नैवेद्य एका ताटांत भरून गुरुपुढें ठेवतात. त्या नैवेद्यांतून त्यांचा तो मुसलमान गुरु पांच ग्रास घेतो व बाकी राहिलेलें अन्न प्रसाद ह्मणून सर्व पंथवाले खातात.

Satpanth Prasad

मुसलमान गुरुचा पंथवाल्यावर कर.

पंथवाल्यापैकीं मयत बाई असो, मुलगा असो, त्याचे अंगावरील डागीन्याबद्दल १२॥ रुपये या मुसलमान गुरुकडे सर्व पंथवाले ' जकात ' ह्मणून पाठवितात. हे रुपये दिले म्हणजे मृतात्मा मुक्त झाला म्हणजे त्यास मुसलमान धर्माप्रमाणें पुनर्जन्म नाहीं, अशी या लोकांची गुरुनें समज पटवून दिली आहे. व ह्या पंथांत आपले शिकले सवरलेले शहाणे म्हणविणारे लोकही, डोळे असून आंधळे व ज्ञान असून मूर्ख बनले आहेत. पंथवाल्यांचे घरीं म्हैस जनो, गाय जनो किंवा कोणी बाई प्रसूत होवो;

त्यांना जकात ह्मणून पांच पायली धान्य द्यावें लागतें.

पंथवाल्याशिवाय कोणत्याही मय्यतीस (प्रेत यात्रेस) पंथवाल्यांनीं खांदा दिला असतां, त्यांना सव्वा रुपया दंड द्यावा लागतो.

पंथवाल्यांनीं व्याज खाल्ले तर त्यांना मुसलमानी धर्मा-प्रमाणें दंड द्यावा लागतो.

चांदरात्रींचा मलीदा खाणें झाल्यावर त्या मातीच्या वाटींत प्रत्येकी एक पैसा चिरागी म्हणून टाकतात.

पंथवाल्यांची दिक्षा.

पंथवाल्यापैकींच काजी मुकरर असतो. इतर मनुष्यास जर पंथवाले करावयाचे असल्यास मुसलमानी धर्माप्रमाणें गुसल देतात. म्हणजे स्नान करणें, अंगावरील सर्व कपडे धुणें व कलमे पढून बत्तीशाचें पाणी पाजणें, म्हणजे पंथवाला झाला. याचाच अर्थ मुसलमान झाला. मग त्याला ते बिसमिल्ला अल रहिमाने रहिम व कलमे शिकवितात. बाकी कोणासच कांहीं सांगत नाहीं. कोणा बाईस पंथांत घेणें असल्यास तिचे अंग धुणें, कपडे धुणें, कुंकू पुसून टाकणें, बांगड्या फोडणें, जोडवे फोडून टाकणें इतके विधि झाल्यावर कलमे पढून गोड पाणी पाजतात. याचा अर्थ मुसलमानी दिक्षा देतात. हे मुसलमानी धर्माभिमानी उजळ माथ्यानें आपलें हिंदुसमाजांत वावरत आहेत.

मुसलमानी धर्माप्रमाणें पंथवाल्यांचे पांच धार्मिक भाग.

मुसलमानी धर्माप्रमाणें पंथवाल्यांतही कल्मे, नमाज

जकात, हज (बम्हाणपूरची यात्रा) रोजे ह्याप्रमाणें पांच भाग आहेत व हे लोक सर्व पाळतात.

प्रत्येक पंथवाल्यास खाली लिहीलेले कलमे येतात.

अव्वल कलमे तयब:— ला इलाहा इल लल्लाहो मोहमद रसुलल्लाह

दुय्यम कलमे शहादतः-- अशहदो अनला इल लल्लाहो वाहदहू ला शरीका लहू अवश हदो अनना मोहनमदन आबदोहू व रसूलो

सैयुम कलमे तमजीतः-- सुबाहा न लाहे वल हमदो लिल्लाहे वला इल्लाहा इल लल्लाहो वल्लाहो अकबर वलाह वला कुव्वता इल्ला बिल्ला इल अली इल अझीम.

अशाप्रकारें आणखी दोन कलमे आहेत ह्मणजे एकूण पांच कलमे सर्वत्रांस येतात असें नाहीं. कोणास एक कोणास दोन तर कोणास तीन अशा प्रकारें येत असून त्यांच्यामध्यें जो काजी मुकरर असतो. त्याला मात्र सर्व आलेंच पाहिजे.

मुसलमानी धर्माप्रमाणें यांचे धार्मिक संस्कार

पंथवाल्यापैकीं कांहीं कांहीं लोक सुंताहि करितात. ती अशी:- इंद्रियावर नागवेलीचे पानाची पुंगळी करून ती ते कापून घेतात.

Sunnat

मसजीतींमध्यें मुल्ला अजान देतो हे लोकही मनांतले मनांत अजान म्हणत असतात:- अल्लाहो अकबर अल्लाहो अकबर ह्याप्रमाणें चार वेळां.

अशहदो अनला इलाहा इल लल्लाहः- ह्याप्रमाणें दोन वेळां.

वगैरे वगैरे ह्यासारखे मुसलमान लोकांप्रमाणें कांहीं लोक

मनांतले मनांत म्हणत असतात.

कोणी कोणी **नमाज** पढतात. रमजान महिन्यांत रोजे पाळतात. मुर्दा गाडतात. तेव्हां त्याचे डोके मुसलमानी धर्माप्रमाणें उत्तरेकडे करून तोंड (क़िबलेके तरफ) म्हणजे पश्चिमेकडे व पाय दक्षिणेकडे करतात हिंदु धर्माप्रमाणें कोणासही जाळींत नाहीं.

Dhafan

मय्यत मनुष्याचा दसवा करून सव्वा महिन्यानंतर केव्हांही चालीसवा करितात.

चांदरात

ही चांदरात प्रत्येक शुद्धामध्यें प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत केव्हांही करीत असतात. त्यांत हिंदुधर्माप्रमाणें कळस मात्र करीत असतात. बाकी सर्व विधी मुसलमानी धर्माप्रमाणें असतो. काजी साहेबाची गादी असते. त्या गादीची ते पूजा करून मग काजी गादीवर बसतो. पंथवाल्यामध्यें पांडवांची पूजा कधीं कधीं होत असते. त्या पूजेला ते कणकीची गाय करून बळी देत असतात.

Cow Of Wheat Floor
गव्हाचे पीठाची गाय

मुसलमानी धर्माप्रमाणें हे लोक गंध व गुलाल कधींच लावीत नाहींत. व बाया-मंडळी चांदरात्रींचे पूजनास जातांना कपाळाचें कुंकू पुसून टाकतात व पंथांत गेलेल्या बाया-मंडळी कधींच कुंकू लावीत नाहींत, जोडवे घालीत नाहींत डोक्याला नाडे बांधीत नाहींत.

मुसलमान लोकांप्रमाणें हे पंथवाले व्याज घेत नाहींत. जर

कोणी घेतलेंच तर त्याला मुसलमानी धर्माप्रमाणें दंड द्यावा लागतो

मुसलमानी लोकांप्रमाणें हे पंथवाले हिंदु धर्मांतील कोण-त्याच देवाची पूजा करीत नाहींत, इतकेंच नव्हे तर नमस्कार देखील करीत नाहींत.

पंथाची गुप्तता.

ही माहिती चव्हाट्यावर आणणारा ' दोजखमे ' नरकांत जाईल असें म्हणतात.

हुशार मनुष्यास ते आपले पंथांत घेत नाहींत. पूजा पाह-णारास तो आंधळा होईल असें म्हणतात. आणि ह्या सगळ्या गोष्टी त्यांस माहित असूनही ह्या गोष्टींचा ते दुसऱ्या चौघांत मागमूसही लागू देत नाहींत. इमान करण्यास तयार होतात. पंथां-तील मनुष्यानें जर दुसऱ्याला अशी माहिती सांगितली तर तो पिसा होईल असें म्हणतात. "

— —×— —

भोरगांव पंचायतींत सत्पंथ.

सत्पंथ हा हिंदु धर्मातील पंथ नाहीं. व तो निव्वळ इस्लामचाच एक भाग आहे असें पूर्णपणें कळून आल्यावर लेवा पाटीदार समाजांतील कांहीं लोक त्याचे अनुयायी असून गुप्त रितीनें सत्पंथाच्या तत्वांप्रमाणें पूर्णपणें वागतात असें कालांतरानें हळूंहळू आढळून आल्यावर सर्व साधारण समाजांत या सत्पंथी लोकांबद्दल संशय उत्पन्न होऊं लागला व तो सत्पंथी अनुयायांच्या आचारांविचारांवरून पाडळसें येथील लेवा पाटीदार समाजाच्या भोरगांव पंचायतींत सन १९०६ मध्यें उघडपणें अर्ज स्वरूपांत जनतेसमोर प्रगट झाला.

Varhad = Vidarbha Old Name is

YEAR 1906

लेवा पाटीदार समाजाची वस्ती खानदेश व वऱ्हाड मिळून दोनशें गांवांत असून लोकसंख्या दोन लाखांच्यावर आहे. फार प्राचीन काळापासून पंचायत स्वरूपाची सामाजिक अनुशासनपद्धति या समाजांत अद्यापपर्यंत रूढ आहे. या पंचायतीचें मुख्य ठिकाण पाडळसें (ता० यावल) हें गांव असून, त्या ठिकाणीं जातींतील मुख्य मुख्य लोक एकत्र जमून सामाजिक बाबींचा निकाल देतात. पाडळसें येथें पंचायतीच्या व्यवस्थेकरितां कुटुंबनायक असतात. पंचायत भरविणें व तींत झालेले ठराव अमलांत आणणें हीं कामें ते करतात. खानदेश व वऱ्हाडांतील लेवापाटीदार पंचायतींचें मुख्य ठिकाण पाडळसेंच असून दोन्ही प्रांत मिळून मोठी पंचायत भरावयाची झाली ह्मणजे त्यावेळीं दोन्ही प्रांतांतील सर्व गांवांचे मुख्य मुख्य लोक पंचायतीस येतात. साधारणतः पंचायतीस येणारांची संख्या

Padalse Village, Yawal Tal, Jalgaon Pin 425501

Location on Google Maps: https://goo.gl/maps/MwU0Z

८००० ते १०००० पर्यंत असते. एवढा मोठा लोकसमुदाय एक मतानें जो निकाल देईल, त्याप्रमाणें जातीच्या किंवा समाजाच्या बाबतींत समाजांतील सर्व व्यक्तींना वागावें लागतें. सन १९०६ सालीं खानदेश व वऱ्हाड मिळून लेवा पाटीदार समाजाची पंचायतीची सभा पाडळसें येथें भरली होती. त्याच वेळीं सत्पंथाच्या या वादाचा सूत्रारंभ खिरोदें व चिनावल येथील पंचांच्या सत्पंथाविषयींच्या अर्जानें झाला. तेव्हांपासून या वादास कसकसें स्वरूप येत गेलें व त्याचे परिणाम व शेवट कसे झाले हें सदरच्या प्रकरणांत देत आहें.

सन १९०६ च्या पंचायतींत खिरोदें व चिनावल येथील पंचांचा सत्पंथवादाचा अर्ज मांडण्यांत आला व त्यावर हा सत्पंथ मुसलमानी आहे किंवा हिंदू आहे याबद्दल पुष्कळ वेळ चर्चा झाली. या पंचायतींत फैजपूर येथील श्री **बधु जाना महाजन** (श्री. तोताराम महाजन यांचे वडील) आणि इतर सत्पंथी अनुयायी हजर होते. तसेंच वऱ्हाडांतील दाभाडी गांवचे श्रीमान् व वयोवृद्ध गृहस्थ श्री. शंकर तोताराम पाटील (बुलढाणा येथील बॅरिस्टर टी. एस्. पाटील यांचे वडील) हेही हजर होते. या सर्वांनीं व जातींतील जमलेले प्रमुख लोक, यांनी सत्पंथाच्या शहानिशेच्या वादांत भाग घेतला होता. श्रीमान् शंकर तोताराम पाटील हे त्या पूर्वी सत्पंथी अनुयायी होते. पण त्यांनीं त्यावेळे पूर्वी कांहीं वर्षें हा पंथ सोडलेला होता. अशा वजनदार व अनुभविक श्रीमान् गृहस्थानें तेथें जमलेल्या सुमारें ६००० लोक

Faizpur

Buldhana

Some resolutions can be found in Satpanth Vijay book - ID 147

समुदायांत मी व माझ्या घराण्यानें सत्पंथ का सोडला हें व्यवस्थितपणें निवेदन केलें. शेवटी " ला इल्लाहा, महंमदुर रसुलिल्लाहे " वगैरे सत्पंथांतील कल्मा पढून दाखविल्या व शेवटीं आपलें मत व्यक्त केलें कीं, हा सत्पंथ इस्लाम धर्मापासून उत्पन्न झाला असून पूर्णपणें मुसलमानी तत्त्वांचा आहे " हें ऐकून पंचायतीच्या या सभेतील सर्व लोक आश्चर्यचकित झाले व सर्वांनीं एकमतानें असें ठरविलें कीं, " आपल्या लेवा पाटीदार जातींत ज्या ज्या लोकांनीं सत्पंथ स्विकारला असेल अगर ज्यांच्या घराण्यांत पूर्वापार चालत आला असेल त्या सर्वांनीं तो सोडून द्यावा व आपल्या हिंदूधर्माप्रमाणें व आपल्या सामाजिक रितीप्रमाणें वागावें." असा निकाल दिला. त्या सभेंत जे सत्पंथी अनुयायी हजर होते त्यांनीं ' आज पासून आम्हींही हा सत्पंथ सोडला ' अशा प्रकारच्या लेखांवर सह्या केल्या. त्यांत श्री. बधुजाना महाजन यांनींही प्रामुख्यानें सही करून ' मी आजपासून हा सत्पंथ सोडला ' असें जाहीरपणें कबूल केलें.

पुढें सदरहू पंचायतींतील सत्पंथासंबंधीं झालेला ठराव सविस्तरपणें पाडळसें येथील कुटूंबनायकांनीं सर्व साधारण जनतेस समजण्याकरितां, गांवोगांवीं पाठविला व त्याजबरोबर या सभेंत सत्पंथ सोडणारांची यादीही पण दिली व गांवोगांवच्या पंचांना कळविलें कीं, या शिवाय जे सत्पंथी अनुयायी आपआपल्या गांवीं असतील त्यांनाही हा सत्पंथ सोडण्याबद्दल समजूत द्यावी. या प्रमाणें सत्पंथाची लेवापाटीदार समाजांत सर्व दूर माहिती झाली. कुटूंबनायकांच्या

या पत्राप्रमाणें त्या सभेंत हजर नसलेले कांहीं सत्पंथी (विशेषत: फैजपूरगांवचे) सत्पंथ सोडण्यास नाकबूल झाले. त्यावरून फैज-पूर येथील पंचांनीं, सत्पंथ सोडण्यास जे जे लोक नाकबूल होते; त्यांच्या याद्या करून पाडळसें येथें कुटुंबनायकाकडे पाठविल्या. त्या वेळेपर्यंत सत्पंथाचे आचरण करणाऱ्या सत्पंथी अनुयायांची संख्या सर्व लेवा पाटीदार समाजांत कुटुंबनायकाकडे आलेल्या गांवोगांवच्या याद्यांप्रमाणें ९१ होती.

या प्रमाणें ज्या त्या गांवांत कट्टर सत्पंथी कोण कोण आहेत हें या ४—५ महिन्यांच्या अवधींत म्हणजे (जेष्ठ शु॥ १ संवत १९६२ च्या ता० ४।५।१९०६ च्या) मिटींगनंतर पूर्णपणें कळून चुकलें, पण हे कट्टर सत्पंथी व त्यांचे सगेसोयरे इष्टमित्र, भाऊबंद इत्यादि लोकांचा त्यांच्याशीं सर्व प्रकारचा संबंध चालू राहिल्यामुळें, इतर बहुजन समाजास हें आवडलें नाहीं. म्हणून या सत्पंथी लोकांच्या धार्मिक व सामाजिक प्रश्नाचा कांहींतरी कायमचा निकाल करावा, असें जातींतील प्रमुख लोकांस वाटूं लागलें. म्हणून याच वर्षी आश्विन शु॥ १ रोजीं पुन: पाडळसें येथें पंचायत भरविण्यांत आली. या वेळीं पंचायतीच्या या सभेस वरील ९१ सत्पंथी यांस मुद्दाम बोलाविण्यांत आले होते त्यापैकीं कांहीं जण आले होते व कांहीं जण सभेस आले नव्हते. पंचांनीं व इतर जाणत्या लोकांनीं सत्पंथी लोकांची त्यांना सत्पंथ सोडण्याबद्दल चांगली समजूत घातली. व त्याप्रमाणें त्यांनीं सत्पंथ सोडला. अशा रितीनें त्यांनीं

सत्पंथ सोडला व सभेंत याप्रमाणें आचरण करणार नाहीं असें कबूल केलें. तरी पुढें त्यांनीं (पंचायतीच्या सभेनंतर) आपलें आचरण गुप्तरितीनें सत्पंथाप्रमाणें चालूच ठेवलें. सन १९१९ सालापर्यंत समाजांतील लोकांनीं तिकडे लक्ष दिलें नाहीं किंवा त्या संबंधीं पंचायतींत हा प्रश्न निघण्याकारितां कांहीं विशेषसें कारणही पण घडलें नाहीं.

YEAR 1919

सन १९१९ सालीं फैजपुर येथील पांच सहा इसमांनीं हा सत्पंथ नव्यानें स्विकारला, ह्मणजे सत्पंथास व त्याच्या अनुयायांस ५।६ जण जास्त येऊन मिळाले. ह्मणून फैजपुरच्या पंचांनीं त्यांच्या गांवची सभा भरवून या ५।६ जणांस वर्ज्य केलें. व त्यांनीं पाडळसें येथील भोरगांव पंचांस तसें कळविलें. कळविणाऱ्या पंचामध्यें श्री. तोताराम बधु महाजन यांचीही सही होती. यानंतर पाडळसें येथें ता. १५ मे १९१९ रोजीं भोरगांव पंचायतीची सभा नेहमी प्रमाणें भरली. तींत ज्या ५।६ इसमांनीं सत्पंथ धर्म स्विकारला होता. त्यांना भोरगांव पंचांनीं वर्ज केलें व तसेंच जे कोणी त्यांना साह्य करतील त्यांनाही त्यांच्यासारखेंच बहिष्कृत केलें जाईल, असें पंचायतीच्या सभेंत ठरविण्यांत आलें.

Date: 15-May-1919

पुढें कांहीं दिवसांनीं बहिष्कृत केलेल्या सत्पंथी माणसांनीं सत्पंथासंबंधी समाजाचें काय मत आहे व त्याचे (सत्पंथाचे) अनुयायी किती लोक आहेत हें अजमावण्याकरितां फैजपूर येथील सत्पंथांच्या धर्मशाळेंत एक भोजन समारंभ केला. त्या भोजनात फैजपुर येथील ५७ इसम जेवले. तसेंच आमोदे, राजोरें

विबरें, चिनावल, उटखेडे व मुतखेडे या गांवांतील कांहीं लोकही जेवावयास आले होते. जेवण्यासंबंधीची ही सविस्तर हकिकत फैजपुर पंचांनीं पाडळशास कळविली. हें कळवितांना पंच म्हणून कळविणाऱ्या पंचांमध्यें श्री. **तोताराम बधू महाजन यांची सही पुनः होतीच.** फैजपूरकर पंचांनीं कळविल्याप्रमाणें पाडळसे येथील कुटूंबनायकांनीं पंचायतीच्या सन १९०६ च्या ठरावाप्रमाणें जेवलेल्या सर्व इसमांना बहिष्कृत केलें आहे असें जातींतील सर्व लोकांना कळविलें. त्याप्रमाणें फैजपुर येथील व त्या त्या त्या गांवच्या पंचांनीं सत्पंथाच्या धर्मशाळेंत जेवणाऱ्या सर्व इसमांना जातीबहिष्कृत केलें, असें ज्या त्या गांवच्या पंचांनीं आपआपल्या गांवीं जाहीर केलें.

या प्रमाणें गांवोगांवचे सत्पंथी बहिष्कृत करण्यांत आले असें जाहीर झाल्यामुळें १९१९ सालानंतर १९२१ साला पर्यंतच्या तीन चार वर्षांचे अवधींत सत्पंथ व त्याच्या अनुयायां संबंधीं जातींत बरीच खळबळ उडून गेली; व घरोघरीं लहानथोरांच्या तोंडीं हाच एक चर्चेचा विषय होऊन राहिला. बहिष्कृत केलेल्या सत्पंथी लोकांचे जातींतील निरनिराळ्या अनेक लोकांशीं, सगेसोयरे इष्टमित्र, इत्यादि आत्मीय संबंध असल्यामुळें लग्न कार्यादि सामाजिक बाबतींत प्रत्येकास तो प्रश्न आडवा येऊं लागला. ह्मणून पाडळसें येथील कुटुंब नायकांनीं जातींतील लोकांच्या सततच्या ह्या गैरसोयी पाहून व ऐकून या बहिष्कृत लोकासंबंधी एकदां कायमचा निकाल करून टाकण्याकरितां पाडळसें येथें मोरगांव

Year 1919 to 1921

Decision of the meeting date 22-Dec-1922 can be found in Satpanth Vijay book [ID 147] Page No 35 (53 of 258) to 39 (57 of 258)

पंचांची सभा ता. २२।१२।१९२२ रोजीं मुद्दाम त्याचकरितां बोलावली. या सभेस सुमारें १०—१२ हजार लोक हजर होते. त्यांत श्री. तोताराम बधु महाजन व इतर सत्पंथी लोकही होते. सभेच्या सुरवातीसच सत्पंथा-संबंधींचा प्रश्न चर्चेस निघाला. हजर असलेल्या सत्पंथी लोकांस पंचांनीं विचारलें कीं तुम्ही सत्पंथ सोडून द्या. सत्पंथी म्हणाले कीं, आम्हांस सत्पंथ न सोडतां जातींत घ्या. त्यांवर पंचांनीं सांगितलें कीं, सत्पंथ सोडून तुम्हांस जातींत घेण्यास आम्ही तयार आहोंत. पण सत्पंथीयांनीं तें ऐकिलें नाहीं व पंचायतींतून ते उठून गेले. म्हणून भोरगांव पंचांनीं त्याच सभेत, सन १९०६ सालीं झालेला सत्पंथीयांना बहिष्कृत करण्यासंबंधींचा ठराव पुनः वाचून दाखवून तोच अमलांत आणावा असें ठरविलें; व त्या ठरावाप्रमाणें सत्पंथीयांशीं ज्यांचे ज्यांचे सोयरिक संबंध असतील ते ते सर्व तोडून टाकून कुंवाऱ्या सोयरिकाही मोडून टाकाव्या, असें ठरविण्यांत आलें. या ठरावान्वयें जातींतील लोकांनीं त्यांच्याशीं असलेले सर्व सोयरिक संबंध तोडून सर्व समाज या सत्पंथीयांस बहिष्कृत समजूं लागला. तेव्हांपासून कट्टर सत्पंथी असलेले लोक जातीला कायमचेच मुकले. याप्रमाणें त्यावेळीं जातीस मुकलेल्या सत्पंथीयांची संख्या फैजपुर ६५, बाम्हणोद १, उटखेडे ६, व चिनावल १२, याप्रमाणें होती. म्हणून त्या वेळेपासून हीं ९१ कुटुंबे बहिष्कृत झालीं व ही ९१ संख्या सन १९२४ सालापर्यंत कायम राहिली.

Resolution cancelling all "unconfirmed engagement relationships" with Satpanthis. (Engagements which are not formalised by way of social rituals)

पुढें सन १९२४ सालीं भोरगांव पंचांची सभा झाली. तींत सत्पंथासंबंधीं विशेष वाटाघाट झाली नाहीं. पण १९१९

Year 1924

साली व १९२२ साली सत्पंथी म्हणून जातीनें वर्ज केलेल्या कांहीं लोकांना जाती बहिष्कृत स्थितींत राहणें शक्य न झाल्या-मुळें, सदरच्या या पंचांच्या सभेंत ते जातीस शरण आले. म्हणून पंचांनीं "सत्पंथाचे आचार विचार हे हिंदुधर्माच्या आचार विचारांशीं अगदींच विसंगत आहेत म्हणून त्यांचा आम्हांस पूर्ण तिटकारा आला आहे ते आचार विचार आम्ही पूर्णपणें सोडून दिले असून हिंदुसमाजाच्या आचाराविचारांप्रमाणें आम्ही यापुढें वागण्यास तयार आहोंत." याप्रमाणें त्यांच्या कडून कायदेशीर करारनामा लिहून घेतला व पंचायतींत तुळशीच्या पानाचें तीर्थ देऊन, त्यांना जातींत पावन करून घेतलें.

याप्रमाणें पंचांच्या सभेंत व त्यानंतर कांहीं दिवसांनीं सुमारें ३० लोक सत्पंथ सोडून जातीस येऊन मिळाले. म्हणून सन १९३१ सालापर्यंत सत्पंथीयांची संख्या कमी होऊन ती आतां सुमारें ६० पर्यंत आली आहे. श्री. तोताराम बधु महाजन हेही सन १९२२ सालच्या पंचायतींत सत्पंथाची बाजू धरून पंचांच्या विरुद्ध भांडले. त्यांनीं जातीच्या ठरावाप्रमाणें सत्पंथ धर्म न सोडल्यामुळें ते बहिष्कृत राहिले. व त्यांची गणना या ६० कुटुंबांतच झाली. श्री. तोताराम बधु महाजन हे बहिष्कृत राहिल्यामुळें त्यांच्या श्रीमंती स्थितीस पाहून कांहीं सत्पंथी लोक त्यांनाच चिकटून राहिले. अशारितीनें श्री. तोताराम बधु महा-जन यांनीं सत्पंथीयांचा स्वतः पुढाकार घेऊन गट तयार केला व ता. १४ नोव्हेंबर १९२४ सालीं लेवा जातीच्या भोरगांव पंचां-वर अब्रुनुकसानीची फिर्याद मांडली.

कोर्टांतील फिर्याद.

फैजपूर येथें खंडोबाची वाडी या नांवाचें एक देवस्थान असून तेथें ब्रम्हचारी आत्मानंद बुवा हे राहतात. सत्पंथ वाद हा मुख्यतः फैजपूर गांवांतच विकोपास गेला. कारण सत्पंथी अनुयायांची संख्या तेथेंच आरंभापासून जास्त होती. व आतांहि आहे. सत्पंथाचेंही देवस्थान (धर्मशाळा) फैजपुर येथें असून खानदेशांतील सर्व सत्पंथी त्या धर्मशाळेस आपल्या सत्पंथाचें मुख्य व पवित्र स्थान मानतात व वेळोंवेळीं तेथें दर्शनास जातात व तेथेंच सर्व धार्मिक कृत्यें करतात. या धर्मशाळेचे मुख्य बारसु बोवा असून ते त्यांचे धर्मगुरू आहेत. हिंदुधर्माचे ब्रम्हचारी आत्मानंद बुवा व सत्पंथाचे ब्रम्हचारी बारसु बोवा या दोन्हींचा परस्पर विरोधीसंबंध एकाच ठिकाणीं अनायासेंच घडून आल्या-मुळें धार्मिक दृष्टीनें या दोन्ही धार्मिक केंद्रस्थानांत परस्पर विरोधी चुरस उत्पन्न झाली. याच सुमारास मागील प्रकरणांत लिहिल्याप्रमाणें लेवा जातीच्या पंचायतींत सत्पंथीयाविषयीं झालेला वादविवाद सामा-जिक दृष्टीनें विकोपास जाऊन सत्पंथीयांस समाजानें बहिष्कृत केलें. सत्पंथाविषयींच्या अशा धार्मिक व सामाजिक खवळलेल्या स्थितींत, आत्मानंद बुवानें " स्वधर्म पालन करो " अशा हेडिंग खालीं हिंदी भाषेंत हस्तपत्रिका छापून त्या सर्व दूर वाटल्या, त्यामुळें तर या वादास विशेषच स्वरुप आलें. सत्पंथाच्या बाजूनें पुढाकार घेणारे श्री. तोताराम बधु महाजन व आत्मानंद बुवाच्या बाजूनें पंच मंडळी अशी परिस्थिती निर्माण झाली, आत्मानंद

Badrikashram jyotirmathasth Nandwal Sampradayi, Aatmanand Brahmachari, Khanderao Wadi, Faizpur

Book - Swadharm Palan Karo - See Satpanth Vijay (RP Library Book ID 147) - Page 18 (36

बुवाच्या हस्तपत्रिकेनें, लेवा पाटीदार पंचांना व बहुजन समाजाला हिंदुधर्माची अगर वेदाची शास्त्रदृष्ट्या जरी कांहीं माहिती नव्हती तरी सर्वांची ठाम भावना झाली कीं, सत्पंथ हा हिंदुधर्म बाह्यतर आहेच पण निव्वळ मुसलमानीच आहे म्हणून बहुजन समाज सत्पंथीयांना पंचायतीच्या ठरावाप्रमाणें व बाहेर आलेल्या हस्त पत्रकान्वयें सर्वस्वी अलग समजून वागूं लागला. फैजपुरचे श्री. तोताराम बधु महाजन ह्यांना ते वडिलोपार्जित वजनदार व श्रीमंत घराण्यातले असल्यामुळें त्यांच्यावर व सत्पंथीयांवर जातीनें टाकलेल्या बहिष्कारामुळें व तसेंच आत्मानंद बुवाच्या हस्तपत्रिकेमुळें अत्यंत वाईट वाटलें. ते खवळून जाऊन त्यांनीं या वादास कोर्टांत खेचलें. आत्मानंद बुवाच्या विरुद्ध सत्पंथी अनुयायांपैकीं एक देवचंद तोताराम किरंगे यास त्यांनीं उद्युक्त करून आत्मानंद बुवावर कोर्टांत दावा रचला. तसेंच आपण स्वतः (श्री. तोताराम महाजन) यांनीं लेवा जातीच्या पंचांनीं निष्कारण बहिष्कृत केलें म्हणून जातीतर्फे मुख्य पंचावर ३० हजार रुपयांचा बेअब्रुचा दावा केला. अशारितीनें हें प्रकरण कोर्टांत ओढलें गेलें.

श्री. तोताराम बधु महाजन यांची फिर्याद दाखल होण्या-पूर्वी ४।५ महिने अगोदर रा. देवचंद तोताराम किरंगे यांनीं मोरगांव पंचांवर कुंवारी सोयरीक मोडल्याबद्दल ५ हजार रुपयांचा अब्रुनुकसानीचा दावा फर्स्टक्लास कोर्टांत आणला होता. रा. रा. देवचंद तोताराम किरंगे हे एक कट्टर सत्पंथी होते, व पंचायती-च्या ठरावाप्रमाणें ह्यांनीं सत्पंथ न सोडल्यामुळें त्यांच्या सोयऱ्यांनीं

Two Cases
1) Totaram Badhu Mahajan (Ananda Lahanu Kirange)
2) Devchand Totaram Kirange

पंचांच्या आज्ञेप्रमाणें त्यांच्याशीं असलेले कुंवारी संबंध तोडले. म्हणुन रा. देवचंद तोताराम किरंगे यांनीं संबंध तोडणाऱ्या सोयऱ्यांवर फिर्याद न करितां पंचायतीच्या मुख्य पंचावरच फिर्याद केली. ही फिर्याद व श्री. तोताराम बधु महाजन यांची फिर्याद ह्या दोन्ही सर्वस्वी एकाच स्वरुपाच्या असल्यामुळें कोर्टानें त्या दोन्ही फिर्यादी एकत्र करून चालविल्या व दोघांचे निकालही एकत्र स्वरुपांतच दिले. दोन्ही मिळून एक झालेली ही फिर्याद जळगांव येथील फर्स्टक्लास कोर्टांत सुमारें ४ वर्षे चालली. फिर्यादीचा मुख्य मुद्दा अब्रुनुकसानीचा होता. तो बाजूला राहून धार्मिक वादच कोर्टांत उपस्थित झाला व सत्पंथ हिंदु धर्मांतर्गत आहे किंवा नाहीं याबद्दल दोन्ही बाजुंनीं साक्षी पुरावे, जुने कागद पत्र व ग्रंथ, यांचे आधार, तसेंच विद्वानांचीं मतें यांच्या योगें कोर्टांत पुष्कळ दिवस शहानिशा झाली. अखेर या सर्वांच्या सबळ आधारांतून कोर्टानें आपला निकालही "सत्पंथ हा वेद बाह्य आहे व तो इस्लामी धर्मावर उभारलेला असून, त्याच्या चालिरितीही हिंदुधर्मबाह्यच आहेत." असा निकाल जाहीर केला व दाव्याचा अब्रु नुकसानीचा मुख्य मुद्दा त्याबद्दल कोर्टानें निकाल दिला कीं, लेवा पाटीदार पंचांनीं हिंदु धर्म बाह्य असलेल्या सत्पंथाचें आचरण करणाऱ्या लोकांस लेवा पाटीदार पंचांनीं धार्मिक व सामाजिक हितांच्या दृष्टीनें आपल्या पंचायतींत जो निकाल दिला तो योग्यच आहे व त्यावरून वादींची म्हणजे रा. देवचंद तोताराम किरंगे व श्री

Both Court Cases were merged, in Bombay High Court

Jalgaon Court Case No: First Class Sub-Judge - Special Regular Civil Suit No 497 of 1924

Court Decision:

See Page 170 of 186

तोताराम बधु महाजन यांची अब्रू कमी होत नाहीं म्हणून वादींनी विरुद्ध पक्षाचा म्हणजे पंचांचा कोर्टाचा खर्च भरून द्यावा.

अशारितीनें फर्स्टक्लास कोर्टांत दोन्ही बाजूंनीं (धार्मिक व सामाजिक आणि अब्रू) सत्पंथीयांना विरूद्ध निकाल मिळाल्यावर त्या निकालानें त्यांचें समाधान झालें नाहीं व त्यांनीं (दोन्ही वादींनीं) मुंबई हायकोर्टांत अपील केलें. हायकोर्टांतील अपील न्यायमूर्ती मर्फी आणि न्यायमूर्ती बार्लो या दोन युरोपियन न्यायाधिशांपुढें सुनावणीस निघालें. फर्स्टक्लास कोर्टांतील न्यायाधिश मि. खारकर, यांनीं फिर्यादीचा मुख्य मुद्दा धार्मिक व सामाजिक बाबतींत ओढला गेलेला पाहून त्या किचकट प्रश्नांत चांगलें लक्ष घालून समोर आलेल्या पुराव्यांच्यायोगें सत्पंथ हा सर्वस्वीं वेदबाह्य आहे असा निकाल दिला. पण हायकोर्टांतील युरोपियन न्यायमूर्तीद्वय ह्यांनीं या दाव्यांतील धार्मिक व सामाजिक बाबीसंबंधीं कोणत्याही प्रकारची जबाबदारी न घेतां तो प्रश्न हिंदुधर्मगुरूंचा म्हणजे श्रीमत् शंकराचार्यांचा आहे म्हणून आम्ही त्याचा निकाल देण्यास असमर्थ आहोंत असा निर्णय दिला. दाव्याचा मुख्य मुद्दा अब्रुनुकसानीचा त्याबद्दल मात्र विचार केला व त्याचा निकालही खालील कोर्टाप्रमाणेंच देऊन खर्चासुद्धां दावा रद्द केला. अशा प्रकारें हायकोर्टानेंही श्री. तोताराम बधु महाजन यांना सर्वस्वीं विरूद्ध निकाल दिल्यामुळें ते व त्यांचे सहकारी (इतर सत्पंथीय) हे सध्यां हताश होऊन बसले आहेत. यावरून वाचकांना कळून येईल कीं, श्री. तोताराम बधु महाजन यांनीं कोर्टापर्यंत जाऊनही कायद्याच्या कसोटीस हा प्रश्न लाविला व त्यांत अपयश आपल्या पदरीं बांधून घेतलें.

Mumbai High Court Case No: (1935) 37 BOMLR 417, 158 Ind Cas 414

Appeal No 289/1928 and 290/ 1928 combined

Reported in: AIR 1935 Bombay 361

High Court Decision:

High Court Judgement:

1) https://archive.org/details/1935Bomb

2) http://www.indiankanoo doc/892115/

Sankeshwar Peeth is 50 Km from Belgaum, Karnataka.

https://goo.gl/maps/Kyiby

Karveer Peeth is at Kholapur, Maharashtra

https://goo.gl/maps/OhFHm

श्रीमत् जगद्गुरु श्री शंकराचार्य संस्थान संकेश्वर व करवीर यांचें आज्ञापत्र.

सन १९०६ सालीं पंचायतींत प्रथम सत्पंथवाद उत्पन्न झाला. तेव्हां पंचांना व बहुजन समाजाला वाटत होतेंच कीं, सत्पंथ हा आचारविचारांच्यादृष्टीनें आणि धर्माच्यादृष्टीनें हिंदुधर्माशीं व हिंदुसमाजाशीं विसंगत आहे. इतकेंच नाहीं तर तो वेदबाह्यच आहे असेंच जाणते लोक म्हणत होते, पण लेवा समाजांत त्यावेळीं शिक्षणप्रसार विशेषसा नसल्यामुळें वेद जाणणारे लोक समाजांत नव्हते, तरी एकूण परिस्थितीवरून व आचारविचारांवरून सर्वांची ठाम समजूत झाली होती कीं, सत्पंथ हा वेदबाह्य आहे व त्याची उभारणी इस्लामी धर्मावर आहे. पण अधिकारयुक्त वाणीनें धार्मिक बाबतींत त्यावेळीं कोणालाच बोलतां येईना. पुढें सत्पंथाचा हा वाद समाजांत दिवसेंदिवस जसजसा चिघळत चालला, तसतसें पंचांना व बहुजनसमाजाला असें वाटूं लागलें कीं, धार्मिक दृष्टीनें या प्रश्नाचें विद्वज्जनांसमोर आणि श्रीमत् शंकराचार्य यांचेसमोर केव्हांतरी परिशीलन व्हावें व त्याचा कायमचा निकाल व्हावा. श्री. तोताराम बधु महाजन यांनासुद्धां असेंच वाटे. पण त्यांना एवढी पूर्ण खात्री होती कीं, तसें सिद्ध करणें म्हणजे आपण होऊन आपल्या पायावर धोंडा पाडून घेण्यासारखें होईल. म्हणून पंचायतींत अशी चर्चा निघाली म्हणजे ते टाळाटाळी करीत व पंचांना उत्तर देत कीं, सत्पंथ वेदबाह्य

आहे किंवा नाहीं हें तुम्हीच जगद्गुरूकडून तपासून घ्या. पंचांचें म्हणणें असें होतें कीं, वास्तविक हें सिद्ध करून घेण्याची जरूरी तुम्हांस (श्री. तोताराम महाजन यांना) आहे म्हणून तुम्हीच श्रीमत् शंकराचार्यांकडेस जा व सत्पंथ वेदांतर्गत आहे किंवा नाहीं हें सिद्ध करून तसें आज्ञापत्र आणा. पण श्री. तोताराम बधु महाजन यांना तें कदाचित शक्य झालें नसेल म्हणून कोर्टांतील जबानींत त्यांनीं असें उत्तर दिलें कीं, "मी श्रीमत् शंकराचार्यांकडे गेलों होतों पण स्वामिनारायण पंथाबद्दल श्रीमज्जगद्गुरू श्रीशंकराचार्यांना विचारलें" अर्थात् या त्यांच्या सांगण्यावर कितीसा विश्वास ठेवावा, कारण स्वामीनारायण व श्री. तोताराम महाजन यांचा अर्थाअर्थी कांहींच संबंध नसतां मुख्य महत्वाचा प्रश्न सत्पंथाबद्दलचा तो सोडून इतर पंथाबद्दल शहानिशा करण्याचें त्यांना कांहींच कारण नव्हतें. यावरून ते श्री शंकराचार्यांकडे गेलेच नसावे अगर गेले असतील तर त्यांची तेथें दाद लागली नसावी. अशारितीनें श्री. तोताराम बधु महाजन यांनीं श्रीमज्जगद्गुरू श्री. शंकराचार्यांकडून सत्पंथ वादाचा निकाल आणण्याची टाळाटाळ केली. म्हणून जातीच्या व समाजाच्या हिताच्या दृष्टीनें पंचांनाच हा निकाल श्रीमत् शंकराचार्य व विद्वज्जन यांचेकडून लावून घेण्याची फार आवश्यकता भासूं लागली.

पुढें कांहीं वर्षांनीं लेवा समाजाच्या सुदैवानेंच कां म्हणाना सन १९३० सालच्या डिसेंबर महिन्यांत जळगांव येथें अखिल भारतीय वर्णाश्रम स्वराज्य संघाची परिषद भरली होती. त्या

परिषदेस हिंदुस्तानांतील सर्व प्रांतांतले वेदवेत्ते, हिंदुधर्मशास्त्र- वेत्ते व चारी पिठांचे श्रीमत् जगद्गुरू श्री शंकराचार्य आले होते. त्या परिषदेंत एक दिवस असा कार्यक्रम होता कीं, कोणीही धार्मिक शंका विचारल्यास तिचें शास्त्राधारें निरसन केलें जाईल.

All Shankaracharyas

सभेस जवळ जवळ १०-१५ हजार लोक सभेच्या ५।६ दिवसांच्या कार्यक्रमास सतत हजर असत. शंका- समाधानाच्या दिवशीं अनेक लोकांनीं अनेक प्रश्न विचारले. त्या प्रमाणेंच श्री. लक्ष्मण शिवराम चौधरी वकील यांनीही खानदे- शांतील लेवा पाटीदार समाजातर्फे सदरहू परिषदेंत सत्पंथाचा प्रश्न मांडला व लेवा समाजांत सत्पंथाबद्दल झालेल्या सर्व प्रका- रच्या वादाबद्दल थोडक्यांत निवेदन करून सत्पंथ व त्याचीं तत्त्वें सर्वस्वीं इस्लामीधर्मावरच उभारलेलीं आहेत आणि त्यांतील आचार विचारही मुसलमानी पद्धतीप्रमाणेंच आहेत, त्याबद्दल सत्पं- थाचा ग्रंथाधारें व बॉम्बे ग्याझेटिअरचा पुरावा आणि जळगांव येथील फर्स्ट क्लास कोर्टांत झालेल्या सत्पंथी दाव्याचे कागदपत्र विद्वांनापुढें मांडले. नंतर सर्व विद्वानांमध्यें चर्चा होऊन एक मतानें त्यांनीं निकाल दिला कीं, सत्पंथ हा वेदांतर्गत व हिंदू नाही. त्याप्रमाणें जातीतर्फे दिलेल्या अर्जावर त्या सर्व विद्वा- नांनीं तसाच शेरा मारून सह्या केल्या. त्यानंतर परिषद संपल्यावर परिषदेच्या सेक्रेटरींतर्फे सदरहू विद्वानांच्या अभिप्रायांचा अर्ज श्रीमत् जगद्गुरूश्रीशंकराचार्य संस्थान संकेश्वर व करवीर यांचे कडेस पाठविला. त्यावर श्रीमत् जगद्गुरू श्रीशंकराचार्यांचें आज्ञापत्र आलें. त्याचा मसुदा खालीं देत आहे.

Advocate

Copy Of

॥ श्रीशंकर ॥

शिक्का

स्वस्ति श्रीमत्समस्तसुरवृन्दपूजितपादारविन्दाशिवप्रतिबिंब-
वर्य—श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्य—पदवाक्यप्रमाण पारावारपारीण—
यमनियमासनप्राणायामप्रत्याहार ध्यानधारणासमाध्यष्टाङ्गयो-
गानुष्ठाननिष्ठतपस्चक्रवर्त्यनाद्यविच्छिन्नगुरु परम्पराप्राप्तषड्दर्शन-
संस्थापनाचार्य— व्याख्यानसिंहासनाधीश्वरसकलनिगमागमसारहृदय-
सांख्यत्रयप्रतिपादक सकलनास्तिकमतोच्छेदपूर्वकसकलधर्मसंस्थाप-
नैकधुरीण— वैदिकमार्गप्रवर्तकसर्वतन्त्रस्वतन्त्र— श्रीमहाराजधानी-
ऋष्यशृंगपुरवराधीश—श्रीमद्राजाधिराज—गुरुमण्डलाचार्य— श्रीमच्छ-
ङ्कराचार्यान्वयसञ्जाताभिनव—पञ्चगङ्गा— तीरवासकमलानिकेतनकर-
वीरसिंहासनाधीश्वरश्रीसच्चिदानन्दविद्याशंकरभारतीकरकमलाकिंजल्को
द्भव—श्रीमदभिनवश्रीसच्चिदानन्दाविद्यानरसिंह भारतीस्वामिकृतानिश्री
माक्सपरिवारच्छात्राणामनुदिनमेधमानभव्यजनकानि ॥

श्रीमच्छङ्कराराधनावसरीयनारायणस्मरणानि ॥

श्रीगुरु भक्तिपरायण मठाभिमानी प्रिय शिष्य आत्मानंद ब्रह्मचारी, रा. रा. लक्ष्मण शिवराम चौधरी, श्री. सोनू तुकाराम पाटील मु० जळगांव यांसीः—

Date: 19-Mar-1931

तुमचे कल्याणं इच्छित श्री निकट असो. तुमचेकडून मिति फाल्गुन वद्य ३० शके १८५२ चे विनंति अर्ज व त्याजबरोबर जळगांव येथील वर्णाश्रम परिषदेंत उपस्थित झालेल्या पंडितांचे अभिप्राय हे सर्व अवलोकनांत येऊन व त्याचा विचार होऊन तुमचे अर्जांत नमूद केलेला पिराणा पंथ सत्पंथ या नांवानें खान्देश, बऱ्हाणपूर, कच्छ, गुजराथ इत्यादि ठिकाणीं जो आहे तो सर्वथा वेदबाह्य आहे असा इकडून निर्णय देण्यांत आला आहे. या पत्राची प्रसिद्धी तुह्मी तिकडील प्रांतांत करावी. मिति वैशाख शुद्ध ८ शके १८५३ शनिवार, प्रजापतिनाम संवत्सरे.

Date: 25-Apr-1931

मु० पुणें. महानुशासनंवरीवर्ति

शिक्का सील

या सन १९३० सालांत झालेल्या अखिल भारतीय वर्णाश्रम स्वराज्य संघाच्या सर्व हिंदुस्तानांतून आलेल्या वेदवेत्त्या, व विद्वान्जनांच्या सभेस श्री. तोताराम बधु महाजन यांनींही यावयास पाहिजे होते ! जातीच्या पंचांना समाजहिताच्या दृष्टीनें या वादाचा कोर्टाप्रमाणेंच धार्मिक बाजूनेंही निकाल लावून घ्याव-

याचा होता. म्हणून सदरहू परिषदेंत मोठ्या प्रयासानें या प्रश्नाचा निकाल लावून आज्ञापत्र मिळविलें. पण वास्तविक जातींच्या पंचांपेक्षांही अधिक अवश्यकता सत्पंथीयांस होती. ते त्यावेळीं बेफिकीर राहून सभेस आले नाहींत. अर्थात् कोर्टांत झालेल्या शहानिशेवरून त्यांना वाटलें असावें कीं, या विद्वान लोकांचाही अभिप्राय सत्पंथाच्या विरुद्धच पडेल. म्हणून आपल्याच हातानें अपशकून कां करून घ्यावा! कदाचित या विचारानें ते सभेस आले नसावेत. पण पंचांनीं आज्ञापत्र मिळविल्यावर मात्र श्री. तोताराम महाजन यांनीं व सत्पंथीयांनीं वर्तमानपत्रांतून सदरहू आज्ञापत्र एकांगीं आहे अशा तऱ्हेचा कांगावा करण्यास सुरवात केली. त्यावेळीं त्यांना वर्तमान पत्रांतून समाजांतील या वादाची पूर्ण माहिती असलेल्या इसमांकडून उत्तरें मिळालीं; तरी श्री. तोताराम बधु महाजन यांचा दुराग्रह अद्याप कायमच आहे व मधून मधून कोणाला तरी (श्री. रारावीकर, प्रबोधनकार ठाकरे इत्यादिकांना) हाताशीं धरून लेवा समाजाबद्दल वर्तमानपत्रांतून व इतर ठिकाणीं, ते जनतेचा गैरसमज करूं पहातातच. उमरावतीच्या विदर्भांतील श्री. ठाकरे यांची लेखमालाही यापैकींच होय. तसेंच सन १९३१ च्या आगस्टांत अकोला येथें भरलेल्या हिंदु महासभेत श्री. तोताराम बधु महाजन यांनीं हा प्रश्न उपस्थित करून तेथेंही हिंदुपुढाऱ्यांचा गैरसमज करण्याचा प्रयत्न केलाच. त्या संबंधींचीही हकीकत पुढील प्रकरणांत देत आहें.

हिंदुमहासभेचा निकाल.

श्रीमत् जगद्गुरू **श्रीशंकराचार्य** यांचें आज्ञापत्र सही-शिक्यानिशीं मे १९३१ मध्यें पंचांच्या हातांत पडलें, त्यावेळीं सामाजिक प्रश्नांचा निकाल करण्याकरितां पाडळसें येथें लेवा पाटीदारांची मोरगांव पंचायत जमली होती. आज्ञापत्र हातीं पडतांच त्याच्या छापील प्रती तयार करून पंचायतीच्या सभेंतील सुमारें १०-१२ हजार. लोकांत त्या वाटण्यांत आल्या. श्री. तोताराम बधु महाजन यांना आज्ञापत्राच्या छापील प्रती वांटल्या जात आहेत हें कळतांच, त्या आज्ञापत्रावर विरुद्ध स्वरूपाचें व एकांगीपणाचें आक्षेप करणारें असें एक हस्तपत्रक त्यांनीं काढून तें लगेंच २।३ दिवसांनंतर त्याच सभेंत वाटलें. पुढें कांहीं दिवसांनीं जून १९३१ महिन्यांत पुणें येथील **आचार्य वर्तमानपत्रानें** श्रीमत् शंकराचार्यांनीं दिलेल्या या आज्ञापत्रावर सत्पंथाच्या विरुद्ध, हिंदुधर्मावर बांडगुळाप्रमाणें नकळत वाढलेल्या सत्पंथाचे फार दिवसांचे जुने वाभाडे विद्वत् परिषदेंत शास्त्राधारें चर्चा करून व्यवस्थितरितीनें जनतेसमोर मांडले आणि हिंदूधर्माचा हा हितशत्रु शक्य तों नाहींसा केला जावा, असा प्रयत्न करून श्रीशंकराचार्यांनीं हिंदूधर्माचें रक्षण केलें म्हणून उत्तम अभिप्राय दिला व आज्ञापत्रास उत्तम प्रकारें चालना दिली. आचार्य वर्तमानपत्रांतील लेख वाचून श्री. तोताराम महाजन यांचें धाबें दणाणलें, त्यांनीं केसरीकडे धांव घेतली. केसरीनें त्यांना

आधार देऊन त्यांच्याबाजूचे सत्पंथाचे लेख छापले. श्रीमत् शंकराचार्यांचें आज्ञापत्र व त्याला पाठिंबा देणारे आचार्यांतील लेख श्री. तोताराम बधु महाजन यांच्या लेखाद्वारें संपादकीय स्फुटांत केसरीनें खोडून काढण्याचा प्रयत्न केला. केसरीची 'री' नागपूर येथील महाराष्ट्र वर्तमानपत्रानें ओढली. इकडे जळगांवांत प्रागतिककारांनीं श्रीमत् शंकराचार्य व आचार्य यांना उचलून धरून सत्पंथाचें चांगलें खंडण केलें. अशाप्रकारें वर्तमान-पत्रांत सत्पंथाचा हा वाद दोन तीन महिने चांगलाच रंगला. त्याच सुमारास अकोला येथें हिंदुमहासभेचें अधिवेशन व्हावयाचें होतें. ही संधी साधून केसरीकारांनीं जाहीर केलें कीं, सत्पंथाच्या वादाचा निकाल हिंदुमहासभेच्या पुढाऱ्यांकडून करून घेतल्यास ठीक होईल. श्री. तोताराम बधु महाजन यांनीं केसरीनें दिलेली ही संधी वायां जाऊं दिली नाहीं. त्यांनीं लगेच अकोल्याच्या परिषदेंत सत्पंथाच्या ग्रंथ सामुग्रीनेशीं आपल्या बाजूची जय्यत तयारी केली.

अकोला येथें हिंदुमहासभेचें अधिवेशन ता. ८ ऑगस्ट १९३१ रोजीं भरलें. त्यावेळीं वर लिहिल्याप्रमाणें कार्यकारी मंडळाच्या सभेस हजर राहण्याकरितां श्री. तोताराम बधु महाजन हे ८-१५ दिवस अगोदर अकोल्यास जाऊन राहिले होते. ही वार्ता परिषदेच्यापूर्वी सुमारें १५-२० दिवस अगोदर लेवा पंचांना कळली. त्यावेळीं पाडळसें येथील कुटुंबनायकांना सदरच्या हिंदु महासभेच्या परिषदेंत आपण स्वतः हजर राहणें भाग आहे असें

Akola

वाटलें, म्हणून कुटुंबनायक श्री. विठू गणु पाटील, मी स्वतः आणि आणखी ३-४ जण मिळून अकोल्यास ता. ७ आगस्ट १९३१ रोजीं संध्याकाळपर्यंत गेलों. श्री. तोताराम महाजन यांच्याप्रमाणें आम्ही विशेष तयारीनें गेलों नसल्यामुळें कोणास भेटावें व कोठें जावें हें आम्हांस कांहींच उमगलें नाहीं. पण आस्ते आस्ते तपास काढून मसूरकर महाराज, महादेव शास्त्री दिवेकर, नारायणशास्त्री मराठे, परिषदेचे सेक्रेटरी अाठवले व अभ्यंकर वकील, परिषदेचे अध्यक्ष श्री. विजयराघवाचार्य, पंजाबचे सर गंगाराम, डॉ. मुंजे परिषदेचे स्वागत मंडळांतील सभासद महाजनी व पिंगळे वकील इत्यादि विद्वान पुढाऱ्यांना आम्ही महाप्रयासानें भेटून त्यांना खानदे- शांतील सत्पंथियासंबंधीं व लेवेपाटीदारांतील सत्पंथ वादासंबंधीं सवि- स्तर हकिकत निवेदन केली. याच पुढाऱ्यांना श्री. तोताराम बधु महाजन हेही आमच्या अगोदर भेटले होते. व त्यांनीं त्यांना दिशाभूल करणारी माहिती दिली होती असे याच पुढाऱ्यांच्या तोंडून आम्हांस कळलें. म्हणून त्यांनीं आम्हांस सांगितलें कीं, तुम्ही असा कबुली लेखी जबाब लिहून द्या कीं, " सत्पंथी लोक हे हिंदु आहेत, त्यांना आम्ही केव्हांही व कोठेंही अहिंदु म्हटलें नाहीं, परंतु त्यांनीं त्यांच्या मुसलमानी चालिरिती सोडाव्या " या त्यांच्या सांगण्याप्रमाणें आम्ही " नीचे लिखे हुये खानदेशस्थ लेवा पाटीदार लिख देते है कीं, खानदेशमे जे सत्पंथी लोक है वो हिंदू है. परंतु उसीके आचारविचार सर्वथा हिंदूधर्म बाह्य है. और वोही आचारविचार छोडदेवे ऐसा हमारा मत है " या

प्रमाणें लेखी कबुली जबाब लिहून दिल्यावर ता. ८ ऑगस्ट १९३१ चे रात्रीं ८ वाजतां भरणाऱ्या कार्यकारी मंडळाच्या सभेमध्यें आमची बाजू मांडण्याची परवानगी परिषदेच्या अध्यक्षांकडून आम्हांस मिळाली. त्याप्रमाणें परिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या सभेस आम्ही स्वतः हजर होतों. त्यावेळीं सत्पंथाच्या वादावर झालेली चर्चा मी खानदेशांतील जनतेकरितां हस्तपत्रकाद्वारें छापून त्यावेळीं (सप्टेंबर १९३१ मध्यें) प्रसिद्ध केली होती. त्यांतील महत्त्वाचा भाग व हिंदुमहासभेचा झालेला ठराव पुढें देत आहें.

" सभेचे प्रथमतः इतर पांच ठराव पास झाले नंतर सहावा ठराव सत्पंथासंबंधींचा निघाला. त्यावेळीं श्री. तोताराम बधु महाजन हे आपण स्वतः घरून लिहून आणलेला ठराव वाचूं लागले त्या ठरावांतील पहिलें वाक्य " सत्पंथ हा धर्म वैदिक आहे" असें होतें. अशा स्वरूपाचा त्यांचा ठराव वाचन झाल्यावर अध्यक्षांनीं मला या ठरावावर बोलण्याची आज्ञा केली. त्यावर मी सांगितलें कीं, " सत्पंथी लोक हे हिंदु आहेत. त्यांना आम्ही केव्हांही व कोठेंही अहिंदु म्हटलें नाहीं, परंतु त्यांनीं त्यांच्या मुसलमानी चालिरिती सोडाव्या. "व नंतर मी माझ्या भाषणांत सत्पंथियांच्या आचारविचारांचें पूर्ण निवेदन केलें. तें सभेंतील सर्व लोकांना पसंत पडलें. माझ्या भाषणानंतर महादेवशास्त्री दिवेकर यांनीं आपला बऱ्हाणपूर भागांतील अनुभव सांगितला. सत्पंथ हा धर्म खरोखरच वेदबाह्य आहे, असें त्यांचेंही मत पडल्यानें माझे भाषणाला त्यांचा पूर्ण पाठिंबा

Meeting Minutes

मिळाला. श्री. दिवेकर शास्त्री यांच्या भाषणानंतर पंजाबचे सर गंगाराम यांनीं सांगितलें कीं, " आम्ही दोन्ही बाजू पूर्ण ऐकल्या आहेत. त्यावरून मी असें सांगतों कीं, सत्पंथीयांनीं आपले धर्मबाह्य आचारविचार सोडावे. " अशारितीनें या मुद्यावर सुमारें एक तास चर्चा चालू होती. सगळ्यांचें बोलणें संपल्यावर अध्यक्ष डॉ. मुंजे यांनीं पुढील प्रमाणें ठराव मांडला व तो सर्वानुमतें पास झाला.

This conference unequivocally declares that although certain customs said to be unhindu have crept among them, The Satpanthis of Khandesh, Gujrat & certain other parts, who claim to be followers of Vedas are Hindus & calls upon them to reform themselves to come quite into the line with other Hindus. This conference further calls upon all Hindus to treat them as brothers in religion to give them all special services & rights due to them as such.

(जरी कांहीं अहिंदु आचार विचार खानदेश, गुजराथ आणि असेच दुसरे भागांतील सत्पंथी लोकामध्यें चालत असले तरी ते आपण वेदाचे अनुयायी आहोंत असा हक्क सांगत असल्यामुळें ही सभा असें स्पष्ट सांगत आहे कीं, हे सत्पंथी लोक हिंदु आहेत आणि हिंदुमहासभेचें वरील सत्पंथी लोकांस असें सांगणें आहे कीं, त्यांनीं आपली स्वतःची सुधारणा करून इतर हिंदुच्या बरोबर अगदीं समपातळीत येण्याची तजवीज

करावी. तसेंच ही सभा सर्व हिंदूंस असें सांगत आहे कीं, सत्पंथी लोकांना आपके धर्म बांधव म्हणून समजून त्यांना हिंदु म्हणून ज्याप्रमाणें वागवावयास पाहिजे त्याप्रमाणें वागवावें.)"

याप्रमाणें अकोला येथील अखिल भारतीय हिंदु महासभेच्या परिषदेंत सत्पंथ वादाचा निकाल लागला. त्यावरून वाचकांना कळून येईल कीं, हिंदुमहासभेनें सुद्धां सत्पंथास अवैदिक व हिंदु धर्मबाह्यच ठरवून निकाल दिलेला आहे. अकोल्याच्या हिंदु महासभेच्या परिषदेच्यापूर्वी अहमदाबाद येथें जुलै १९३१ मध्यें भरलेल्या गुजराथ प्रांतिक अधिवेशनांतही सत्पंथ वादाबद्दल 'पिराणा सत्पंथ अवैदिक, अशास्त्रीय, व केवळ इस्लामी धर्म आहे' अशा स्वरुपाचे तीन ठराव पास झाले. ते पुढील 'सत्पंथ हिंदु-धर्मांतर्गत नाहीं ?' या प्रकरणांत सविस्तर दिले आहेत.

Hindu Mahasabha Decision at Akola, against Satpanth

Book - Gujarat Prantik Adhiveshan - Also see 172

सत्पंथाचे टीकाकार.

टीका ही विरूद्ध आणि बाजूची अशा दोन्ही प्रकारची असते. सत्पंथावर आतांपर्यंत अशा दोन्ही प्रकारच्या टीका ग्रंथांतून आणि वर्तमान पत्रांतून प्रसिद्ध झालेल्या आहेत. या दोन्ही प्रकारच्या टिका करणाऱ्यांपैकीं विशेषतः सत्पंथाच्या विरूद्ध टीकाकारांनीं सत्पंथाविरूद्ध शक्य तों सर्वांगीण दृष्टीनें अनेक आधार देऊन असें सिद्ध केलें आहे कीं सत्पंथ हा हिंदु अगर इस्लामी धर्मांतर्गत नाहीं. पण या दोन्ही धर्मांवर परान्नपुष्टवत् एखाद्या बाण्डगुळाप्रमाणें तो उत्पन्न झाला असून धड हिंदू नाहीं अगर धड मुसलमानीही नाहीं अशाप्रकारें इतस्ततः नकळत गुप्तपणें अज्ञानांधःकारांत परिपोषिला गेला आहे. सत्पंथाची बाजू सांभाळून लिहिणारांनीं अशा दृष्टीनें सत्पंथाच्या शास्त्राधारें विरूद्ध टीकाकारांचें मत खोडून काढलेलें नाहीं अगर त्यांना तसें खोडून काढतांही आलें नाहीं.

Dictionary

प्रथमतः मराठी भाषेंत ज्ञानकोशांत सत्पंथासंबंधींची माहिती " फैजपूर येथील मठाचे अधिकारी यांजकडून आलेल्या माहिती वरून " दिलेली आहे. " फैजपूर येथील धर्मशाळा " या प्रकरणांत या सत्पंथी मठाची माहिती आम्ही दिलेलीच आहे. त्या वरून वाचकांना कळून येईल कीं, ज्ञानकोशकारांना त्या मठाच्या अधिकाऱ्यांनीं दिलेली माहिती निव्वळ एकांगीच आहे. त्याप्रमाणें खरोखर ज्ञानकोशांत आलेली माहिती ही ज्ञानकोशकारांनीं सत्पं-

याचे गुजराथी भाषेंत असेलेले ग्रंथ अगर त्यांचे हस्त लिखित ग्रंथ हे न पाहतां दिली असून जशी फैजपूर येथील मठाधिका-प्याकडून आली तशीच प्रसिद्ध केली.

यावरून ज्ञानकोशांतील माहिती बिलकूल विश्वसनीय नाहीं असें म्हणावयास हरकत नाहीं. सन १९३३ मध्यें महाराष्ट्र सांवत्सरिक प्रसिद्ध झालें. त्यांतही सत्पंथाची अल्प माहिती आलेली आहे. तीही सर्व चुकीची असून त्यांत केलेलीं विधानें कशीं चुकीचीं आहेत हें आह्मी ता. २६ फेब्रुवारी १९३३ च्या विविध-वृत्ताच्या अंकांतून सविस्तरपणें प्रसिद्ध केलें आहे. " सत्पंथविजय " नांवाचें पुस्तक श्री. नाटू देवराम महाजन यांनीं फैजपूर येथील आत्मानंद बुवावरील फौजदारी खटल्याच्या माहितीचें प्रसिद्ध केलें आहे. पण फिर्यादींतील वादी आणि प्रतिवादी यांच्या कायद्याच्या दृष्टीनें जाबजबाबांशिवाय त्यांत दुसरें कांहीं एक दिलेलें नसल्यामुळें तें पुस्तकही सत्पंथाची खरीखुरी माहिती देऊं शकत नाहीं. अकोला येथें हिंदुमहासभेच्या प्रसंगीं, हिंदुधर्म प्रचारक म्हणविणारे श्री. दत्तात्रय रामचंद्र रारावीकर यांनींही 'खानदेशांतील लेवापाटीदार समाजाच्या वैदिक सत्पंथाचें सत्यस्वरूप' या नांवाचें १२-१३ पानांचें एक लहानसें चोपडें निव्वळ खोट्या माहितीचें प्रसिद्ध केलेलें आहे. त्याचवेळीं—हिंदुमहासभेच्या प्रसंगीं-जळगांवचे वकील श्री. लक्ष्मण शिवराम चौधरी यांनीं 'सत्पंथाचें गौडबंगाल ' या नांवाचें लहानसें पुस्तक प्रसिद्ध केलें त्यांत दिलेली माहिती मात्र सत्पंथाच्या ग्रंथांधारें सारांशरुपानें

Book - Maharashtra Sanvatsarik

Book - News Papers - 26-Feb-1933

Book - Satpanth Vijay

Book - Satpanth SatyaSwa

Book

दिलेली आहे. पण ग्रंथ या दृष्टीनें मात्र तितक्या मोठ्या स्वरुपांत तें पुस्तक प्रसिद्धी पावलें नाहीं.

अलीकडील पांच सहा वर्षांत वर्तमान पत्रांतूनही सत्पंथ वादाची चर्चा सुरू झालेली आहे. प्रथमतः सन १९३१ सालीं श्रीमत् जगद्गुरू श्री. शंकराचार्य यांच्याकडून सत्पंथ वेदबाह्य आहे अशा स्वरूपाचें आज्ञापत्र मिळाल्यापासून वर्तमानपत्रकारांनीं या सत्पंथवादासंबंधी शहानिशा केली. पण तीही कितपत खऱ्या स्वरूपाची आहे, हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे. महाराष्ट्रांतील प्रमुख वर्तमानपत्र केसरी यानें तर सत्पंथाची रीच ओढली. सत्पंथाचें ग्रंथ चाळण्याचा केसरीच्या संपादकांनीं प्रयत्न केला नाहीं. केसरीचेंच अनुकरण नागपूरच्या " महाराष्ट्रानें " केलें. सुदैव हिंदुसमाजाचें कीं, या दोघां प्रमुख महाराष्ट्रीय वर्तमान पत्रकारांना पुणें येथील आचार्य वर्तमानपत्रकर्त्यांनीं चांगलें सडकून उत्तर देऊन सिद्ध केलें कीं, **' सत्पंथ वेदबाह्यच आहे आणि त्याच्या चालीरीतिही हिंदुधर्मांतर्गत नाहींत '** शिवाय जळगांव येथील प्रागतिक वर्तमानपत्रानें सत्पंथवादाची खरीखुरी माहिती आरंभापासूनच वेळोवेळीं प्रसिद्ध केलेली असून आचार्यांप्रमाणेंच त्यांनेंही सत्पंथाचे आणि त्याच्या वादाचें सत्य-स्वरूप पटवून दिलेलें आहे.

या प्रमाणेंच सत्पंथासंबंधीं व त्याच्या वादासंबंधीं निरनिराळीं हस्तपत्रकेंही वेळोवेळीं प्रसिद्ध झालेलीं आहेत. वादाच्या चुरशीतील मतें प्रतिपादन करणारी तीं हस्तपत्रकें असल्यामुळें

त्याच्यासंबंधीं विशेष लिहीण्यासारखें जरी नसलें तरी खानदेशां-तील सत्पंथाचे अध्वर्यु, मुखी आणि श्रीमंत तोताराम बधु महाजन हे स्वतः सत्पंथाचे कट्टर अनुयायी असल्यामुळें या वादाच्या स्वरूपांत त्यांनीं आणि त्यांच्या बाजूच्या व्यक्तिंनीं प्रसिद्ध केलेलीं हस्तपत्रकें, हीं सत्पंथाची तरफदारी करण्याच्या दृष्टीनें लुळींच पडलेलीं आहेत. असें असतांही सत्पंथीयांनीं मोठमोठे वर्तमान पत्रकार, विद्वान व हिंदूमहासभाप्रणेते यांच्याकडे जाऊन त्यांना सत्पंथाची खरीखुरी माहिती न देतां सत्पंथ हिंदुधर्मांतीलच एक भाग आहे अशा प्रकारची भूलथाप देण्यास ते चुकले नाहींत. शेवटीं शेवटीं तर सत्पंथीयांनीं प्रबोधनकार ठाकरे यांच्याकडून "सत्पंथ व हिंदुसमाज" ही सात आठ लेखांकांची एक लेखमाला लिहवून घेऊन उमरावतीच्या "विदर्भ" वर्तमान पत्रांत प्रसिद्ध करविली. पण या लेखमालेंतही कडवा, चिकित्सक-दृष्टीचे इतिहास संशोधक, आरपार अभ्यासणारे प्रसिद्ध वक्ते, खंदालेखक आणि संपादक म्हणविणारे श्री. प्रबोधनकार ठाकरे, हे देखील सत्पंथीयांच्या भूलथापीच्या चक्रांत अडकून, सत्पंथी-शास्त्रांचा एकही ग्रंथ डोळयानेंसुद्धां न बघतां सत्पंथासंबंधींचें एकही तत्त्व साधार प्रतिपादन करूं शकले नाहींत. या लेख-मालेंत मात्र श्री. ठाकरे यांनीं आपल्या हेमगर्भमात्रेचे वळसे देणाऱ्या लेखणीचे तारेरे, खानदेशांतील लेवा पाटीदार समाजांत उद्भवलेल्या सत्पंथीवादासंबंधांत निव्वळ लेवा समाजावर मात्र उडवण्याची आपली हौस पुरी करून घेतलेली दिसते. या पत्री-

कडे या एवढ्या मोठ्या लेखमालेंत सत्पंथाच्या सत्स्वरूपाविषयीं अवाक्षर सुद्धां आढळत नाहीं.

मराठी वाङमयांत वर दिल्याप्रमाणें सत्पंथासंबंधींचें भरीव आणि संपूर्णपणें माहिती देणारें असें कोणतेंच लिखाण अद्यापपर्यंत नाहीं. गुजराथेंत अलिकडील २०-२५ वर्षांत सत्पंथाविरूद्ध उद्भवलेल्या चळवळींत मात्र गुजराथी भाषेंत सत्पंथाचें सत्यस्वरूप दर्शविणारे कांहीं चार पांच ग्रंथ प्रसिद्ध झालेले आहेत. सत्पंथाचा आणि त्यांच्या अनुयायांचा मोठा कळवळा दाखविणारे आणि त्यांची बाजू घेऊन प्रतिपादणारे वरील लेखक आणि वर्तमान पत्रकार यांनीं ते ग्रंथ अवश्य चाळावे, असें आम्ही सुचवितों.

सत्पंथाविषयीं लोकमत

मागील प्रकरणांत लिहिल्याप्रमाणें मराठी भाषेत सत्पंथा-संबंधीं माहिती देणारें पुस्तक अद्याप उपलब्ध नाहीं पण सत्पंथा-च्या उद्भवलेल्या निरनिराळ्या स्वरूपाच्या वादांत सार्वजनिक दृष्टीनें कांहीं वर्तमानपत्रांनीं आपापलीं तत्संबंधींचीं मतें वेळों-वेळीं प्रगट केलेलीं आहेत. कांहीं पत्रकारांनीं सत्पंथाविषयींच्या चर्चेत आपापलीं मतें आधारांनिशीं सविस्तरपणें प्रगट करून प्रसिद्ध केलेलीं आहेत. अशाच साधार चर्चिलेल्या वर्तमानपत्रांतील सत्पंथासंबंधींच्या लेखांतून कांहीं निवडक उतारे आमच्या मताच्या पुष्ट्यर्थ पुढें देत आहोंत. या उताऱ्यांबरोबरच महाराष्ट्र ज्ञानकोशांत सत्पंथासंबंधीं आलेल्या माहितींतीलही दोन उतारे घेतले आहेत. त्याचप्रमाणें जळगांव येथील श्री. ल. शि. चौधरी वकील यांनीं लिहिलेल्या " सत्पंथाचें गौडबंगाल " पुस्तकांतलि उतारे दिले आहेत. तसेंच मुंबई हायकोर्टानें दिलेल्या निकालांतील [जज्जमेंटमधील] उतारेही दिले आहेत. या उताऱ्यांवरूनही सत्पंथाविषयींचें आधुनिक लोकमत कशा स्वरुपाचें आहे याचा विचार करून हिंदुसमाजाच्या दृष्टीनें आपापला दृष्टीकोन वाचकांनीं ठरवावा.

Adv.Chaudhary

Book - Satpanthache Gaud Bangal

" १४१९ साली इमामशाहा नांवाचे महात्मा साधू इराण देशांतून इकडे गुजराथेंत आले. हे या पंथाचे प्रवर्तक होत. त्यांचा अहमदाबादच्या दक्षिणेस ९ मैलांवर गीरमथा गांवाजवळ एका टेकडीवर मुक्काम होता. बावांनीं अनेक चमत्कार दाखविल्यामुळें त्यांच्यावर लोकांची भक्ति बसली. बावांचे पांच मुख्य शिष्य होते. (१) हाजरबेग. (२) भाभाराम. (३) नागाकाका. (४) सारा काका (५) चिचिबाई (भाभारामची बहीण) या पांच शिष्यांपैकीं पहिले सोडून बाकीचे चार हे हिंदु होत. पिराणा येथें बावांची मुख्य गादी आहे. तेथें दरवर्षीं मोठा उरूस भरतो."

—ज्ञानकोश

"(१) शिक्षापत्री:-- यांत गुरु इमामशहा यांनीं शिष्यवृंदास त्याज्य व ग्राह्य अशा १०० सत्क्रियांची माहिती दिली आहे. (ओवीबद्ध). (२) मूळबंध (गुजराथी)-- कल्प, युग आणि अवतार यांची माहिती (ओवीबद्ध). (३) गोरवणी (गुजराथी) नीतिशास्त्र व गुरुपदेश (भजनमाला). (४) जोगवाणी (गुजराथी). (५) योगशास्त्र, योगी लोकांना उपदेश (भजनमाला). (६) दशावतार (गुजराथी) परमेश्वराचे मच्छकच्छादि दहा अवतार व त्यांविषयीं वर्णन (ओवीबद्ध). (७) हरिणीसंवाद (गुजराथी) महाशिवरात्रीचें माहात्म्य, जावड नांवाच्या भक्ताची कथा व पारध्यास हरणानें केलेला उपदेश (ओवीबद्ध). (८) सत-

Mulbandh

पाताळ (हिंदी गुजराथी) सात पाताळांची रचना (कथासार) (९) एकवीस स्वर्ग (हिंदी गुजराथी) मेरु पर्वताच्या भोंवताली २१ पुऱ्या (स्वर्ग) आहेत त्याबद्दल माहिती (कथासार) (१०) नीकलंकी गीता (हिंदी, गुजराथी, संस्कृत वगैरे पंच भाषा) आत्मबोध, पिंडब्रह्मांडाची माहिती (वेदांतसार) (११) सद्गुरूचे श्लोक (हिंदी, गुजराथी) नीतिपर दोहेरे (१२) देवी संवाद (गुजराथी) इंड, पींड, ब्रह्मांड यांची उत्पत्ति, ब्रह्मा, विष्णु, महेश व शक्ति यांची उत्पत्ति व त्यापासून जगाची उत्पत्ति, देहीसंशोधन वगैरे (वेदान्तसार) (१३) हरचंदपुरी (गुजराथी); राजा हरिश्चंद्राची सत्वपरीक्षा (राग-रागिणी) (१४) व्यासाख्यान (गुजराथी) व्यासांनीं श्रीकृष्ण, पांडव यांना सांगितलेला उपदेश, चार युगांची वर्तणूक, व्रत, दान, होम, पूजन युगाप्रमाणें सांगितले आहे व कलियुगाचें भविष्य कथन केलें आहे. [१५] बोधरास [गुजराथी] ईश्वर-पार्वती संवाद, धर्म कसा पाळावा याबद्दल हरिश्चंद्र, प्रल्हाद, पांडव यांचे दाखले दिले आहेत. (ओवीबद्ध) (१६) अर्जूनगीता (प्राकृत) श्रीकृष्णांनीं अर्जूनास कलियुगाचें महत्त्व सांगितलें व भक्ति कशी करावी या बद्दल माहिती दिली आहे व युगाप्रमाणें वर्तन करण्यास सांगितलें आहे. (कथासार) (१७) सत् वचन (हिंदी गुजराथी) गुरु व गोविंद यांची माहिती व दहाव्या अवतारपात्राच्या अंगच्या सोळा कळांचें वर्णन (ओवीबद्ध) (१८) ब्रह्मप्रकाश (हिंदी) ब्रह्मज्ञानाचें कथन व तें कोणाला लाभलें. त्या भक्तांचीं नांवें

(ओवीबद्ध) (१९) आगमवाणी (गुजराथी):—कलियुगांतील भविष्य कथन (भजनमाळा) (२०) वधावो (गुजराथी) परमेश्वरानें कसकसे अवतार धारण केले व भक्त तारले त्या विषयीं स्तुतिपाठ व विनंत्या (भजनमाळा)

येणें प्रमाणें वरील सर्व सत्पंथी ग्रंथ फार जुनें व हस्त-लिखीत आहेत. ”

—ज्ञानकोश

—०—

जळगांव येथें भरलेल्या वर्णाश्रम स्व. संघाच्या परिषदेपुढें मांडण्यांत आलेला अर्ज.

“ वर्णाश्रम-स्वराज्य-संघाच्या जळगांव येथील परिषदेस विराजमान झालेल्या सर्व परमपूज्य आचार्यांच्या चरणांजवळ खालील विनंती अर्ज सादर करण्यांत येत आहे. अहमदाबादे-जवळ वसत असलेल्या ‘पिराणा’ नांवाच्या ‘ठिकाणा’ चे आद्य संस्थापक ‘ सत्प्रदर्पीर इमामशाह ’ यांनीं प्रस्थापित केलेला ‘पिराणा पंथ’ हल्लीं गुजराथ, कच्छ, खानदेश, बऱ्हाणपूर या ठिकाणीं चालू आहे. सदरहू पिराणा पंथ खानदेशांत ‘सत्पंथ’ या नांवानें प्रचलित आहे. या पंथांत सनातन वैदिक धर्माप्रमाणें वेद मानीत नाहींत. हिंदूंचीं षट्दर्शनें अपवित्र मानतात. हिंदु-तीर्थांना अपवित्र मानितात. त्या तीर्थांच्या ठिकाणीं देवतांची वस्ती नसून भूतांची वस्ती आहे, असें या पंथाच्या ग्रंथांत वर्णिलें आहे. या पंथांत गाय अपवित्र मानली आहे. एकादश्यादि हिंदु व्रतें निषिद्ध मानलीं आहेत. उलटपक्षीं ‘ पिराणा ’ हें ठिकाण पवित्र

तीर्थ आहे, असें या पंथाचे अनुयायी मानतात व त्याठिकाणीं इमामशहा, त्याची बायको व त्याचा मुलगा, या तिघांचीं थडगीं ज्या मुख्य रोझ्यामध्यें आहेत, त्या रोझ्यांस प्रदक्षिणा घालून त्या तिन्ही थडग्यांचें दर्शन घेतात. त्याच ठिकाणीं असलेल्या पंजाच्या आकृतीस पवित्र मानून त्यांचें दर्शन घेतात. मोहरनबुवतचें चित्राचें दर्शन घेतात. बीज (द्वितीया) शुक्रवारादि अवैदिक व्रतें करितात. पश्चिमेकडे तोंड करून पीरशहाचा जप करणें या पंथांत सांगितलें आहे. ' ला, इलाह, इल्लिल्ला, महमद रसुलिल्ला ' ही कलमा पढतात. या पंथाच्या अनुयायी लोकांचे धार्मिक विधि दुवा पढून करण्यांत येतात. त्या दुवांचा आरंभ ' फरमानजी बिसमिल्ला, हर्र रहिमान ....रसुललिल्लाहो ' असा होतो. या प्रमाणें आचार व व्रतें असलेला ' पिराणा—सत्पंथ ' वैदिक आहे कीं वेदबाह्य आहे हें समजण्यासाठीं आचार्यचरणारविंदाजवळ नम्र विनंती आहे. "

तारीख १–१–१९३१

आपले नम्र दास.

लक्ष्मण शिवराम चौधरी.

सोनु तुकाराम पाटील.

आत्मानंद ब्रम्हचारी, फैजपूर

खंडोबाची वाडी.

जिल्हा—पूर्व खानदेश.

परिषदेचा निकाल.

" इदं आवेदनपत्रं सम्यक् अनुवाचितम्। येषां भारतीयानां एतादृशी दुरवस्था ते वेदबाह्या एव इति वयं प्रतीमः "

ता. १-१-१९३१

" Little is heard and much less known of this sect whose members, numbering several lakhs, are scattered over different parts of the Bombay Presidency. In the Khandesh District alone they number close upon 40,000 while equally large numbers inhabit Gujrat, the Cutch Peninsula, Bhuranpur and adjacent tracts.

The Satpanthis profess to call themselves Hindu and yet do not admit the Vedas as the basis of the Hindu religion. Nor do they observe several Hindu festivals including the Ekadashi fast. The cow which is sacred to all Hindus, has no religious significance for them. On the other hand like the Mohomedans they observe the Friday fast and recite their prayers facing the West under the guidance of a priest who is known as the Imamshah. "

D/ 7-5-31 . —*Times of India, Bombay.*

Book - Times of India

" या [सत्पंथी] समाजांतील लोकांच्या चालीरीति व धार्मिक कल्पना बऱ्याचशा हिंदु व कांहीं मुसलमानी चालीरीति व धर्मसमजुती यांच्या मिश्रणानें बनलेल्या आहेत. या समाजाचे लोक मुख्यतः मुंबई इलाख्यांतच पसरले असून त्यांची लोकसंख्या कांहीं लाख भरेल, इतकी मोठी आहे. नुसत्या खानदेशांतच ती चाळीस हजारांच्यावर आहे. शिवाय गुजराथ इत्यादि प्रांतांतही या समाजाचे लोक राहतात. असें म्हणतात कीं, या सत्पंथी लोकांना वेद मान्य नाहींत. ते एकादशीसारखीं हिंदुधर्ममान्य व्रतें व सण पाळीत नाहींत. गाईला पूज्य मानीत नाहींत."

वैशाख व॥ ५ शके १८५३ —महाराष्ट्र, नागपूर.

" मॅजिस्ट्रेट काय बिचारा ! फक्त पुढील कायदा पाहून निर्णय देत असतो. पण शंकराचार्य हे कांहीं असें परप्रत्ययनेय (?) नाहींत. जुनें शास्त्र व नवी परिस्थिति यांचा मेळ घालूनच त्यांना आपले निर्णय द्यावयाचे असतात व तसे निर्णय देऊन समाजाची धारणा प्रगमनशील ठेवणें हें त्यांचें कार्य असतें."

ता. १२-६-१९३१

—आचार्य आणि वर्णाश्रमधर्म पाक्षिक, पुणें.

" तरीपण या लोकांस हिंदु म्हणावें कीं, मुसलमानांत लोटावें असा प्रश्न पडून सनातनीयांनीं जळगांवास भरलेल्या

वर्णाश्रम स्वराज्यधर्मपरिषदेपुढें हा प्रश्न ठेवला. तेथें कांहीं जणांनीं सत्पंथी लोकांविरुद्ध अभिप्राय दिला. तो नापसंत होऊन कांहीं हिंदूंनीं श्रीशंकराचार्यांच्या पीठाकडे दाद मागितली व सांगण्यास दुःख वाटतें कीं, श्रींनीं देशकालवर्तमान यांकडे कांहींहि लक्ष न देतां 'सत्पंथी लोक हिंदु नाहींत' असा निर्णय दिला."

ता. १६ मे १९३१ —केसरी, पुणें.

"परंतु हिंदुसमाजास लागलेली गळती बंद करण्याचे जे प्रयत्न आज देशांत सुरूं आहेत, त्यांकडे दुर्लक्ष करून श्रींनीं जो निर्णय दिला तो हिंदुसमाजाला घातक आहे, असें ह्मटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. सत्पंथी लोकांच्या व इतर हिंदूंच्या आचारांत कांहीं फरक असेल, परंतु तो समाज जर आपणांस हिंदू ह्मणवितो व हिंदूंना 'आपणास आत्मसात् करून घ्या' अशी मागणी करतो, तर त्यांस अशाप्रकारें झुगारून देणें इष्ट नाहीं. ते लोक आज वेदांना मानीत नसतील, तर त्यांना वैदिक धर्मानुयायी करून घेण्याचें काम श्रींचें नव्हे तर कोणाचें? बौध्दधर्माच्या वर्धिष्णु काळांत वैदिक धर्मापासून च्युत झालेल्या समाजांत श्री. शंकराचार्यांनींच वैदिक धर्माच्या छायेखालीं परत आणलें नाहीं काय? मग त्या कर्तव्याचें ह्यांस विस्मरण कां व्हावें?"

ता. १६ मे १९३१ —केसरी, पुणें.

" सत्पंथी समाज अद्यापही आपली बाजू आपल्या धर्म पुस्तकाच्या आधारें जगद्गुरूसमोर मांडण्यास तयार आहेत व ते जो निर्णय देतील तो मान्य करण्यास तयार आहेत. "

ता. २५ मे १९३१ —प्रबोधचंद्रिका, जळगांव.

" 'वेदबाह्य' हा शब्द वेद न मानणाऱ्या कोणालाही लावतां येईल व मन्वादि स्मृतिकार व दर्शनकार यांनीं तो जैन-बौद्धादिकांनाहि उद्देशून योजिला आहे. कल्पना करा कीं, उद्यां आचार्यांचा संपादक 'मी वेदाला मानीत नाहीं,' असें म्हणूं लागला; तर भारतवर्षांतील पंडीत व जगद्गुरू त्याला काय म्हणतील ? 'तूं जर वेद मानीत नाहींस तर वेदबाह्य आहेस' असेंच म्हणतील कीं नाहीं ? अथवा एखादा मनुष्य एखाद्या समाजांत जाऊन 'मी हिंदु आहें' पण 'मी श्रुति–स्मृति–पुराणोक्त धर्माला मानीत नाहीं' असें सांगूं लागला व 'याला वैदिक समजावें कीं, नाहीं ?' असा आचार्यांना किंवा पंडितांना कोणी प्रश्न केला तर त्यांनीं त्याला काय उत्तर द्यावें. 'हा मनुष्य वेदादि व तदुक्त धर्म, यांना जर मानींत नसेल तर तो 'वेदबाह्य' आहे असें जर म्हणूं नये, तर काय म्हणावें ! नाम मात्र हिंदु म्हणविणाऱ्या लोकांचीं संख्या वाढविण्याच्या लोभानें 'तो आपल्याला हिंदु म्हणवितो,' एवढ्यानेंच त्याला हिंदु म्हणावयाचें कीं काय ? वस्तुतः आह्मी हिंदु म्हणून जगामध्यें एखादा धर्म आहे हें ओळखीतच नाहीं. आह्मी फक्त वैदिक व वेदबाह्य हे

दोनच धर्म ओळखतों. ज्याप्रमाणें वैदिक धर्मामध्यें इतर अनेक अवांतर पंथांचा अंतर्भाव होतो, त्याप्रमाणें वेदबाह्यांमध्येंही अनेक धर्म अंतर्भूत होत असतील. ते कदाचित् चांगलेहि असतील, पण त्याचें अह्माला काय ! आह्मांला आमचे वैदिक धर्मी व तदंतर्गत–तदनुयायी यांच्याबद्दल विचार करावयाचा आहे. अशा लोकांतील कोणीहीं ' अमुक अमुक आचार–विचार असलेला मनुष्य वैदिक धर्मी आहे कीं नाहीं ' असा प्रश्न केल्यास त्याच्या आचारविचाराकडे पाहून तो वेद-शास्त्रानुसारी असल्यास तो वैदिक व नसल्यास वेदबाह्य असा शास्त्री, पंडीत व आचार्य यांनीं निर्णय देणें, यांत कांहीं दोष नाहीं, असें आमचें निश्चित मत आहे. "

ता. २८ मे १९३१

—आचार्य आणि वर्णाश्रमधर्म–पाक्षिक, पुणें.

" ह्या समाजांत पिरांची पूजा मान्य केली आहे. मुसलमानी पीर ह्या संस्थेबद्दल माझा कांहीं वाद नाहीं परंतु या संस्थेच्या मागें जी संस्कृति आहे त्या संस्कृतींत एक काफीर भ्रष्ट केला असतां स्वर्गांत एकाहत्तर पऱ्या व बहात्तर हुऱ्या मिळतात असें सांगितलें आहे ! त्या संस्कृतीचा व आमचा विरोध आहे."

—श्री पाचलेगांवकर यांची मुलाखत.

तारीख १८।७।३१ केसरी, पुणें.

सत्पंथीयांना इषारा.

" वेदांतील कांहीं आचार विचारांस मान्यता देऊन व हळूंच आपले अधर्मीय आचारविचार दडपून देऊन हजारों ब्राह्मणांना हिंदुधर्मांतून पतित केलेल्याची साक्ष डी नोबिली यांच्या चरित्रावरून स्पष्ट दिसते. डी नोबिली हा स्वतः खिश्चन असून त्यानें पुष्कळ लोकांना खिश्चन करण्याचा प्रयत्न प्रथमतः करून पाहिला; परंतु त्यांत यश येत नाहींसें दिसतांच स्वतः संन्यासी बनून व हिंदूंच्या वेदांना मान्यता देऊन त्यानें लोकांचा विश्वास संपादन केला. स्वतः तत्वबोधाचार्य हें नांव धारण करून ब्रम्हदेवानें अप्रकाशित जसा पांचवा वेद यशुर्वेद हा मला दिला असा त्यानें समज करून दिला व त्या वेदाच्या नांवानें पांच हजार ब्राम्हणांस भ्रष्ट केलें. हा इतिहास प्रसिध्दच आहे व ह्याच पध्दतीनें पुष्कळसा गवळी समाजही भ्रष्ट केला गेला आहे अशाच तऱ्हेचे भ्रष्ट करण्याचे प्रयत्न अजूनही चालूच आहेत, व म्हणूनच सत्पंथ पंथीयांना व इतरांना इषारा देणें भाग आहे. "

—श्री पाचलेगांवकर महाराज यांची मुलाखत

ता० १८-७-३१ केसरी, पुणें.

http://en.wikipedia.org/wiki/Roberto_de_Nobili

" अवलिया पिरापासून तों चन्नबसवेश्वराच्या अवतारापर्यंत मजल मारून हिंदुधर्मांत धुडगूस घालून तो आंतून पोखरण्याचे जे प्रयत्न सुरू आहेत, तशाच प्रकारचा सदरहू पंथहि एक मला

मोठा, फार जुना व यशस्वी प्रयत्न आहे. हे प्रयत्न इ. स. च्या १३ व्या शतकांत सुरू होऊन यशस्वी झाले आणि सत्पंथांच्या निरनिराळ्या शाखा (निझारी, तैय्यबी, पिराणा, आगाखानी वगैरे) हिंदुस्तानभर (जरूरीप्रमाणें) स्थापन झाल्या. ह्या पंथाचे अनुयायी गुजराथ, काठेवाड, कच्छ, सिन्ध, राजपुताना वगैरे प्रदेशांत लाखो हिंदु होते. परंतु जसजसा वैदिक धर्माचा प्रभाव पडत गेला तसतशी ती संख्या कमी होत आली आहे. "

दे. स. बऱ्हाटे. —केसरी, २१।७।३१

" अर्थात सत्पंथीय हे गीतेंत श्रीकृष्णांनीं म्हटल्याप्रमाणें ' भजन्त्यविधिपूर्वकं ' अशा प्रकारें चुकीच्या मार्गानें चालणारे पण हिंदूच आहेत. "

ता० २५।७।३१ —केसरी, पुणें.

" सत्पंथाच्या संस्कारांत त्या पिराण्या पंथाचे काका जे मंत्र म्हणतात. त्यांत ' ला इल्लिल्लाह महमदर रसूल अल्ला ' अथवा ' इमामशाहा नूर अल्ली महमदशाहा ' असें शेवटीं असतें. "

श्री. ल. शि. चौधरी

ता० २५-७-३१ —आचार्य, पुणें.

Book - Vaidik Islam

" सरकारी गॅझेटीयर मध्येंहि यावर पुष्कळ माहिती प्रसिद्ध झाली आहे. वैदिक इस्लाम नांवाचे एक गुजराथी चोपडें

आगाखानी पंथाच्या प्रवर्तकांनीं प्रसिद्ध केलें असून त्यांत सत्पंथ म्हणजे महंमदी–पंथच लोकांना समजण्याकरितां निरनिराळ्या नांवानें चालू आहे, अशी विधानें केलीं आहेत. हा पंथ वैदिक नव्हेच, हिंदूच्या धर्माचा नव्हेच, या विषयीं कोणास पाहिजे असल्यास आणखी कित्येक पुरावे देतां येतात. परंतु सत्पंथी लोकांना लेवे पाटीदारांनीं जरी बहिष्कृत केलें असलें तरी ते **हिंदुच आहेत असें आमचें म्हणणें आहे.** त्यांना आम्ही मुसलमान म्हणून लेखीत नाहीं. असें आहे म्हणुनच त्यांनीं आपले विधर्मी आचारविचार सोडून धर्मांत यावे असा आमचा त्यांचेमागें लकडा आहे. ”

श्री. ल. शि. चौधरी

ता० २५-७-३१ **—आचार्य, पुणें.**

“ सत्पंथ हा वेदसंमत नाहीं–वेदबाह्य आहे–असें सांगण्यानें शंकराचार्यांनीं त्यांचें हिंदुत्व कसें हिरावून घेतलें व काय अन्याय केला तें समजत नाहीं. ”

ता. २७-७--१९३१ **--प्रागतिक, जळगांव.**

“ मुळचे हिंदु असलेले लेवा पाटीदार सत्पंथाचे मुसलमानी धर्माकडे नेणारे आचारविचार पाळीत असल्यामुळें हा सत्पंथ वेदसंमत नाहीं-वेदबाह्य आहे-असा निर्णय तज्ञ पंडीतांनीं व शंकराचार्यांनीं दिला. ”

ता. २७--७--१९३१ **-प्रागतिक, जळगांव.**

" सांख्यादिकांना वेदविरूद्ध-वेदबाह्य म्हटल्यानेंही जर त्यांचें हिंदुत्व गेलें नाहीं, तर सत्पंथी लेवे पाटीदारांचें तरी हिंदुत्व कसें जाणार ? यास्तव आतां इतका गवगवा झाल्यावर आग्रह सोडून सत्पंथी लेवेपाटीदारांनीं प्रायश्चितपूर्वक इतर सत्पंथी नसलेल्या लेवेपाटीदाराप्रमाणें यथाधिकार स्वधर्मप्रमाणें आचरण आरंभिलें तर त्यांना वेदबाह्य तरी कोण म्हणेल ? कारण वेदबाह्य आचरण करणें निराळें आणि वेदानुयायी नसणें हें निराळें ! सत्पंथी लोकांना आपल्या आचाराच्या त्यागामुळें व निषिद्ध पर धर्माचें आचरण केल्यामुळें वेदबाह्य–वेदविरूद्ध आचरण करणारे, असें म्हटलें आहे. त्यांना पतित–जातींभ्रष्ट म्हटलेलें नाहीं. त्यामुळें ते प्रायश्चित्त व निषिद्ध आचरणाचा त्याग, या उपायांनीं अद्यापि स्वसमाजांत राहूं शकतील. "

' आचार्य आणि वर्णाश्रम धर्म ' पाक्षिक

ता० २५-७-३१ पुणें.

" सत्पंथीं हिंदु असतील, त्याविषयीं लेवा पाटीदारांनीं वाद घातला नाहीं. सत्पंथ ह्मणून जे आचार हे लोक पाळीत आहेत ते वेदबाह्य आहेत एवढेंच शंकराचार्यांच्या निर्णयानें सिद्ध झालें आहे. शंकराचार्यांनीं आपला निर्णय " सत्पंथीं लोकांना हिंदु न समजतां मुसलमान समजा " असा दिला नाहीं. तसेंच वर्णाश्रम परिषदेंत जमलेल्या पंडितांनींहि सत्पंथ स्वरुपाचे आचारविचार वेदबाह्य आहेत, असाच फक्त निर्णय दिला आहे."

ता. २७ जुलई १९३१ —प्रागतिक, जळगांव.

INTERNATIONAL ARYAN LEAGUE.

(Sarvadeshik Arya Pratinidhi Sabha)

Delhi 29-8-1931

Book - International Aryan League

" This Sabha sent a representative to hear all about the Satpanthis. We shall be greatful to you for your supplying us with all necessary Literature containing the Satpanth Sect. Rest assured that we shall try to introduce among them all the necessary reforms "

Yours Sincerely,
GANGARAM
Joint Secretary

" आम्ही हिंदु आहों, असें छातीला हात लावून सांगणारांना विधर्मी आचारविचार सोडण्याची लाज कां वाटावी व ते जर प्रतिकूळ आचार सोडण्यास तयार नसतील तर त्यांच्या नाममात्र हिंदुत्वावर लुब्ध होऊन त्यांस कवटाळण्यांत तरी काय अर्थ आहे. "

ता० २२ आक्टोबर १९३१ —आचार्य, पुणें.

" सत्पंथ धर्माचीं तत्वें व चालिरीति ह्या वैदिक धर्माशीं मुळींच जुळत नसून अगदीं भिन्न आहेत. सत्पंथी धर्मासंबंधीं इतका उहापोह झाला असूनसुद्धां, सत्पंथी धर्म हा वैदिक आहे असें म्हणणें योग्य नाहीं. कारण खानदेशांत जितका उहापोह

झाला तितका कोठेंच झाला नसेल. या वाटाघाटींत सत्पंथ हा पूर्ण वेदबाह्य ठरला असून तो पूर्णपणें मुसलमानी धर्माच्या तत्वांला अनुसरून आहे. कारण सत्पंथी लोक हे खालीं लिहिल्याप्रमाणें वर्तन करितात.

(१) प्रेताचें डोकें उत्तरेस करून दक्षिणेस पाय करून पुरणें.

(२) एकादशीचे ऐवजीं बीजशुक्रवार उपवास करणें.

(३) हिंदू उपवासाच्या ऐवजीं रोझें पाळणें.

(४) गोमूत्र न घेणें, गायब्राम्हण यांना अपवित्र मानणें.

(५) मूर्तिपूजा न मानणें, दुवा व कलमा पढणें, वगैरे वगैरे.

अनेक चालीरीति वैदिक धर्माच्याविरूद्ध असलेमुळें सदरहू सत्पंथीयांना वैदिक धर्मी म्हणणें योग्य नाहीं.

सत्पंथ धर्म हा वेदबाह्य आहे असें श्रीमत् **शंकराचार्य संस्थान** संकेश्वर व करवीर यांनीं लेवापाटदिार लोकांना आज्ञापत्र दिलेलें आहे व त्यांच्या चालीरीति हिंदुधर्मबाह्य आहेत, असा **जळगांव कोर्टानें** लेवापाटीदार लोकांना निकाल दिलेल आहे."

ता० ३।९।३४ —प्रबोधचंद्रिका, जळगांव.

"(१) सत्पंथांचीं तत्वें व चालीरीति वैदिक धर्माच्या तत्वांशीं व चालीरीतींशीं विसंगत आहेत. (२) सत्पंथ मुसलमानी धर्माच्या पायावर उभारलेला आहे. (३) हिंदूंच्या प्रचलित उपवासां ऐवजीं "सत्पंथी" भावसार मुसलमानाप्रमाणें रोझें व

बीज–शुक्रवार पाळतात. (४) गोमूत्र न घेणें, गाई व ब्राह्मण यांना अपवित्र मानणें, मूर्तिपूजेस न मानणें, दुवा व कलमा पढणें वगैरे हिंदुधर्मबाह्य तत्वें सत्पंथी लोक मानतात. (५) प्रेतास अग्निदाह न देतां " सत्पंथी " मयताचे दाक्षिणेस पाय करून पुरतात. "

ता. १५ जानेवारी १९३५ — केसरी. पुणें

" सत्पंथी धर्मशाळेंत मूर्तिपूजा होत नाहीं. घृतज्योत आणि कलश यांचीच पूजा करतात. "

ता. ७ आगस्ट १९३५ प्रबोधनकार ठाकरे
—विदर्भ, उमरावती.

" सत्पंथाच्या आचारधर्माबद्दल येणाऱ्या शंका किंवा वावटळीप्रमाणें उडालेले तर्क कुतर्क यांची छाननी किंवा छाटणी करण्याचा मार्ग म्हणजे जातिबहिष्कार नव्हे. सत्पंथ, हिंदु कां मुसलमानी ? याची परीक्षा, चिकित्सा आणि निर्णय हिंदु समाजांतील सर्व धर्माभ्यासी आणि निस्पृह विद्वानांच्या परिषदेकडून लावून घ्यावयाला तुम्हांला कसलीहि हरकत नाहीं. मात्र हे विद्वान्, आगा ना पीछा अशा भडकभैरव आत्मानन्दी ठशाचे मुळींच नसावेत. "

ता. ११ सप्टेंबर १९३५ श्री. प्रबोधनकार ठाकरे.
—विदर्भ उमरावती.

See Page 119 & 143

(149 of 186)
(173 of 186)

Book - Satpanthache Gaud Bangal

Vakil Laxman Shivram

सत्पंथाचें गौड बंगाल.

(या पुस्तकांतील उतारे)

" ज्या प्रमाणें इस्लामी धर्म आदम पासून चालत आलेला आहे पण निरनिराळया भाषांपरत्वें तोच पंथ निरनिराळया नांवानें ओळखला जातो व इस्लाम हें नांव फक्त ह. पैगंबर यांना ह० रसूल म्हणून ओळखणाऱ्यांनींच दिलें व जसा तोच पंथ हजरत रसूल यांच्या हयातींत इस्लाम या शब्दानें न ओळखला जातां ' हनफी धर्म ' या नांवानें ओळखला जात होता, व त्याच पंथाचें आरबी भाषेंत इस्लाम हें नांव आहे, त्याच इस्लामी पंथाचें गुजराथी व प्राकृत भाषेंत ' सत्पंथ हें नांव आहे.' यावरून इस्लाम, सत्पंथ व हनिफी धर्म हीं जरी भाषापरत्वें निरनिराळीं नांवें आहेत, तरी तीं सर्व नांवें खुदाच्या सीध्या रस्त्यालाच दिलेलीं आहेत. "

" सत्पंथ (इस्लाम) आणि हिंदूंचा धर्म ही एकाच प्रोग्रामची साकळी आहे. ते भिन्न नाहींत परंतु हिंदुसनातनधर्म प्राचीन इस्लाम धर्म आहे व त्यानंतर त्याच इस्लामी धर्माचे शुध्द सिध्दांत जनाब रसूल खुदानें अर्वाचीन काळांत प्रकाशित केले व त्यामुळें सत्पंथ ही इस्लामचीच शुध्द शिकवण झाली आहे. त्याच इस्लामी धर्माचें खरें शिक्षण हिंदुस्थानांत गुजराथी, कच्छी सिंधी व पंजाबी वगैरे भाषांमधून ' सत्पंथ ' या नांवानें देण्यांत

आलें आहे. इस्लाम व इस्लामी धर्माचें तेराशें वर्षांचें शिक्षणाचें फळ सत्पंथ आहे. ज्याप्रमाणें सनातनी धर्मामध्यें ईश्वरी अवतार व त्याचें वचन म्हणजे वेद मानितात त्याचप्रमाणें हल्लीं **ईश्वरी अवतार म्हणून इमामास मानावें** व ईश्वराचें इल्म (वचन) कुराणे शरीफ मानावें. त्याच कुराणे शरीफचें विस्तृत समज सत्पंथ शास्त्रांत समजाऊन सांगितली आहे."

"सत्पंथाचें वैशिष्ट्य म्हणजे गुप्तपणा, त्यामुळें या पंथास 'गुप्तीपंथ' असेंही नांव आहे. या पंथाचीं पुस्तकें छापलेलीं नसतात. सत्पंथाचा पडदा जो सत्पंथी-धर्मी खुला करील तो नरकास जाईल अशी या पंथाची ताकीद आहे. पिराण्यास असलेल्या इमामशहानें रचलेल्या कवनांच्या वह्यांवरून सत्पंथी लोक नकला करून घेतात. या पंथांत जी "क्रिया" सांगितली आहे ती धर्मी माणसाशिवाय इतरांस पाहूं देत नाहींत. याप्रमाणें हा पंथ अत्यंत गुप्तपणें चालत आला असल्यामुळें, त्यांतील **गौडबंगाल** पंथाबाहेरील इसमास कळणें शक्य नव्हतें. पण या पंथांतील आचार विचारांची किळस येऊन कांहीं सत्पंथी फुटले व त्यांनीं हीं धर्मपुस्तकें आतां छापून प्रसिद्ध केलीं आहेत."

"एका पत्रांत त्यांनीं (श्री. तोताराम बधु महाजन यांनीं) वालजी जिवराम यांस असें कळविलें आहे कीं आपण श्री. द्वारका

पाठाण्या शंकराचार्यांकडे या पंथाचा निकाल लावून घेण्याकरितां जावें व या संकेताप्रमाणें तोताराम महाजन हे श्री. द्वारकापीठ शंकराचार्यांकडे गेले. पण त्यांना सत्पंथ वेदांतर्गत आहे असें आज्ञापत्र मिळालें नाहीं. "

" पिराण्यांत असलेल्या वर्हाडच्या १५० वर्षांच्या जुन्या नकला आम्ही वाचल्या. त्यावरून तर असें स्पष्ट शाबीत करून देतां येईल कीं [आम्ही आव्हान घेणेस तयार आहोंत] सदरहू इमामशाही अथवा पिराणा सत्पंथ हा इमामशहाचे पूर्वज पीर नूरसतगोर, पीरशम्स, पीरसदद्दीन व कबीरुद्दीन यांनीं शिया-इमामी इसमाइली पंथास सत्पंथ हें दिशाभूल करणारें नांव देऊन हिंदुंना ज्या धर्मांत बाटवून खोजे, शमसी, मतिया, मोमना, आगा-खानी बनविलें तो " शिया इमामी इसमाइली, निझारी पंथ" होय. ही गोष्ट आह्मी अनेक ग्रंथांच्या आधारें शाबीत करून देण्यास तयार आहोंत. खुद्द इमामशहानें रचलेल्या ' जिन्नत नामा ' पुस्तका-वरून तसेंच नवसारी येथील इमामशहाचा बिहादरी वंशज सैय्यद सदद्दीन यांनीं इमामशहाचें लिहिलेल्या चरित्रावरून शाबीत करून देतां येईल. "

Book - Gazettee

" गुजराथ गॅझिटीअर भाग ९ पार्ट १ यांत १६७ पानांत इमामशाही पिराणा सत्पंथी लोकांची माहिती दिली आहे. त्यांत सत्पंथी लोक " ला इलाह लिल्लिल्ला महंमदिर्रसूलिल्ला " ही

इस्लामी धर्माची कलमा पढतात. असें लिहिलें आहे. " तवारिखे पीर " या पुस्तकांत अशी माहिती दिली आहे कीं इमामशहा हा आपल्या धर्माचा प्रसार करीत पुढें चालला व थोड्याच काळांत असा प्रकाश पडला कीं लाखो लोकांच्या मुखांतून " ला इलाहा लिल्लिल्ला महंमदीर्रसूललिल्ला " याचा जयघोष होऊं लागला. "

Book - Twarikhe Pir

" याच गॅझिटमध्यें असें लिहिलें आहे कीं, सत्पंथी लोक दुवा पढतात. त्या दुवाचा आरंभ " फरमानजी बिसमिल्ला हररहे-मान नररहीम सत गोरपात्र ब्रम्हा इंद्र इमामशहा आदविसनव नरजंन नरअल्ली महमदशहा " असा होतो हीं अक्षरें म्हटल्यानंतर दुवा म्हणतात. दुवा झाल्यावर शेवटीं " सतगोर इमामशहा नरअल्ली महमदशहा हक लाइलाइलाहा इल्लिल्ला महमदुर्रसूलिल्ला " अशीं अक्षरें म्हणतात. "

" विशेष गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी म्हटली म्हणजे या पंथाचा काका ज्यावेळीं दिक्षा घेतो त्यावेळीं त्याला शेंडी काढावी लागते व दाढी ठेवावी लागते. "

" सत्पंथ विजय " पुस्तकांत इमामशहाच्या रोज्याचा फोटो दिला आहे. त्यांत इमामशहाचे थडग्यासमोर रहेलवर कुराण ठेवलेले आहे. ही गोष्ट कोर्टांत आरबी जाणणाऱ्या इसमाकडून शाबित करून घेतली आहे. "

It has been proved in the court of law that the book lying before the tomb of Imam Shah is Kuran / Quran

See Page 131 of 186

Extract of Bombay High Court Order

मुंबई हायकोर्टाच्या जजमेंटमधील उतारे

" It is not for the Court to decide, as the learned sub-ordinate judge has nevertheless done, that the Satpanth cult is abhorrent to the feelings of the Leva Patidar caste as a whole. that is a question for the Caste itself, and we think that it had decided it and that its procedure in coming to a decision was not so irregular and contrary to the dic-tates of natural justices and that however the plaints may be framed, what they raised was really a caste question outside our perview. "

" If the Lewa Patidar chose to say that no one who worships a Mahomedan Pir might continue to be a member, no one can challenge their decision."

" It is also not competing for the Civil Court to consider and decide the only point on which he (Plaintiff) asks a decision whether the Satpanth is within or without the Vedic religion. "

D/. 15 th January 1935.

Bombay High Court appeal.

No $\frac{289}{1928}$ & $\frac{290}{1928}$ (combined)

सत्पंथ हिंदुधर्मांतर्गत नाहीं.

सत्पंथाचें स्वरुप कसें आहे हें आतांपर्यंत वाचकांना कळून आलें असेल त्या माहितीवरून विचार केला तर सत्पंथास हिंदू म्हणावें कीं मुसलमानी म्हणावें हा एक प्रश्न उत्पन्न होण्या-सारखा आहे. पण हिंदुमहासभेच्या विशाल दृष्टीनें विचार करून " हिंदुस्थानांत आतांपर्यंत उद्भवलेल्या सर्व धर्मीयांना ज्यांची पुण्यभूमी हिंदुस्थान आहे ते हिंदूच होत. " या तात्विक कसोटीस सत्पंथ लावला तरी तो हिंदुधर्मांतर्गत होईल किंवा नाहीं याची शंकाच वाटते. कारण सत्पंथाच्या गौंडबंगाला-तील भूलथापींच्या चक्रांत अडकलेल्या सत्पंथीधर्मीयांच्या हेक्यांस व त्यांच्या स्वार्थास बळी पडलेल्या लोकांची ओळख हिंदू समाजास बिलकूल झालेली नाहीं. जातींजातींत उद्भवलेल्या सत्पंथाच्या नानाविध भानगडींमुळें हा गुप्तपंथ अलिकडे गुप्त न राहतां उघडकीस येऊन त्याचें अंतस्थ काळेंबेरें धार्मिक स्वरूप जगासमोर येत आहे. जातीपंचायतीचे निकाल, धर्मगुरूंचें आज्ञापत्र आणि कोर्टांतील फिर्यादी इत्यादिकांमुळें धसास पेटलेला हा धार्मिक प्रश्न व त्यावर अनेक मोठमोठ्या लोकांनीं कित्येक दिवस घालवून प्रगट केलेले विचार आणि निकाल सत्पंथी अनु-यायांच्या दृष्टीनेंही अवश्य विचार करण्यासारखे आहेत.

अशाप्रकारें त्यांच्याच हेक्यामुळें त्यांनीं बहुजन समाजाच्या विरुद्ध राहणें, वागणें, आणि आचरण करणें आणि म्हणून बहुजन समा-

जानें त्यांना बहिष्कृत करणें ह्मणजे त्यांना मुसलमानांत लोटणें नव्हे, हें कोणासही सहज कळण्यासारखें आहे. विचारी, समंजस व समाजहितचिंतक मनुष्य केव्हांही बहुजन समाजाच्या विरुद्ध राहूंच शकत नाहीं. या साध्या व्यवहारी न्यायाप्रमाणें सत्पंथी-यानींच सत्पंथ हिंदुधर्मांतर्गत आहे किंवा नाहीं याचा अवश्य विचार करावा. सत्पंथ हा हिंदुधर्मांतर्गत बिलकूल नाहीं या संबं-धींचे प्रचलित पुरावेही पुढें देत आहे. ते अवश्य विचारांत घेण्या-सारखें आहेत.

Date

सन १९३१ च्या जुलै महिन्यात गुजराथ प्रांतिक हिंदु सभेचें अधिवेशन भरलें. तींत गुजराथेंत सत्पंथानें उडवि-लेल्या हाहा:काराचा प्रश्न धार्मिकदृष्ट्यां विचाराकरितां पुढें आला. त्यावर गुजराथ प्रांतिक हिंदुसभेनें विचार करून पुढील ठराव एकमतानें पास केलेले आहेत.

Gujrat Prantik Hndu Sabha -Also see

(१) इस्लामी पंथाचा त्याग:-- हें संमेलन जाहीर करीत आहे कीं, भोळे हिंदु बंधुभगिनी यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांना मुसलमानी धर्मांत मिळवून घेण्याकरितां हिंदुधर्माला काळूच दाखविणारा असा हा पिराणा सत्पंथ अवैदिक अशा-स्त्रीय आणि केवळ इस्लामी पंथ आहे.

(२) जे हिंदू लोक या सत्पंथाची कोणतीही शाखा मानीत असतील त्यांनीं या मुसलमानी इंद्रजालांत न पडतां स्वतःला कलंकरूप असलेला हा मुस्लीम पंथ लवकर सोडून द्यावा, असें हें अधिवेशन आग्रह करीत आहे.

(३) पिराणा पंथाला इस्लामी पंथ समजून त्याला तिलांजली देणारे व त्याला जमीनदोस्त करणारे गुजराथमधील कानम, वाकळ आणि गडोधे येथील राहणाऱ्या हिंदूबंधुभगिनींचें हें संमेलन मनःपूर्वक अभिनंदन करीत आहे.

Book - Khakhine Jawab

याशिवाय गुजराथी भाषेतील " खाकीनें जबाब " (ले. नारायण रामजी कॉन्ट्रॅक्टर) या पुस्तकांतील पुढील उताराही सत्पंथ हा हिंदुधर्मांतर्गत नाहीं हेंच दर्शवितो.

" पिराणा सत्पंथ हिंदूधर्मासारखा आहे असें सिद्ध करून देणारास १०००० रुपये बक्षिस देऊं, असें जाहीर आव्हान एक वर्षापूर्वींच्या एका लेखांत प्रसिद्ध झालेलें आहे. पण या जाहीर आव्हानास उत्तर देण्याची कोणत्याच पिराणा सत्पंथवाल्याची हिंमत झालेली नाहीं यावरून असें स्पष्ट शाबीत होतें कीं, हा पंथ धटिंगण असून निव्वळ फोल आहे. "

त्याचप्रमाणें जळगांव येथील वकील श्री. लक्ष्मण शिवराम चौधरी यांनीं "सत्पंथाचें गौडबंगाल" या नांवाचें पुस्तक सन १९३१ मध्यें प्रसिद्ध केलें. त्यांतील पान ८ वर त्यांनींही असें स्पष्टपणें म्हटलें आहे कीं " अजूनही आम्ही तोताराम महाजन (खानदेशांतील सत्पंथाचे अध्वर्यु व मुखी) यांस आव्हान करितों, कीं पिराण्यास असलेल्या वह्यांच्या आधारानें कोणत्याही पिठाच्या शंकराचार्यांचें, सत्पंथ हा वेदांतर्गत आहे असें आज्ञापत्र आणा. आम्हीही तुमच्या सारखे सत्पंथी होऊं. "

Jalgaon Vakil

पण आमच्या भोळ्या आणि अंधश्रद्धाळू सत्पंथी बांधवांना अद्यापही सत्पंथाचे इस्लामी, तदंगभूत आणि तज्जन्य विधी,

आचार, विचार, मार्ग आणि व्यवहार उमगले नसतील तर त्यांनीं एवढें तरी ध्यानांत आणावें कीं, ज्या सैयदांना तें हरीवंशी गोर (गुरु अथवा उपाध्याय) मानतात त्याच सैयदांनीं सत्पंथ धर्मासंबंधीं जाहीर रितीनें प्रसिद्ध केलेलें आहे कीं, " सदरहू पिराणा सत्पंथ खास दीने महंमदी धर्म आहे " त्या संबंधींचीं जाहिरात पुढें देत आहें.

गुजराथी पंच पान २४ वें, ता. २४।६।१९२३ इसवी

" श्री पिराणास्थापक हजरत पिर इमामशहासुतनर अली महंमदशहा कुफरेशीनचा दाखविलेला धर्म सत्पंथ पाळणाऱ्या तमाम कोकांस—

Book - Gujarati Panch

सूचना

सदरहू पिराण्याचा ओळखला जाणारा धर्म नामें सत्पंथ हा खास दीने महंमदी (मुसलमानी) आहे व तो धर्म पाळणारे मुमनभाई ह्मटले जातात. ज्यांना जो कोणी सदरहू धर्म पाळणाऱ्या मधून हिंदुधर्म आहे असें शाबीत करून देईल तर आह्मी तो सांगेल तो धर्म स्वीकारण्यास कबुल आहोंत, करितां सदरहु जाग्याचा मुजावर काका, त्याचप्रमाणें कोणी सत्पंथी सांगत असतात ती गोष्ट चूक होय. ता. २१।३।१९२३

लि० सदरहू पिरांच्या औलादच्या सादातांचे पंच सैय्यद पुंजामिया हुसेन मिया. "

Book - Gazettee

बॉम्बे गॅझेटिअर व्हॉल्यूम नं. ४ मधील पान २८७ ते २९० मध्यें सत्पंथासंबंधींचें वर्णन देण्यांत आलें आहे. तें खास-

त्यावरूनही असें निश्चित म्हणतां येतें कीं, 'सत्पंथ हिंदुधर्मांतर्गत नाहीं.' त्यांत स्पष्टपणें असें दिलेलें आहे कीं, रमझान महिन्यांत सत्पंथी लोक रोझे पाळतात, त्याचप्रमाणें प्रत्येक महिन्यांतील द्वितीया आणि चतुर्थी या दोन दिवशीं उपवास करतात. तसेंच बॉम्बे गॅझेटिअर व्हॉल्यूम नं. ९ भाग १ मधील पान १६८ ते १७१ मध्येंही सत्पंथीयांविषयीं माहिती दिलेली आहे. सत्पंथी लोक अर्धे हिंदू आणि अर्धे मुसलमान असून ते तशाच स्वरुपाची [म्हणजे कांहीं हिंदू धर्म तत्वाची आणि कांहीं इस्लाम धर्म तत्वांची अशा दोहोंच्या संमिश्रणाची) प्रार्थना करितात. आणि मतिया कुणब्यांसारखे विधि पाळतात.

Book - Gazetteer

अशारितीनें वरील पुराव्यांवरून सत्पंथ हा हिंदुधर्मांतर्गत नाहीं असें आपणांस निश्चित म्हणतां येईल. पण इस्लामी स्वरूपाच्या अनुयायांसही त्यांचें सर्वस्वी आचरण सत्पंथाप्रमाणेंच असल्यामुळें त्यांना हिंदु म्हणावें किंवा अहिंदु म्हणावें ही शंका अनायासेंच उद्भवते. निव्वळ हिंदुधर्म शास्त्रांच्या तात्विक दृष्टीनें विचार केल्यास सत्पंथीयांना सत्पंथाप्रमाणेंच अहिंदु म्हणणें जरी धाडसाचें असलें, तरी त्यांना आम्ही अहिंदु म्हणतच नाहीं. ज्या ज्या जातींत सत्पंथाचा वाद उद्भवला त्या त्या जातीनें सत्पंथीयांना मुसलमान समजून वाळींत टाकलेलें नाहीं. इतकेंच नाहीं तर कोणत्याही जातीनें अगर बहुजन समाजानें देखील सत्पंथीयांना कधींही मुसलमान म्हटलें नाहीं व म्हणणार नाहीं. पण त्यांच्या सत्पंथासंबंधीच्या चालीरीति हिंदु

धर्म बाह्य आहेत त्या त्यांनीं सोडून द्याव्या व हिंदुधर्माच्या चालीरीति स्विकाराव्या. येवढेंच बहुजन समाजाचें त्यांना म्हणणें आहे. त्या चालिरीती ते कां सोडीत नाहींत आणि बहुजन हिंदू समाजाला त्या कां रुचत नाहींत हाच एक प्रश्न **विचारार्ह आहे.**

सत्पंथाची उत्पत्ति व प्रसार हिंदू समाजांत आरंभापासून जसजसा होत गेला, तसतसे हिंदू समाजांतील लोक त्यांत सामील होऊन अडकले गेले आणि कित्येक वर्षेपर्यंत त्यांच्यांत सत्पंथच रूढ राहिल्यानें कालांतरानें हिंदू म्हणविणारे ते सत्पंथी पूर्ण मुसलमानच बनले. या संबंधींचें वर्णन आम्ही मागील प्रकरणांत केलेलें आहेच. त्यावरून सत्पंथाच्या इतिहासाचें सिंहावलोकन केलें तर भावी काळांत सध्यांचे, सत्पंथाप्रमाणें आचरण करणारे लोक कालमानानें मुसलमानच होतील अशी **कल्पना केल्यास ती अनाठायीं होईल काय?** म्हणून बहुजन समाजाचा सत्पंथीयांना हाच आग्रह आहे कीं, त्यांनीं आतांपासूनच **सत्पंथ त्यजावा** म्हणजे या कल्पनेप्रमाणें **मुसलमानी धर्मांत ओढवलें जाण्याचें त्यांच्यावरील भावी संकट टळेल.**

सत्पंथ आणि हिंदुसंघटन.

सत्पंथाचें स्तोम गुजराथ आणि कच्छ प्रांतांतील पाटीदार जातींत व इतर जातींत फार होतें व हल्लींही थोड्याबहूत प्रमाणांत आहे. त्याचप्रमाणें खानदेश व वऱ्हाड या प्रांतांतही हा पंथ निरनिराळ्या जातींत रूढ आहेच. गुजराथेंत त्याची उत्पत्ति होऊन तो पिराण्यांतील इमामशहाच्या अवलिया पिरापासून तों थेट चन्नक्रेश्वराच्या अवतारापर्यंत मजल मारून हिंदुधर्मांत नकळत घुसगूस घालीत गेला आणि वऱ्हाडच्या टोकापर्यंत जाऊन पोहोंचला. इतक्या विस्तृत क्षेत्रांत हा सत्पंथ कित्येक वर्षेंपर्यंत वावरत होता. पण याचें सत्यस्वरूप जसजसें उघडकीस येत गेलें तसतसा त्याचा प्रसार कमी होऊन तो तितक्या कट्टर स्वरूपांत हल्लीं आढळून येत नाहीं. सत्पंथाच्या भरपूर प्रसाराच्या अमदानींत निरनिराळ्या जातींतील सत्पंथी त्यांच्या ठरलेल्या अकरा करांद्वारें लाखो रुपये इमामशहाच्या पिराणा येथील वंशजांना पाठवीत असत. याच लाखो रुपयांतून पिराण्यास हा पैसा ज्यांच्या हस्तें जात असें ते मुखी व पाटील आपला बराचसा स्वार्थ साधत असत आणि हल्लींही थोड्याबहूत प्रमाणांत हीच स्थिती कायम आहे. पण पिराण्याचे काका व इमामशहाचे वंशज हे कर कमी मिळत असतांनाही या मुखीस व पाटलास कांहींएक बोलत नाहींत. कारण कदाचित् तसें बोलण्यानें जो पैसा मिळतो तोही मिळणार

नाहीं असें त्यांना वाटे. दुसरें असें कीं, अलिकडे निरानिराळ्या जातींत पंचायतींद्वारां व इतर कांहीं प्रसंगाच्या योगें सत्पंथाचें स्वरूप जनतेच्या निदर्शनास आल्यामुळें सत्पंथी लोकांचा विश्वास या पंथावरून जसजसा कमी झाला तसतसा हा पैसाही कमी प्रमाणांत जाऊं लागला आहे. हल्लींही या कराच्या रुपानें जाणारा पैसा अंदाजें अर्धा लाख रुपयांपर्यंत असतो व त्यांत हे मुखी व पाटील आपला स्वार्थ साधून घेतच असतात.

हिंदुसमाजावर मुसलमानांनीं धार्मिक दृष्ट्या कसें नकळत आक्रमण या सत्पंथाद्वारें केलें हें आतांपर्यंत वर्णन केलें. इस्लाम धर्म वाढविण्याचे मुसलमानांचे जे अनेक जालीम उपाय हिंदुसमाजांवर आज तागायत चालू आहेत. त्यापैकींच पण "मधु तिष्ठति जिव्हाग्रे हृदयेतु हलाहलम्" या स्वरुपाचाच सत्पंथ हा एक उपाय पूर्वीपासून त्यांनीं निर्माण करून ठेविला आहे. पण दुर्दैवाची गोष्ट कीं आज हिंदुमहासभा, हिंदुसंघटन आणि शुद्धि संघटन यांच्याद्वारें हिंदुसमाज व हिंदूधर्म परधर्मियांच्या आक्रमणापासून रक्षण्यासंबंधीचे जे उपाय अमलांत येत आहेत, त्यांत सत्पंथीयासंबंधी कोणत्याच प्रकारचा विचार केला जात नाहीं. इतकें च काय पण हिंदुमहासभा व शुद्धिसंघटनकार यांना सत्पंथ हें काय आहे हें माहित सुद्धां नसावें असें वाटतें. कारण सत्पंथाचें आदिमूळ, हिंदू समाजावरील त्याचें आक्रमण व लाखो लोकसंख्याद्वारां त्यानें इस्लामी धर्मांत ओढलेले हिंदुबांधव इत्यादिकांसंबंधीं त्यांना कांहींतरी कल्पना असती तर ते सत्पंथाच्या या

आक्रमणास आळा घालूं शकले असते. म्हणून मुद्दाम सत्पंथाची साद्यंत माहिती गोळा करून ती हिंदुसमाजांतील हें आक्रमण थांबविण्याच्या दृष्टीनें जनतेसमोर मांडलेली आहे खानदेशांतील लेवा पाटीदार जातींत या सत्पंथाच्या अतिक्रमणामुळें उद्भवलेले वादविवाद पंचायतींत, कोर्टांत, हिंदुमहासभेंत आणि शंकराचार्यांपुढें गेले. तेव्हां सत्पंथी हिंदु कां अहिंदु, सत्पंथ वेदांतर्गत किं वेदबाह्य ? हा प्रश्न जेव्हां हटातटाला पेटला तेव्हां वरील सर्वांचे निकाल सत्पंथ आणि सत्पंथीय यांच्या विरूद्धच लागले असतांही केसरी व महाराष्ट्र यांच्या सारख्या महाराष्ट्राच्या मुखपत्रांनीं त्याचप्रमाणें विद्वद्वर्य श्री. पाचलेगांवकर महाराज व हिंदु महासभावालें डॉ. मुंजे यांच्यासारख्यांनीं सत्पंथ व सत्पंथीय यांची री ओढून वरील बहुमान्य निकालांना सत्पंथाची खरी खुरी माहिती न मिळवितां दूषणें दिलीं आहेत. पण "बुडत्यास काडीचा आधार" या न्यायाप्रमाणें सत्पंथियांनीं केसरी, महाराष्ट्र आणि पाचलेगांवकर महाराज यांचाच उदो उदो करून आपलें नकटें नाक उंच करून जनतेंत मिरविण्याचा प्रयत्न केला व ते तशी शेखीही मिरवूं लागले. म्हणून वरील बहुमान्य निकालांचा जो शंभर टक्के हिंदुसमाजावर सत्परिणाम झाला असता तितका तो झाला नाहीं असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें.

केसरी, महाराष्ट्र, पाचलेगांवकर महाराज, डॉ. मुंजे आणि यांच्या प्रमाणेंच सत्पंथाची बाजू सांभाळणारे इतर विद्वान् त्यांनीं आमच्या या पुस्तकांतील माहिती अवश्य मन लावून

वाचावी आणि त्यावरून पुनः आपलीं मतें जाहीर करावीं असें त्यांना नम्रपणें सुचवितों. त्याच प्रमाणें हिंदु संघटन करणाऱ्या विद्वद्वर्यांनीं हिंदुसमाजांवरील सत्पंथाच्या आक्रमणाचें स्वरूप ध्यानांत आणून हिंदुधर्मास व हिंदुसमाजास लागलेलें हें जुनाट कीड नाहींसें करण्याचा प्रयत्न करावा असें त्यांनाही विनयपूर्वक सुचवितों.

Imp

सत्पंथांतर्गत समाजांस विनंती.

आतांपर्यंत सत्पंथासंबंधींची माहिती आणि त्याचें रहस्य निवेदन केलें. त्यावरून सत्पंथ हिंदुसमाजांतर्गत नाहीं हें स्पष्टपणें कळून येतें. पण सत्पंथाचें आचरण करणारे मात्र मूळचे हिंदु होत. सत्पंथाची माहिती बहुजन समाजास नसल्यामुळें सत्पंथी हिंदूंच्या आचारांविचारांविषयीं कोणास कांहींएक कल्पना नव्हती. सत्पंथी हिंदुसमाजांत जन्मले, हिंदुसमाजांत वाढले आणि हिंदु-समाजांत वागत आले, त्यांचें रक्त हिंदूचें, त्यांचा प्राचीन वडि-लार्जित मूळ वंश हिंदुचा आणि अद्यापही पण ते पूर्णपणें हिंदूच. फक्त त्यांच्या आचारांविचारांचाच काय तो प्रश्न आहे. म्हणून सत्पंथी समाजास आम्हाला असें सुचवावेसें वाटतें कीं, त्यांनीं हे हिंदूसमाजबाह्य आचारविचार पूर्ण त्यजावे. हिंदुसमाजाच्या चालि-रीति अंगिकृत कराव्या. अर्वाचीन काळच्या सुधारक युगांत कदाचित सत्पंथीयांना धार्मिक आचारविचारांसंबंधीं विशेषसें महत्व वाटणार नाहीं, पण त्या दृष्टीनेंच त्यांनीं अंतःकरणपूर्वक विचार केल्यास त्यांनाही कळून येईल कीं, अनादि कालापासून सर्व जगांत सर्व बाबतींनें श्रेष्ठ ठरलेल्या हिंदुसमाजास आणि हिंदु संस्कृतीस आपण तिलांजली देऊं पहात आहोंत हें कृत्य किती निकृष्टपणाचें आहे? ज्या राष्ट्रांत, ज्या संस्कृतींत, ज्या धर्मांत ज्या समाजांत आपण जन्मलों, वाढलों, आयुष्य कंठलें, आणि ज्यानें आपलें जीवितसाफल्य केलें; त्या राष्ट्रास, संस्कृतीस, धर्मास आणि समाजास पराङ्मुख होणें किती नामुष्कीची गोष्ट होय!

म्हणून सत्पंथीय बंधूहो, हिंदुसमाजानें आपणांस निव्वळ आचारविचारांकरितांच बहिष्कृत आणि त्याज्य ठरविलें, त्यांत हिंदूसमाजाची चूक ती कोणती? असें केल्यानें हिंदुसमाजानें आपणांस परधर्मांत लोटलें असें बिलकूल नाहीं. हिंदुसमाज फार विस्तृत आहे. त्यांत नानापंथ, नानाजाती, नानाभेद पूर्वीपासून चालू असून त्या सर्वांचे हिंदूसमाज मायपोट आहे. हिंदुसमाजानें आज वर कोणाकाही, केव्हांही आणि कोणत्याही बाबतींत दुखविलेलें नाहीं, असा इतिहास प्रत्यक्ष साक्ष देत असतांही आपण मात्र हिंदुसमाजाला दोषी ठरवितां! यापेक्षां अतिदु:खाची गोष्ट ती कोणती? आपलेच भाऊबंद, सगेसोयरे, अगदींच जवळचे आप्तेष्ट हिंदुसमाजांत सर्वांशीं मनमोकळेपणानें वावरत असतां त्यांना सोडून व्यवहाराच्या प्रत्येक बाबतींत आपणांस अलिप्त राहावेंसें कसें वाटतें? इतकेंच नाहीं तर सत्पंथी समाजांत अशीं उदाहरणें आढळतात कीं, एका बापापासून जन्मलेल्या दोन भावांपैकीं एक हिंदुसमाजांत तर दुसरा सत्पन्थी समाजांत. हिंदुसमाजाच्या दृष्टीनें सख्ख्या दोन भावांच्या चालिरितीतही मतभेदाचें इतकें तीव्रत्व असावें ही किती हानीकारक गोष्ट होय! लग्नासारख्या अनेक प्रसंगीं त्यामुळें नाना प्रकारचे अडथळे उत्पन्न होतात!

ही सर्व स्थिती ध्यानांत घेऊन सत्पंथीयांनीं हिंदुसमाजास मान्य नसलेल्या चालिरिती सोडल्यास हिंदूसमाज केव्हांही त्यांना आपल्यांत घ्यावयास तयारच आहे. ज्या चालि-रीति आणि बंधनें सत्पंथीयांनीं स्विकारलीं आहेत, तसें

मुसलमानी समाजांतील लोक हिंदुसमाजांत असलेल्या चालिरीति-पैकीं एखादीतरी स्वीकारण्यास तयार असतात काय ? असले तरी त्यांचा अंतस्थ हेतु हिंदु समाज पोखरण्याचा असतो याचा सत्पंथीयांनीं जरूर विचार करावा. आपण जर हिंदु आहोंत श्रुतिस्मृतीपुराणोक्तादि ग्रंथ जर प्रमाण मानावयाचे तर या ग्रंथांत न दिलेल्या चालिरीति व आचारविचार कवटाळण्यांत तरी काय अर्थ आहे ! आपल्या धर्माला, समाजाला आणि संस्कृतीला तिलां-जली देऊन पारखे व्हावयाचें आणि इस्लाम संस्कृती मात्र कव-टाळावयाची, हा सत्पंथी यांचा अंतःकरणांर्गत हेतू काय दर्शवितो याचा त्यांनींच विचार करावा. इस्लामी चालिरीति आणि आचार विचार अंगीकारून सुद्धां मुसलमान लोक सत्पंथी यांना काफरच समजतात. तुम्हीं आमचे नाहींत, आम्ही तुमचे नाहीं, तुमचा आणि आमचा कोणताही संबंध नाहीं असें स्पष्टपणें दर्शवून सत्पंथीयांना इस्लाम धर्मांतील लोक झिडकारतात. " अतोभ्रष्टः ततो भ्रष्टः " अशीच गत सत्पंथी यांची झालेली असतांहि हिंदू समाज आपल्या उदार मतानें आणि विस्तृत स्वरुपाकडे लक्ष देऊन इस्लाम संस्कृती सोडल्यास सत्पंथी यांना केव्हांही आपल्या उदरांत घ्यावयास तयारच आहे.

शेवटीं, सर्व हिंदूसमाज बांधवांस विनंति कीं, हिंदुसमा-जाच्या दृष्टीनें सत्पंथी चुकले असतील, त्यांनीं हिंदूसमाजबाह्य वर्तन केलें असेल, आपके आचार विचार कायम राहण्याकरितां त्यांनीं निरनिराळ्या ज्ञातींना त्रास दिला असेल आणि इतकें

करूनही आपलाच हेका त्यांनीं कायम ठेवला असेल तरी आपल्या उदार धोरणानें आणि अंतःकरणानें या सर्व त्रासाकडे न बघतां त्यांनीं सत्पंथी आचार विचार सोडल्यास त्यांना आपल्यांत अवश्य मिळवून घ्यावे. परधर्मीयांची हिंदूसमाजावर सध्यां चालू असलेली लांडगेतोड ध्यानांत आणून, हिंदुसंघटन तत्त्वांचा अवश्य स्वीकार करावा आणि सत्पंथीयांवरील बहिष्कृतत्व काढून टाकावें, इतर धर्म आणि राष्ट्रें आपल्या समाजाची आणि धर्माची वृद्धी करून उन्नतीच्या मार्गास लागत आहेत. हा सध्यांच्या काळचा उच्च दृष्टीकोन अवश्य लक्षांत आणावा आणि सत्पंथीयांना आपलेसें करून घ्यावे, असें विनयपूर्वक सुचवितों.

—— × ——



आधारभूत ग्रंथ.

गुजराथी.

१ पीराणा– "सतपंथ" नी पोल– (पटेल नारायणजी रामजीभाई)
२ सत्पंथ शास्त्र–
३ वैदिक इस्लाम– (इब्राहीम जुसब वरतेजी) Book
४ सो गीनान भाग १,२,३– (ह० पीरशमस्, पीर सदरदीन, पीर हसन कबीरदीन)
५ मूळ गायत्री– (सय्यद इमामशहा) Book
६ नकलंकी गीता– (सय्यद इमामशहा)
७ षट् दर्शन– (पीर सदरदीन) Book
८ मुमन चेतामणी– (सय्यद इमामशहा)
९ शिक्षापत्री– " "
१० जिन्नतनामा– " "
११ गोरवाणी– " "
१२ आगमवाणी– " "
१३ जोगवाणी– " "
१४ कलमानुं ज्ञान– " "
१५ मोहोर नबुवत– " "
१६ खोजा कोमना इतिहास–
१७ तवारीखे पीर– Book
१८ दशावतार– श्री बुद्धअवतार, नकलंकी अवतार वगैरे दहा अवतार– (सय्यद इमामशहा)

१९ खाकीने जबाब– (पटेल नारायणजी रामजीभाई)
२० प्रतिध्वनिने-पडकार- ,, ,, ,,
२१ पीराणामृत– ,, ,, ,,

मराठी

२२ सत्पंथ विजय– (एन्. डी. महाजन)

२३ गोमांतक शुद्धीचा इतिहास–(ब्र० शंकर घोंडो क्षीरसागर)
मसूर ब्रम्हचर्याश्रम.

२४ सत्पंथाचें गौडबंगाल–(लक्ष्मण शिवराम चौधरी
बी. ए. एल्एल्, बी. वकील)

२५ मुंबई इलाख्यांतील जाती–(गोविंद मंगेश कालेलकर)